मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

» मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५
» पालघर कार्यालय
कार्यालय क्रमांक ४०९, पद्मीबाई, विरार रेल्वे सबवे समोर, विरार पूर्व., ता. वसई, जि. पालघर. ४०१ ३०५. मो. ९८९२९६८७२५.
» नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८
» वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

नाशिक | PRGI Reg. No.MHMAR/25/A0219 | » बुधवार, १० सप्टेंबर २०२५ | » वर्ष: १ » अंक:९८ | » पाने-८ | » किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३


## जनसुरक्षा विधेयकाविरोधात आंदोलन

**मुंबई, दि. ९ प्रतिनिधी**

राज्यातील महायुती सरकारने शहरी नक्षलवादाचा बिमोड करण्याच्या नावाखाली आणलेल्या जनसुरक्षा विधेयकाविरोधात विरोध पक्षांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. या अत्याचारी विधेयकाविरोधात काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.) शिवसेना (उबाठा), माकपा, भाकपा, शेकाप यांच्यासह समविचारी पक्षाने आंदोलनाची हाक दिली आहे. बुधवारी राज्यातील सर्व तालुका व जिल्हा स्तरावर हे आंदोलन करण्यात येणार आहे. जनसुरक्षा विधेयक हे हुकूमशाही पद्धतीचे असून सरकार विरोधातील आवाज दडपण्यासाठी या विधेयकाचा एका अस्त्रासारखा वापर केला जाण्याची भीती आहे. नक्षलवादाच्या बिमोड करण्यासाठी सध्या अस्तित्वात असलेले कायदे कठोर आहेत, त्यामुळे वेगळया कायद्याची गरज नाही पण सरकार अदानी सारख्या भांडलदारांसाठी काम करत असून त्यांच्याविरोधात कोणीही आंदोलन करु नये, आवाज उठवू नये, यासाठी हा कायदा वापरला जाऊ शकतो.

**अग्राग्रलेख**

**खरीखरी**

## नेपाळी तरुणांच्या मनातील आग

दक्षिण आशियात गेल्या काही वर्षात सत्ताधाऱ्यांच्या विरोधात जो जनआक्रोश दिसून येत आहे त्यामध्ये आता नेपाळची भर पडलेली आहे. सर्वात प्रथम श्रीलंकेमध्ये तेथील राष्ट्रपती आणि सत्तारूढ लोकांच्या विरोधात प्रचंड जनआक्रोश दिसून आला. हा जनआक्रोश इतका भयंकर होता की निवडून आलेल्या नेत्यांच्या विरुद्ध जनतेने पुकारलेले बंड तेथील राजकारण्यांना गपगार करून गेले. त्यानंतर बांगलादेशचा नंबर लागला कारण बांगलादेशच्या निवडणुकीत गडबड झाली कारण बंगबंधू शेख मुजिबूर रहमान यांची पुत्री पुन्हा गादीवर बसली. ती भारत मित्र होती मात्र, बांगलादेशातल्या कट्टर जातीयवादी मुल्ला मौलवींनी असा काही हल्ला करविला की शेख हसीना बाईंना स्वतःच्याच बांगलादेशातून पलायन करावे लागले. नशीब बरे होते म्हणून त्यांनी यांनी नियुक्त केलेल्या लष्कर प्रमुखांनी विमान दिले. त्यामुळे शेख हसीना बाईंना भारतापर्यंत येता आले कारण जगातील कुठल्याच देशाने त्यांना थारा दिला नाही म्हणून त्या आता भारतातच कुठेतरी अज्ञातवासात आहेत. बांगलादेशात नोबेल पुरस्कार विजेता अर्थतज्ञ नव्या निवडणुकीपर्यंत तात्कालीक पंतप्रधान बनलेला आहे. त्याचा भारत म्हणजेच हिंदुस्तान द्वेष आणि हिंदू द्वेष चांगलाच उफाळून आलेला आहे. पण हा माणूस निवडणूक घेण्याची कोणतीही शक्यता दिसत नाही. त्यानंतर नेपाळमध्ये विद्रोह सुरू आहे. हा विद्रोह महाभयंकर आहे. आता कालपासून नेपाळची विनाशकारी आणि अतिभयंकर परिस्थिती समोर आलेली आहे. अगदी काल-परवापर्यंत फक्त विद्रोहाच्या बातम्या येत होत्या मात्र आता युवक वर्ग बेधुंद झालेला आहे. मते देऊन निवडलेल्या नेत्यां विरुद्धची घृणा त्यातून समोर येत आहे. नेत्यांच्या महाभयानक कमाईच्या आणि फक्त स्वतःच्या कुटुंबाला राजेशाही वागणूक देण्याच्या वर्तणुकीला नेपाळी तरुणवर्ग वैतागून गेलेला होता. हाच वैताग तरुणांना विद्रोहाकडे घेऊन गेलेला आहे 14 ते 28 वर्षाचे तरुण आता कोणाचेही एकायला तयार नाहीत. राष्ट्रपतींनी राजीनामा दिला, प्रधानमंत्री कीर्ती शर्मा ओली यांनी आणि त्यांच्या अनेक मंत्र्यांनी राजीनामे दिले. पण नेपाळचे हे युवक आता कोणाचेही एकायला तयार नाहीत. इतका भयंकर जनआक्रोश आधुनिक जगाच्या इतिहासात कुठेच दिसला नाही. ढळढळीत उघड्या डोळ्याने दिसणारा भ्रष्टाचार, साम्यवादी म्हणवणाऱ्या सरकारच्या मुलांची शाही जीवनपद्धती आणि इतरांना कस्पटासारखी वागवणारी वागणूक त्यातच नेपाळमधील बेकारांचे तांडे हाच या उद्रेकाचा उगमबिंदू आहे. सोशल मीडियावर बंदी हे फक्त तात्कालीक कारण आहे. त्यापेक्षा नेपाळची भयानक अवस्था आणि राज्यकर्त्यांची मौजमजा यांना विटलेले सामान्य तरुण आता पूर्णतः बिथरलेले आहेत. भारताला स्वातंत्र्य देण्यापूर्वी ब्रिटनचे तात्कालीन पंतप्रधान चर्चिल यांनी हिंदुस्थानचे लोक राज्य करण्यासाठी समर्थ नाहीत, ते देशाचे वाटोळे करतील असे म्हटले होते. तेव्हाच्या भारताचाच भाग असलेल्या पाकिस्तान, बांगलादेश यांचे जे काही हाल झाले आहे ते आणि भारताच्या समांतर असलेले श्रीलंका आणि आता नेपाळ या देशांमधील अराजक या चर्चिलला तेव्हा दिसले असावे, असे म्हणण्यास वाव उरतो. आज नेपाळमधील संसदेच्या इमारतीसह सर्व आजी आणि माजी प्रमुख नेत्यांची घरे आगीच्या भक्षस्थानी पडलेली आहेत. खरंतर ही नेपाळच्या तरुणांच्या मनातील आग आहे असे आपण समजले पाहिजे. एका कवीने असे म्हटले आहे की, "केला जरी पोत बळीची खाले ज्वाला तरी ते वरती उफाळे" याच उक्तीनुसार नेपाळी तरुणांच्या मनातील आग इतकी उफाळली आहे. आता त्यामध्ये बरेच काही भस्मसात होत आहे असेच आपण समजले पाहिजे. सध्या नेपाळमध्ये कोणाचीही सत्ता नाही. सध्याची परिस्थिती पाहून नेपाळचे राजे ज्ञानेंद्र यांनी लोकांच्या हाती सत्ता सोपवलेली आहे. नेपाळ काँग्रेस त्यातल्या त्यात बरी होती. आता कम्युनिस्टांच्या हातात सत्ता आहे. हे साम्यवादी कम्युनिस्ट सर्वहारा वर्गाचे कल्याण करण्याएवजी आपल्या पोराबाळांना आयुष्यभर आरामात आणि एश्वर्यात कसे राहता येईल तेवढेच पाहत आहेत. त्यामुळेच आपल्या पोरा बाळांना मलिदा चारणाऱ्या कितीतरी नेत्यांना आणि आजी-माजी सत्ताधाऱ्यांना आज या नेपाळमधील बंडखोरांनी चांगलेच बडवलेले आहे. पूर्वीचे पंतप्रधान झालनात यांच्या पत्नी राजलक्ष्मी यांना तर अक्षरशः मारून मारून ठार केलेले आहे. आतापर्यंत २३ तरुण ठार झालेले आहेत. अजून नेपाळची सेना, प्रबुद्ध वर्ग आणि हे बंडखोर करून ज्यांना नेता मानतात ते काठमांडूचे बिरेन शहा यांच्या आवाहनालाही बंडखोरांनी कुठलाच प्रतिसाद दिलेला नाही. हा विद्रोह केवळ काठमांडूत नाही तर नेपाळच्या प्रत्येक शहरात आहे. पोलीस आणि नेपाळची सेना हतबल आहे. 23 जण मारल्यावर ते तरुण जीवावर उदार होऊन मनातील आग सर्व नेपाळमध्ये भडकवण्याचे कारण फार महाभयंकर भ्रष्टाचार हे आहे. जेव्हा तरुण मंडळी रस्त्यावर उतरतात तेव्हा सत्ता परिवर्तन होत असते.भारतातही त्या प्रकारचे सत्ता परिवर्तन यापूर्वी झालेले आहे जयप्रकाश नारायण यांचे किंवा अण्णा हजारे यांचे आंदोलन आपल्या देशातही केवळ भावना भडकविण्यापर्यंत सीमित राहिले. मतपेटीच्या माध्यमातून सत्ता परिवर्तन झाले. पण आपल्या चारी बाजूंनी सध्या जे अराजकाचे साम्राज्य दिसून येत आहे, त्यापासून आपणही धडा घेतला पाहिजे.


nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023


# सी.पी.राधाकृष्णन नवे उपराष्ट्रपती

**नवी दिल्ली, दि. ९ वृत्तसंस्था**

भाजपचे वरिष्ठ नेते सीपी राधाकृष्ण यांची देशाच्या नव्या उपराष्ट्रपतीपदी निवड करण्यात आली आहे. संसदेतील निवडणूक प्रक्रियेत त्यांचा विजय निश्चित झाल्यानंतर अधिकृत घोषणा करण्यात आली. ते 452 मतांनी विजयी झाले.

देशाच्या १७ व्या उपराष्ट्रपती निवडणुकीसाठी आज संसद भवनात सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत मतदान पार पडले. एकूण ७६८ खासदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. भारतीय संसदेत लोकसभा आणि राज्यसभेसह एकूण ७८८ खासदार आहेत. सध्या दोन्ही सभागृहात ७ जागा रिक्त आहेत. अशाप्रकारे एकूण ७८१ खासदारांना मतदान करायचे होते, त्यापैकी १३ जणांनी मतदानात भाग घेतला नाही. यापैकी बीआरएसचे ४, बीजेडीचे ७, अकाली दलाचे १ आणि १ अपक्ष खासदाराने मतदान केले नाही. ४२७ एनडीए खासदारांनी मतदान केले.



सकाळी १० वाजता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्वप्रथम मतदान केले. मतदान सुरू होण्यापूर्वी सर्व एनडीए खासदारांनी सकाळी ९.३० वाजता बैठकीत भाग घेतला.

एनडीएचे उमेदवार सीपी राधाकृष्णन आणि इंडिया ब्लॉकचे उमेदवार बी. सुदर्शन रेड्डी यांच्यात ही लढत होती.

एनडीएचे उमेदवार सीपी राधाकृष्णन यांनी उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत विजय मिळवला. मतमोजणीच्या वेळी ७५२ मते वैध आढळली आणि १५ मते अवैध घोषित करण्यात आली. सीपी राधाकृष्णन यांना ४५२ पहिल्या पसंतीची मते मिळाली, तर इंडिया ब्लॉकचे उमेदवार बी सुदर्शन रेड्डी यांना फक्त ३०० पहिल्या पसंतीची मते मिळाली.

**विरोधकांचे क्रॉस-व्होटिंग**

विरोधी पक्ष आपल्या खासदारांना एकजूट ठेवू शकला नाही. एनडीएकडे एकूण ४२७ खासदार होते. जगनमोहन रेड्डी यांच्या पक्षाच्या वायएसआर काँग्रेसच्या सर्व ११ खासदारांनी एनडीए उमेदवाराच्या बाजूने मतदान केले तर ही संख्या ४३८ पर्यंत पोहोचते. परंतु सीपी राधाकृष्णन यांना एकूण ४५२ मते मिळाली. म्हणजेच १४ विरोधी खासदारांनी एनडीए उमेदवाराच्या बाजूने क्रॉस-व्होटिंग केले.

# नेपाळमध्ये राजकीय भूकंप, पंतप्रधान ओलींचा राजीनामा

**काठमांडू, दि. ९ वृत्तसंस्था**

भारताचा शेजारी देश नेपाळमधील राजकीय स्थिती कमालीची तणावपूर्ण झाली आहे. गेल्या दोन दिवसांपासून नेपाळमधील Gen Z आणि मोठ्या संख्येने तरुणाई रस्त्यांवर उतरून नेपाळ सरकारविरोधात आंदोलन करताना दिसत आहे. आधी सोशल मीडिया साईट्सवर बंदी घातल्याचा निषेध या तरुणाईनं केला. त्यावर १९ तासांनी ही बंदी सरकारला उठवावी लागली. मात्र, त्यानंतरदेखील रस्त्यावर उतरलेल्या तरुणाईचा असंतोष कमी झाला नाही. देशातील वाढत्या भ्रष्टाचाराचा निषेध करण्यासाठी तीव्र आंदोलन करण्यात येत असल्याच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान केपी शर्मा ओली यांनी पदाचा राजीनामा दिला आहे.

नेपाळ सरकारमधील भ्रष्टाचाराच्या विरोधात जनता रस्त्यावर उतरून आंदोलन करत असताना त्यावर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न सरकारकडून केला जात होता. मात्र, आंदोलन हिंसक होत असल्याचं पाहून पंतप्रधान केपी शर्मा ओली यांनी पदाचा राजीनामा दिला आहे. "सध्या निर्माण झालेल्या समस्येवर राजकीय मार्गांनी आणि शांततापूर्ण पद्धतीने तोडगा निघावा म्हणून मी पदाचा राजीनामा देत आहे", असं ओली यांनी जाहीर केलं आहे. राष्ट्रपती रामचंद्र पौडेल यांच्याकडे ओली यांनी आपला राजीनामा सादर केला आहे.




"मला नेपाळच्या राज्यघटनेतील कलम ७६ (२) नुसार पंतप्रधान म्हणून नियुक्त केलं गेलं होतं. देशातली सध्याची असामान्य परिस्थिती लक्षात घेता आणि त्यावर राजकीयदृष्ट्या घटनात्मक तोडगा काढण्यासाठीच्या प्रयत्नांना हातभार लागावा म्हणून मी पंतप्रधानपदाचा राजीनामा देत आहे. नेपाळच्या घटनेच्या कलम ७७ (१) नुसार मी ताबडतोब पदावरून पायउतार होत आहे", असं या पत्रामध्ये ओली यांनी नमूद केलं आहे.

पंतप्रधानांपूर्वी देशाचे गृहमंत्री रमेश लेखक, परराष्ट्र मंत्री डॉ. आरजू राणा देउबा, दळणवळण मंत्री पृथ्वी सुब्बा गुरुंग आणि ऊर्जा मंत्री दीपक खड्का यांच्यासह अनेक मंत्र्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. आंदोलकांनी या सर्व मंत्र्यांची घरेही पेटवून दिली.

**पंतप्रधानांचं शासकीय निवासस्थान पेटवलं!**

दरम्यान, नेपाळमध्ये संतप्त झालेल्या आंदोलकांनी आज पंतप्रधानांच्या शासकीय निवासस्थानाला आग लावून ते पेटवून दिलं. पंतप्रधानांबरोबरच सत्ताधारी गटातील इतरही काही महत्त्वाच्या नेत्यांच्या घरांना अशाच प्रकारे आग लावण्यात आली. सोमवारी आंदोलक व पोलीस प्रशासन यांच्यात झालेल्या धुमश्चक्रीमध्ये १९ आंदोलकांचा मृत्यू झाला. त्याचे तीव्र पडसाद आंदोलकांमध्ये उमटले. परिणामी मंगळवारी सकाळपासूनच कर्फ्यू असूनही आंदोलक आक्रमकपणे निदर्शने करत सरकारी मालमत्तांवर हल्ले करताना दिसून आले.

गेल्या काही दिवसांपासून नेपाळमध्ये सरकारी यंत्रणांमधील भ्रष्टाचाराविरोधात वातावरण तापू लागलं होतं. विरोधकांनीदेखील सरकारच्या भ्रष्टाचारावर तीव्र शब्दांत टीका केली होती. त्याअनुषंगाने नेपाळी जनतेमधूनही या प्रकारांना विरोध केला जाऊ लागला. त्यातच सोमवारी नेपाळ सरकारने फेसबुक, इन्स्टाग्राम, व्हॉट्सअ‍ॅप, यूट्यूब, एक्स अशा सोशल मीडिया साईट्सवर बंदी घालण्याचा निर्णय जाहीर केला. त्यामुळे संतप्त झालेले तरुण रस्त्यावर उतरले. त्यात Gen Z वयोगटातील नवतरुणांचा मोठ्या प्रमाणावर समावेश होता. पहिल्यांदाच नेपाळमधील Gen Z अशा प्रकारे उत्स्फूर्तपणे एखाद्या आंदोलनात सहभागी झाले होते.

नेपाळमध्ये ठिकठिकाणी या तरुणांनी सरकारी धोरणांविरोधात निदर्शने करायला सुरुवात केली. "बंदी भ्रष्टाचारावर आणा, समाजमाध्यमांवर नाही" अशा घोषणा दिल्या जाऊ लागल्या. आंदोलकांचा वाढता रेटा पाहून सरकारने बंदीचा निर्णय मागे घेतला आणि १९ तासांमध्ये ही बंदी उठवण्यात आली. मात्र, यादरम्यान पोलिसांनी जमावाला नियंत्रित करण्यासाठी केलेल्या गोळीबारात १९ आंदोलक ठार झाले. त्यामुळे आंदोलनाचा भडका उडाला.

## जीआरविरोधात कोर्टात जाऊ भुजबळांची नाराजी कायम

**मुबई, दि. ९ प्रतिनिधी**

सरकारने मराठा समाजाला ओबीसीतून दाखले देण्यासंदर्भात शासन निर्णय जारी केल्यानंतर ओबीसी नेते आक्रमक झाले असून मंत्री छगन भुजबळ आपल्याच सरकारवर नाराज आहेत. त्यामुळे, ते आजच्या मंत्रिमंडळ बैठकीला उपस्थित राहतील का नाही, असा प्रश्न होता. मात्र, मंत्रिमंडळ बैठकीला छगन भुजबळांनी आपली उपस्थिती दर्शवली, तरीही त्यांची नाराजी कायम आहे. बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना त्यांनी मुख्यमंत्र्यांना लिहिलेल्या पत्राबाबत माहिती दिली. मराठा आरक्षण, जीआर, हैदराबाद गॅझेटियर, तसेच कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या मुद्द्याबाबत भुजबळांनी माहिती दिली. तसेच, कॅबिनेट बैठकीत कांदा उत्पादक शेतकऱ्यांचा मुद्दा उपस्थित केला, मुख्यमंत्री स्वत: याबाबत संबंधित लोकांशी बोलणार आहेत, असेही

नाशिकमध्ये इलेक्ट्रिक सामान बनवणारे कारखाने आहेत, त्यांच्या प्रमाणपत्राचा विषय आहे. त्यांच्या एक्सपोर्टची अडचण होऊ नये म्हणून आम्ही १ हजार कोटी रुपयांची लॅब तयार करत आहोत. केंद्रीयमंत्री मनोहरलाल खट्टर या कार्यक्रमासाठी येणार आहेत, मुख्यमंत्र्यांना त्याचं निमंत्रण दिलं आहे. येवला शहराला पाणीपुरवठा होण्यासाठी पाठपुरावा करत आहे, कॅबिनेट बैठकीत हाही मुद्दा घेण्यात आल्याची माहिती छगन भुजबळ यांनी दिली. मी समता परिषदेच्या माध्यमातून मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिलं आहे, जे वकिलांनी ड्राफ्ट केलं आहे. मुख्यमंत्र्यांना हे पत्र दिल असून राज्य सरकारने जो जीआर काढला आहे, त्यामुळे राज्यात नाराजी आहे. आम्ही ज्यावेळी कोर्टात जाऊ त्यावेळी आम्हाला हे सांगता येईल की आम्ही सरकारसोबत देखील या विषयावर बोलत आहोत, असे म्हणत भुजबळांनी आपली नाराजी कायम असल्याचे म्हटले.

## जीआरची अंमलबजावणी सुरु

**मुंबई, दि. ९ प्रतिनिधी**

मराठा आरक्षणावर आज राज्य मंत्रीमंडळ बैठकीत चर्चा झाली. मराठा आंदोलकांनी केलेल्या मागण्यांची अंमलबजावणी सुरू झाली आहे. यासंदर्भात प्रत्येक सोमवारी जिल्हाधिकाऱ्यांसोबत बैठकही घेतली जाणार आहे, तसेच मराठा आंदोलकांवर दाखल असणारे गुन्हे मागे घेण्यासाठी वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांबरोबर चर्चा होईल, अशी माहिती मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी आज माध्यमांशी बोलताना दिली. कोणत्याही शासकीय अधिनियमाच्या (जीआर) अंमलबजावणीसाठी वेळ लागतो, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. १७ सप्टेंबरला मराठवाडा मुक्ती संग्राम दिवस आहे. त्यापूर्वी मराठवाड्यातील मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याची कारवाई सुरू करावी, अशी मागणी जरांगे-पाटील यांनी केली आहे. याबाबत बोलताना मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील म्हणाले की, शासनाने मराठा आरक्षणाच्या मागणीवर काढलेल्या जीआरची अंमलबजावणी सुरू झाली आहे. यासंदर्भात आज मंत्रीमंडळ बैठकीतही चर्चा झाली. आता प्रत्येक सोमवारी जिल्हाधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली जाणार आहे.

# विधवा आणि पीडित गांधारीच्या अति पुत्रप्रेमाचा परिपाक म्हणजे महाभारत

**वक्ता शतशहस्त्रेशू डॉ. वेदप्रकाश मिश्रा यांचे तर्कशुद्ध गांधारीपुराण**



**नागपूर, दि. ९ प्रतिनिधी**

आताचे अफगाणिस्तान महाभारत कालीन गांधारची राजकन्या सुबलपुत्री गांधारीचा विवाह तिच्या इच्छेविरुद्ध अंध धृतराष्ट्राबरोबर करणे गांधारीला मान्य नव्हते. पण तत्कालीन सर्वाधिक बलवंत हस्तीनापुरच्या मागणीला नकार देणे शक्य नव्हते म्हणून गांधारीने मूकपणे विवाहाचा स्वीकार केला. असे प्रतिपादन शब्दप्रभू डॉ. वेदप्रकाश मिश्रा यांनी गांधारीचे चरित्र चित्रण करताना आज सुबुद्ध श्रोत्यांच्या उपस्थितीत अनेकदा टाळ्यांच्या कडकडाटात केले.

विदर्भ गौरव प्रतिष्ठान द्वारा आयोजित महाभारत कालीन गांधारी या व्याख्यानाचे अध्यक्ष डॉ. गिरीष गांधी होते. प्रमुख पाहुणे म्हणून जस्टीस विजय डागा उपस्थित होते.

गांधारी ही कंधारच्या राजघराण्याची अत्यंत सुंदर, रुपवती, गुणवती, राजनीति निपुण कन्या होती. रामायणात जे स्थान कैकयीचे होते तेच स्थान कुरुवंशात गांधारीचे होते. गांधारीचे भविष्य वर्तवितांना असे सांगण्यात आली की गांधारीचा पहिला पती अल्पवयीन राहील. हे माहित असल्यामुळे आपल्या सर्वगुणसंपन्न कन्येला वैधव्य येवू नये म्हणून सुबल राजानी तिचा विवाह एका बोकडासोबत केला आणि त्यानंतर त्याचा बळी दिला. मग गांधारी विधवा झाली आणि या विधवा राजकन्येला बलाढ्य राजघराण्याचे कर्ते भीष्म पितामहांनी मागणी घातली. ती मान्य करुन तिचा विवाह धृतराष्ट्राबरोबर झाला. त्यावेळी कंधारला संपूर्ण संरक्षण देण्याचे आश्वासन भीष्मानी दिले होते. पण जेव्हा भीष्माला गांधारी विधवा होती हे कळले तेव्हा भीष्माने कंधारचा राजा राणी, भाऊ आणि बहीण यांना हस्तीनापुरच्या तुरुंगात बंदी केले. या चौघांना दररोज केवळ एक मूठ भात देण्यात येत होता. चौघांपैकी हा भात केवळ एक जण खात होता आणि त्यामुळेच तो जिवंत राहीला त्यांचे नाव शकुनी होते.

गांधारीने आपल्यावर केलेल्या सक्तीचे परिमार्जन म्हणून आपल्या अंध नवऱ्याप्रमाणे आपल्या डोळ्यावर रेशमी पट्टी बांधली होती. केवळ तेवढेच कारण नव्हते, तिला भीष्माचा चेहराही बघायचा नव्हता ही खरी गोम आहे.

गांधारीने ९९ पुत्र आणि एका पुत्रीला जन्म दिला त्याचीही हकीकत विचित्र आहे. गांधारीचा गर्भ दोन वर्षे तिच्या पोटातच होता. शेवटी तिनेच आपल्या पोटावर आघात करुन गर्भ बाहे काढला तेव्हा तो एक गोळा होता. त्यानंतर त्या गोळ्यातून शंभर मडक्यांच्या माध्यमाने शंभर जीव जन्मले. धृतराष्ट्राने आपल्या दासीबरोबर संभोग करुन एक पुत्र जन्माला घातला त्याचे नाव युयुत्सू. हा युयुत्सू महाभारताच्या युद्धात धृतराष्ट्राने आवाहन केल्यावर पांडवाच्या बाजूने आला.

गांधारीच्या पीढेचा अंत नाही. आयुष्यभर तिला अशाच वेदना भोगाव्या लागल्या. पहिला पुत्र दुर्योधन याचा जन्म झाल्यावर अनेक अपशकुन झाले पण गांधारी किंवा धृतराष्ट्रानी त्याची दखल घेतली नव्हती. गांधारीचा भाऊ शकुनी सोडल्यास इतर तिघेही मृत झाले होते. शकुनीला गांधारच्या राजगादीवर बसवण्याचे भीष्माच्या मनात होते. परंतू साम्राज्ञी गांधारीने आपल्या भावाला जावू दिले नाही. त्यानंतर शकुनी आणि गांधारी यांचा विक्शोभ आपल्याला बघायला मिळतो. विदुरने दुर्योधनाच्या बाबतीत वारंवार सांगूनही त्याचे म्हणणे कोणीच ऐकले नाही.

दुर्योधन पांडवांचा अतिशय तिरस्कार करीत होता. त्याने भीमाला विष पाजले पण सुदैवाने भीम पुन्हा परत आला. ही बाब गांधारीला ठाऊक होती पण ती मौन राहीली. लाक्षागृहात पांडवांना जाळण्यात येणार हे सुद्धा तीला ठाऊक होते. तेव्हाही ती गप्प राहिली. जी कुंती तिच्यावर जीव ओवाळीत होती आणि राज्याची खरी सम्राज्ञी होती तीही लाक्षागृहात भस्म होणार होती हे माहित असूनही गांधारीने त्याबाबत काही केले नाही. केवळ विदुराच्या सावधगिरीने पांडव वाचले.

हस्तीपुराचे विभाजन करताना पांडवांना खांडव वनातील पाच गांवे देण्यात आली होती. तेव्हाही गांधारी गप्प राहीली. पांडवांनी त्याचे इंद्रप्रस्थ स्थापन केल्यावर ईर्षेने धर्मराजाला जुगारासाठी पाचारण केले. त्यावेळी चौसरच्या ज्या सोगट्या होत्या त्या शकुनीच्या आज्ञेत होत्या. हे गांधारीला माहित होते तेव्हाही गांधारी गप्पच राहीली. सर्व राज्य व संपत्ती गमावल्यानंतर धर्मराजाने सर्व भाऊ व स्वत:ला पणावर लावले त्यातही तो हरला. त्यानंतर हरलेल्या धर्मराजाने द्रौपदीला पणाला लावले तेव्हीही पुत्रप्रेमी गांधारी काहीच बोलली नाही. त्यानंतर दुशासनाने द्रौपदीच्या वस्त्रांना हात लावला तेव्हाही गांधारीने प्रतिकार केला नाही. द्रौपदी एका सम्राटाची सम्राज्ञी होती याचे भानही गांधारीने ठेवले नाही.

महाभारत युद्धात जेव्हा पांडवाची सरशी होत होती तेव्हा गांधारीला निदान दुर्योधन तरी जिवंत राहावा म्हणून त्याने दुर्योधनला संपूर्ण कपडे काढून आपल्या समोर येण्याचा आदेश दिला. त्यावेळी आंघोळ करुन येणाऱ्या दुर्योधनाला श्रीकृष्णाने केवळ बालकालाच आपल्या मातेसमोर विवस्त्र जाणे धर्मात लिहीलेले आहे. हे पटविले आणि त्याने आपल्या शरीरातील गुप्तांग दिसू नये म्हणून त्यावर केळ्यांच्या पानाच आवरण घातले. गांधारीला डोळे उघडल्यावर ज्यांचा कडे पाहील त्यांचे अंग वज्राचे होईल असा वर होता. त्यामुळे पुत्रप्रेमापायी तिने पहिल्यांदा डोळ्यावरील आवरण काढले होते पण तिचा तो प्रयत्न कृष्णशिष्टाईमुळे असफल झाला. त्यानंतर भीमाने त्याच्या मांडीवर प्रहार करुन दुर्योधनला ठार मारले तेव्हा त्याचा क्षतविक्षत देह पाहण्यासाठी तिने दुसऱ्यांदा आपले आवरण काढले होते.

त्यानंतर गांधारीला सांत्वना देण्यासाठी श्रीकृष्ण जेव्हा तिच्याकडे गेले तेव्हा ती म्हणाली, कृष्णा तू मनात आणले असते तर हा संहार थांबला असता. कृष्णाने केवळ ५ गावांची मागणी केली होती तेव्हा पुत्रप्रेमी गांधारीने आपल्या लाडक्या दुर्योधनच्या कृष्णाला बंदी बणविण्याचाही विरोध केला नव्हता. कृष्णाने ३६ वर्षानंतर यदुकुळाचा नाश होईल हा दिलेला शाप स्विकारलाच.

गांधारीने आयुष्यभर केवळ दुर्योधनाकडेच पाहिले. हेच अभागी गांधारीच्या पुत्रमोहाचे फलित होते आणि त्यामुळेच कौरवांचा संपूर्ण नाश झाला.

डॉ. मिश्रा यांनी गांधारीच्या जीवनाचा संपूर्ण आलेख अत्यंत सुव्यवस्थीतपणे सादर केला त्यामुळे श्रोते दीड तास मंत्रमुग्ध होवून त्यांच्या वाणीप्रवाहात न्हाऊन निघाले.

आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. गिरीष गांधी यांनी गांधारीच्या वैशिष्ट्यपूर्ण जीवनाचा उल्लेख केला. डॉ. वेदप्रकाश मिश्रा यांच्या अभ्यासपूर्ण आणि अपूर्व वाणीने गांधारीच्या गुणावगुणाच्या वर्णनाचे शब्दचित्र सादर करावे असे आवाहन केले.

आभार प्रदर्शन श्री बाळ कुळकर्णी यांनी केले तर सुयोग्य संचालन सुभदा फडणवीस यांनी केले.

# जलसिंचन योजनांसाठी वीज दर सवलतीला मुदतवाढ

**गजानन तुपे**

**मुंबई, दि. ९ प्रतिनिधी**

राज्यातील शासनकर्ते नेहमीच शेतकरी, महिला, उद्योजक, विद्यार्थी, मागासवर्गीय, इतर मागासवर्गीय इत्यादींना केंद्रस्थानी ठेवून विकास साधण्याचा प्रयत्न करतात. राज्य मंत्रिमंडळाची बैठक घेऊन समाजातील या घटकांसंदर्भात वेळोवेळी साधक-बाधक चर्चा केली जाते आणि लोकोपयोगी निर्णय घेतले जातात. आज राज्य मंत्रिमंडळाची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत राज्य सरकारने अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले आहे. याच बैठकीत शेतकऱ्यांना मोठा दिलासा देणारा निर्णय घेण्यात आला आहे.

**ऊर्जा विभाग-** राज्य सरकारने शेतकऱ्यांना मोठा दिलासा देणारा निर्णय घेतला आहे. उपसा जलसिंचन योजनांसाठी वीज दर सवलतीला मार्च २०२७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. अतिउच्चदाब, उच्चदाब व लघुदाब उपसा जलसिंचन अशा सर्व प्रकारच्या १ हजार ७८९ योजनांना वीज दरात सवलतीमुळे शेतकरी सभासदांना या निर्णयाचा लाभ होणार आहे.

**नगरविकास विभाग -** नागरी पायाभूत सुविधा विकास कर्ज योजना अंतर्गत पहिल्या टप्प्यात हुडकोकडून २००० कोटी रुपयांचे कर्ज घेण्यास मान्यता देण्यात आली आहे. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा प्रकल्पासाठी ८२२ कोटी रुपये, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या चार मलनिस्सारण प्रकल्पासाठी २६८ कोटी रुपये, मीरा भाईंदर महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा प्रकल्पासाठी ११६ कोटी रुपये कर्ज उभारणी केली जाणार आहे.

**मृद व जलसंधारण विभाग -** अकोला जिल्ह्यातील घोंगा आणि कानडी (ता. मुर्तिजापूर) येथील लघु पाटबंधारे प्रकल्प योजनांच्या दुरुस्ती खर्चाची तरतूद करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या निर्णयाचा मुर्तिजापूर तालुक्यातील सिंचन क्षमतेत वाढ होणार, शेतीला पाणी, शेतकऱ्यांना फायदा होणार आहे.


**महसूल विभाग -** रायगड जिल्ह्यातील मौजे आसुडगाव (ता. पनवेल) येथील शासकीय गायरानातील चार हेक्टर जमीन भारत सरकारच्या सब्सिडरी इंटेलिजन्स ब्युरो यांना अधिकारी, कर्मचारी यांच्याकरिता निवासस्थाने (रहिवास क्वार्टर्स) बांधण्यासाठी देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

दरम्यान, सरकारने घेतलेल्या या निर्णयाचा शेतकरी तसेच राज्यातील इतरही घटकांना फायदा होणार आहे. लवकरच या निर्णयांची अंमलबजावणी केली जाणार आहे.

# विद्यार्थी, शिक्षक घडविणारे ज्ञानतपस्वी डॉ. ब्राह्मणकर

**मराठा विद्या प्रसारक शिक्षण संस्थेत नोकरी मिळाल्यानंतर रुजू होण्यासाठी सटाणा येथे जाणे गरजेचे होते. नेमके सटाणा महाविद्यालय कुठे आहे हे देखील माहीत नव्हते. बसमध्ये बसल्यावर कंडक्टरला कॉलेज आल्यावर उतरून द्या अशी विनंती केली. १९८५ च्या सुमारास सटाणा महाविद्यालयात रुजू होताना कडक शिस्तीच्या प्राचार्य डॉ. ए. बा. ब्राह्मणकर यांचा ज्ञानरूपी परिसर स्पर्श मला झाला. तेव्हापासून एक गुरुवर्य व शिष्य नाते जे जुळले ते आजतागायत कायम आहे. आज ब्राह्मणकर सर नव्वदित पोहोचत आहे. १० सप्टेंबर १९३६ ला जन्म झालेल्या सरांच्या अमृत महोत्सवी कार्यक्रमातच त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या लोकांची झालेली गर्दी त्यांच्यावरील प्रेम सिद्ध करीत होती. शिक्षण क्षेत्रात लाख मोलाची कामगिरी करूनही अजूनही फिट्ट असणाऱ्या या देवदूतास कोटी कोटी प्रणाम. आदर्श आणि उत्कृष्ट शिक्षक, जो विद्यार्थ्यांच्या जीवनात खूप महत्त्वाचा प्रभाव टाकतो आणि त्यांना ज्ञानाच्या दिशेने मार्गदर्शन करतो. जे केवळ ज्ञान देत नाहीत, तर विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करतात, त्यांना भावनिक आधार देतात आणि आयुष्यभर शिकत राहण्यासाठी प्रेरित करतात, म्हणून डॉ. ब्राह्मणकर सर्वांनाच हवेहवेसे वाटतात. आपल्या शैक्षणिक पेशात त्यांनी फक्त शिक्षक हीच भूमिका स्वीकारली नाही, तर खऱ्या अर्थाने संशोधक म्हणून त्यांची कारकीर्द गाजली. असे म्हणतात की ब्राह्मणकर सर जपान सारख्या देशांमध्ये जन्मले असते, तर पूर्ण देशाने त्यांना डोक्यावर घेतले असते, इतके त्यांचे कार्य अफाट आहे. शिक्षक म्हणजे गुरु, शिक्षक म्हणजे पवित्र ज्ञानदान करणारे, ज्ञानसाधना करणारे, समाजाला उत्साहित प्रेरित करून चांगली दिशा देणारे, विद्यार्थी घडवणारे, आपल्या ज्ञानदानातून देशातच नव्हे तर संपूर्ण जगात आपले नाव कमवणारे, आपल्या देशाचे नाव उज्वल करणारे घटक म्हणजे शिक्षक होय. पण त्या पंक्तीतील डॉ. ब्राह्मणकर यांनी विद्यार्थ्यांबरोबरच शिक्षकही घडवले. एवढेच नव्हे तर त्यांनी ज्या शिक्षकांबरोबर ऋणानुबंध जोडले ते आपल्या आयुष्याच्या सायंकाळपर्यंत जपून ठेवले आहेत. म्हणूनच आपल्या अनेक सवंगड्यांसह अतिशय ज्युनिअर असलेल्या प्राध्यापकांनाही मायेने जवळ बोलवतात व खुशाली विचारतात. एवढा मोठा तपस्वी आजही आपल्या पाठीवर शाबासकीची थाप देतो, त्यावेळी प्रत्येकाला जीवन सार्थ झाल्यासारखे वाटते. शिक्षकांना प्रथम देवाची उपमा दिली जाते. ब्रह्मस्वरूप मानले जाते. आमच्यासारख्या अनेकांच्या दृष्टिकोनातून त्यांचे नेतृत्व देवा समानच आहे. चार भिंतीच्या आत जगातील ज्ञानसंपदा त्यांच्याजवळ आहे. पण आपल्या सहकाऱ्यांसह नव्या पिढीकडे ते आनंदाने ती ज्ञानसंपदा वाटप करून टाकतात. त्यामुळे शिक्षण क्षेत्रात त्यांच्या इतका दानशूर कोण असू शकेल?**

डॉ. एकनाथ बापू ब्राह्मणकरांनी फक्त महाराष्ट्रातच नव्हे तर देशातील शिक्षण क्षेत्रात एक अभिनव क्रांती केली आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना अनेक पुरस्कार



प्राप्त झाले. पण एवढा महान तपस्वी ज्यावेळी छोट्या-मोठ्या शिक्षकांना मायेने जवळ बोलवतो, त्यांना काही टिप्स देतो, त्यावेळी मन भरून येते. माझ्यासारख्या त्यावेळी नवोदित शिक्षकाला पहिल्या भेटीतच जरब बसवली. माणूस मोठा कडक वाटतो अशी भावना मनात निर्माण झाली. जरा अंतरावरच राहिलेले बरे असेही वाटले. पण आपल्यातील गुण दुरून हेरून त्यावेळी अत्यंत मोठी जबाबदारी आपल्यावर दिली जाते, त्यावेळी आपला देखील आपल्यावर विश्वास बसत नाही. माझ्यासारख्या ग्रामीण भागातून नोकरीसाठी सटाणा येथे आलेल्या व्यक्तीला सटाणा खूप दूर वाटत होते. मुंबई पुण्याचा संबंध कधी आलाच नव्हता. परंतु एके दिवशी सरांनी थेट पुढील सोमवारी आपल्याला दिल्लीला जायचे आहे असे सांगितल्यानंतर पायाखालची जमीनच हादरली. परंतु सरांनी फक्त दिल्लीच नव्हे; तर अलाहाबाद, लखनऊ पासून अनेक शहरांमध्ये विविध विद्यापीठांना भेटी देतांना सोबत नेले. सोबत एस. एन. कुलकर्णी नावाचे अर्थशास्त्राचे प्राध्यापक देखील होते. भारत देश सर्वात प्रथम केवळ ब्राह्मणकर सरांमुळेच मी पाहिला. आज ज्यावेळी जगाच्या पाठीवरील अनेक देशांमध्ये फिरतो, त्यावेळी लक्षात येते की या फिरस्तीचा पाया ब्राह्मणकर सरांनीच घातला होता. आज पत्रकारितेच्या माध्यमातून जगातील अनेक विद्यापीठांना भेटी दिल्या, त्यावेळी सरांची आठवण आवर्जून होते. आज जेव्हा देशातील विद्यापीठे, महाविद्यालये यांत प्राध्यापकांची हजारो पदे न भरता रिक्त ठेवली जातात, जेव्हा एखाद्या रोजगार हमी योजनेवरील अकुशल कामगारांप्रमाणे 'तासिकां'वर प्राध्यापक वेठबिगारी करतात, तेव्हा त्या देशातील शिक्षणाची अवस्था आणि म्हणून भविष्य काय असेल? हा प्रश्न अधिक महत्त्वाचा ठरतो. अशावेळी डॉक्टर ब्राह्मणकर यांच्यासारखे हाडाचे शिक्षक शासनाच्या विविध कमिट्यांवर असते तर ही वेळ कदाचित आली देखील नसती. हा देश महासत्ता होण्याचे स्वप्न पाहातो आणि अशा गुणवंत शिक्षक आणि गुण-केंद्रित शिक्षणाशिवाय ते स्वप्न प्रत्यक्षात येईल असे मानू लागतो. एके काळी गुणवान शिक्षणासाठी ओळखल्या जाणाऱ्या भारताचे हे वास्तव. कोणत्याही राष्ट्राच्या उभारणीत महत्त्वाचा वाटा असतो तो शिक्षण या संकल्पनेचा. हे शिक्षण जितके व्यापक, जितके सर्वसमावेशक आणि जितके बुद्धिनिष्ठ तितकी त्या देशाच्या प्रगतीची संधी अधिक. अमेरिकेसारखा देश आपल्या सकल राष्ट्रीय उत्पन्नाचा नऊ-दहा टक्के इतका प्रचंड वाटा शिक्षणावर खर्च करतो. चीनही त्याच दिशेने वाटचाल करत असून युरोपीय देशही शिक्षणाबाबत हयगय करताना दिसत नाहीत. आपण या सर्वांच्या रांगेत बसण्याचे स्वप्न पाहतो. तसे करण्यात काही गैर नाही. परंतु स्वप्नपूर्ती केवळ ते पाहण्याने पूर्ण होत नाही. त्यासाठी योग्य पावले उचलावी लागतात. अशी पावले उचलण्यासाठी त्या क्षेत्रातील मुरलेला शिक्षण तज्ज्ञ हवा असतो. डॉ. ब्राह्मणकर हे अतिशय मुरलेले शिक्षण तज्ज्ञ आहे.




## डॉ. ब्राह्मणकरांमुळे पुरस्काराचाही सन्मान

डॉ. ए. बी. ब्राह्मणकर यांना महाराष्ट्र राज्य वाणिज्य परिषदेतर्फे कॉमर्स अँड मॅनेजमेंट एज्युकेशन पुरस्काराने गौरवण्यात आले होते. गोरेगाव येथील न्यू झील्ड होस्टेल येथे नियोजन मंडळाचे सदस्य डॉ. भालचंद्र मुणगेकर यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला होता. डॉ. ब्राह्मणकर यांनी मालेगाव, अमळनेर, धुळे येथे नऊ वर्षे प्राध्यापक म्हणून काम केले. पुणे विद्यापीठाच्या वाणिज्य विद्या शाखेचे ते अधिष्ठाता होऊन गेले. १९६८ मध्ये त्यांनी पुणे विद्यापीठातून डॉक्टरेट मिळविली. १९६९ ते १९९६ या कालावधीत त्यांनी नाशिक जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाच्या सिन्नर, पिंपळगाव बसवंत, सटाणा व देवळाली कॅम्प येथील महाविद्यालयांचे प्राचार्य पद भूषविले. त्यांनी आत्तापर्यंत ३२ ग्रंथांचे लेखन केले. पुणे विद्यापीठाच्या विविध पदांवर कामही केले. त्यांना मिळालेला पुरस्कार वाणिज्य व्यवस्थापन शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या योगदानासाठी मिळाला होता. वाणिज्य परिषदेच्या वतीने हिंदुजा वाणिज्य महाविद्यालय मुंबईत पुरस्कार देण्यात आला, त्यावेळी हिंदुजा समूहाचे दास, मुंबई विद्यापीठाचे गुणवंत सावंत, प्राचार्य शिवरे, विठ्ठल कामत प्रा. पंडित पलांडे यांच्यासारखे अनेक शिक्षणतज्ज्ञ उपस्थित होते. या सर्व पुरस्कारामुळे पुरस्कारांचाही सन्मान झाला असे त्या काळात बोलले जात होते विशेष म्हणजे एवढी विपुल ग्रंथसंपदा समाजासाठी सादर करूनही सर आजही नियमित वाचनात मग्न असतात हे विशेष.

## माझा पत्रकारितेतील प्रवास डॉ. ब्राह्मणकरांमुळेच!

सटाणा महाविद्यालयात 1985 ते 1987 यादरम्यान नोकरी करीत असताना एम. फिल्. करण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी अर्थातच डॉ. ब्राह्मणकर यांचीच प्रेरणा होती. अमरावती विद्यापीठात प्रवेश मिळाल्यानंतर एका वर्षातच पदवी मिळाली. त्यानंतर ब्राह्मणकर सरांनी माझा महाविद्यालयात सत्कार समारंभ आयोजित केला. कार्यक्रमाची बातमी त्यावेळी 'गावकरी' या वृत्तपत्रात प्रसिद्ध झाली व याच दरम्यान नाशिक मध्ये दैनिक 'सकाळ'चे आगमन झाले होते. त्या दैनिकाचे संपादक ज्येष्ठ साहित्यिक उत्तम कांबळे यांनी सत्काराची बातमी वाचली. माझा संशोधनाचा विषय 'रोजगार हमी योजनेत काम करणाऱ्या मजुरांच्या आर्थिक व सामाजिक समस्यांचे अध्ययन' असा होता. त्यावेळी 'सकाळ' मधील बाबर नावाचे कर्मचारी माझ्या सिन्नर येथील निवासस्थानी आले व कांबळे साहेबांनी भेटायला बोलावले असा निरोप दिला. तोपर्यंत कांबळे साहेबांची व माझी ओळख देखील नव्हती. माझ्या संशोधनाच्या विषयाला अनुसरून त्यांनी 'सकाळ'साठी पत्रकारिता करा असे सांगितले. त्यासाठी लागणारे सर्व ट्रेनिंग 'सकाळ'मध्ये दिले जाईल, असे त्यांनी सांगितले. यथावकाश प्रशिक्षण पूर्ण करून 'सकाळ'मध्ये पत्रकारिता सुरू केली ती आजतागायत सुरू आहे. त्यामुळे माझ्या पत्रकारितेतील पाया देखील ब्राह्मणकर सरांमुळेच रचला हे अत्यंत नम्रतेने नमूद करावेसे वाटते.

## ➤ महत्त्वाचे

### पेठला कृषी विभागाची भातपिक शेतीशाळा संपन्न

**पेठ ।** तालुक्यातील वडपाडा येथे उपविभागीय कृषी अधिकारी रविंद वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प अंतर्गत भात पिक शेतीशाळा घेण्यात आली. या शेतीशाळेत शेतकऱ्यांना भात पिकावरील प्रमुख रोग करपा,



पर्णकोष करपा, तपकिरी ठिपके, अभासमयी काजळी, उदबत्ता, कडा करपा, आदी व भात पिकावरील प्रमुख कीडी खोड कीडा, गादी माशी, हिरवे तुडतुडे, सुरळी अळी, पाने गुंडाळणारी अळी विषयी माहिती देण्यात आली व त्यांचे जीवनचक्र, भात पिकावर होणारा परिणाम व त्याचे व्यवस्थापन या विषयावर मंडळ कृषी अधिकारी जाणू गावित यांनी माहिती दिली. याप्रसंगी होस्ट फार्मर् पांडुरंग गावित, जयराम गावित, युवराज गावित, सोमनाथ गावित, सविता गावित, वामन भंडारी शेतकरी उपस्थित होते, शेतीशाळेसाठी तालुका कृषी अधिकारी प्रशांत रहाणे ,उप कृषि अधिकारी साबळे, सहाय्यक कृषि अधिकारी एम. एम. देशमुख आदीनी मार्गदर्शन केले.

### डॉ. रबाब भगत सेट परीक्षा उत्तीर्ण



**नाशिक ।** सहाय्यक प्राध्यापक होण्यासाठी घेण्यात येणाऱ्या युजीसी अंतर्गत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ तर्फे घेण्यात येणाऱ्या महाराष्ट्र एलिजिबिलिटी टेस्ट (M-SET) परीक्षेत पुणे विद्यार्थी गृह संस्थेच्या शिक्षणशास्त्र व संशोधन महाविद्यालयाच्या प्राध्यापिका डॉ.रबाब भगत या इंग्लिश विषयातून सेट परीक्षा उत्तीर्ण झाल्या. या अगोदर त्या शिक्षणशास्त्र विषयातून सेट परीक्षा उत्तीर्ण झालेल्या असुन शिक्षणशास्त्र विषयात त्यांची पी.एच डी पुर्ण केली. या प्रसंगी महाविद्यालयातर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुरेश पाटील, प्रा.डॉ.अरविंद जिंजर, प्रा. रोहिणी भालेराव, प्रा. अनिता बोडके, प्रा. निकिता जोगळेकर, प्रा. प्रीती पाटील यासह महाविद्यालयाचे विद्यार्थी, शिक्षक उपस्थित होते. यावेळी पुणे विद्यार्थी गृहाचे सेक्रेटरी संजय गुंजाळ यांनी प्रा.डॉ.भगत यांचे संस्थेतर्फे अभिनंदन केले.

### ज्ञानदेव आखाडे यांचे निधन

**पंचवटी ।** मखमलाबाद रोड येथील रहिवासी



ज्ञानदेव भिकाजी आखाडे (६७) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. सनदी अधिकारी संजय आखाडे, मविप्र संस्थेचे जनसंपर्क अधिकारी रवींद्र आखाडे व सेतू केंद्राचे संचालक जितेंद्र आखाडे यांचे ते वडील होत. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, सुना, मुलगी, जावई, चार भाऊ, दोन बहिणी, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे.

# विद्यार्थ्यांनी नवनव्या संधी स्वीकारून आव्हाने पेलावी; मान्यवरांचा सल्ला




**नाशिक ।** विद्यार्थ्यांनी उच्चशिक्षण घेऊन आपल्या गुणवत्तेचा उपयोग समाज उन्नतीसाठी करावा. नोकरीपेक्षा व्यवसाय करुन अनेकांना रोजगार द्यावा. जग सतत बदलत असून प्रत्येक दिवशी परिवर्तन होते. त्याबरोबर नवनव्या क्षेत्रात येणाऱ्या संधी स्वीकारून आव्हाने पेलावी असा सल्ला मान्यवरांनी दिला.

अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था आणि समाज सहायक संस्थेतर्फे गुणवंत विद्यार्थी सन्मान सोहळ्याचे आयोजन काल शिक्षकदिनी करण्यात आले. त्र्यंबक रोडवरील सिबल हॉटेलजवळ असलेल्या संस्थेच्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे मुंबई उच्च न्यायालयातील वकील लक्षवेध ओढेकर, दुबईतील सनदी लेखापाल राहूल कुलकर्णी, श्रीगुरुजी रुग्णालयाचे अध्यक्ष प्रवीण बुरकुले यांनी मार्गदर्शन केले. व्यासपीठावर अध्यक्ष ॲड.अविनाश भिडे, कोषाध्यक्ष प्रविण कुलकर्णी उपस्थित होते. सचिव ॲड.सुहास भणगे यांनी स्वागत व कार्याध्यक्ष अनिल देशपांडे यांनी प्रास्ताविक केले. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते मंत्रघोषात दीपप्रज्वलन करण्यात आले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते इयत्ता अकरावी पासून पुढे पदव्युत्तर पदवीधारक अशा ७५ गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिक, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. स्नेहल सारंग यांनी सूत्रसंचालन केले. ॲड. समीर जोशी यांनी आभार मानले. यावेळी विद्यार्थ्यांसह त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### या मान्यवरांचा झाला विशेष सन्मान!

श्रीराम दत्तात्रय महाजन, ॲड.मिलींद मधुकर चिंधडे, पवन ओंकारनाथ जोशी, धनंजय अनंत पुजारी, उदय रमाकांत जोशी, भूषण शशीकुमार तळेकर, देवांग जयंतीभाई जानी, अमोल विलास कुलकर्णी, डॉ.सचिन सुरेश पाडेकर, लक्ष्मीकांत निळकंठ पारनेरकर, मुकुंद चिंतामण भट, मंगेश खाडिलकर, राहुल रमेश कुलकर्णी, चंद्रशेखर पंचाक्षरी यांना मानाची शाल, पगडी तसेच सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

• स्व. सुरेखाताई भोसले निवासी खो खो प्रबोधिनीच्या दुर्गम भागातील राष्ट्रीय सुवर्णपदक विजेत्या खेळाडू विद्यार्थीनींना समाज सहाय्यक संस्थेतर्फे २१००० रुपयांचे अर्थसाह्य करण्यात आले. धनादेश देण्यात आला.

# मनमाड शहरात ईद-ए-मिलादनिमित्त भव्य शोभायात्रा

**मनमाड ।** संपूर्ण मानव जातीला शांती आणि सद्भावनेचा संदेश देणारे इस्लाम धर्माचे संस्थापक मोहम्मद पैगंबर यांची पंधराशेवी जयंती अर्थात ईद-ए-मिलादचा उत्सव सोमवारी शहरात पारंपारिक उत्साहात आणि जल्लोषात साजरा करण्यात आला. यानिमित्त शहरातून ईद-ए-मिलाची भव्य शोभायात्रा काढण्यात आली.




ईद निमित्त शहरात संपूर्ण मिरवणूक मार्गासह मुस्लिम बहुल भागात आकर्षक सजावट आणि रोषणाई करण्यात आली होती. विविध मशिदिमध्ये विद्युत रोषणाई करण्यात आली.शहरातील मुस्लिम बहुभागात ध्वज पथकांचे सजावट करण्यात आली. परंपरेनुसार विविध धार्मिक कार्यक्रम करण्यात आले. सोमवारी सकाळी जामा मशीद येथून भव्य शोभा यात्रेला प्रारंभ झाला.शहराच्या विविध मार्गाने जात असताना मुस्लिम बांधवांनी विविध घोषणांनी परिसर दणाणून सोडला. फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली. ध्वज,पताका,झेंडे आणि धार्मिक गीताने वातावरण ढवळून निघाले. विविध संस्था संघटना आणि राजकीय पक्षांतर्फे ईद-ए-मिलाद शोभा यात्रेचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. शोभायात्रेवर पुष्पवृष्टी करण्यात आली.प्रमुख मौलानांचा सत्कार करण्यात आला. शहर आणि परिसरात मौलानांच्या मार्गदर्शनाखाली पारंपरिक जूलुसमध्ये शहर परिसरातील मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.शहरातील विविध भागात आकर्षक सजावटीने परिसर उधळून निघाला. पोलीस निरीक्षक विजय करे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. ठिकठिकाणी लिंबू सरबत,ज्यूस,खाद्यपदार्थ,आईस्क्रीम यांचे वाटप करण्यात आले. हातात ध्वज पताका आणि घोषणा देणारे युवक मुस्लिम बांधव मिरवणुकीच्या वैशिष्ट्य ठरले. जामा मशीद येथून मौलाना असलम रसवी यांच्या नेतृत्वाखाली या भव्य जुलूसला प्रारंभ झाला. शहराच्या विविध मार्गाने जाऊन जामा मशीचे शोभायात्रेची सांगता झाली. सामाजिक शांततेसाठी येथील मुस्लिम बांधवांनी गणेश विसर्जनानंतर निर्णय घेतला होता. त्यानुसार सोमवारी भव्य जूलुस काढण्यात आला.

# दांडेकर टेक्निकल इन्स्टिट्यूटच्या अध्यक्षपदी सुहास शुक्ल बिनविरोध

**नाशिक ।** येथील नाशिक व्यवसाय विद्या प्रसारक मंडळ, संचलित दांडेकर टेक्निकल इन्स्टिट्यूटच्या अध्यक्षपदी सुहास गोपाळ शुक्ल यांची एकमताने नियुक्ती करण्यात आली. त्यांनी संस्थेचा सर्वतोपरी विकास करण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याची ग्वाही यावेळी दिली.



शताब्दीकडे वाटचाल करणाऱ्या दांडेकर टेक्निकल इन्स्टिट्यूटच्या कार्यकारिणीची नुकतीच सर्वसाधारण सभा झाली. यावेळी सर्वानुमते सुहास गोपाळ शुक्ल यांची बिनविरोध नियुक्ती करण्यात आल्याचे संस्थेच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी जाहीर केले. उपाध्यक्ष - अरुण पैठणकर, सचिव -प्राचार्या मानसी देशमुख, कोषाध्यक्ष - उदय दांडेकर यांचीही सर्व सदस्यांनी एकमताने निवड केली. सदस्यपदी सुभाष सबनीस, दिलीप डोंगरे, बाळासाहेब कुलकर्णी, सुधाकर पोळ, संजय खानझोडे, नीलेश देशपांडे, निळकंठ कुलकर्णी, हेमा दांडेकर यांचीही पुढील ३ वर्षांसाठी निवड झाली. त्याबद्दल सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत आहे. संस्थेने आतापर्यंत अनेक महिलांना स्वावलंबी बनविले आहे. तसेच महिलांच्या सक्षमीकरणासाठी सातत्याने विविध प्रकारचे अभ्यासक्रम व उपक्रम राबविण्यात येतात.

# पुनर्भेट होताच 'जेसीपीआर'चे अनेक विद्यार्थी गहिवरले!

**अहिल्यानगर ।** त्या सर्वांची सुमारे ३६ वर्षांनी भेट झाली. नगर महाविद्यालयात शिकणाऱ्या पत्रकारिता अभ्यासक्रमाचे विद्यार्थी काल परवा गेटटुगेदर कार्यक्रमात भेटले. त्याच वेळी इतक्या वर्षानंतर गाठी भेटी होताच एकमेकांना मिठी मारताच अनेकांच्या डोळ्यातून अश्रुधारा वाहू लागल्या. शिक्षणानंतर आपले आयुष्य कसे गेले, कोणी कोणती नोकरी पकडली. मुलंबाळं काय करतात, असे कितीतरी मनात साठलेले...ते कसं व्यक्त व्हावे, हेच कुणाला समजेना...



## पत्रकारिता संज्ञापन आणि जनसंपर्क विभाग कार्यक्रम

हा स्नेह संमेलनाचा कार्यक्रम नुकताच याच बँचचे एक विद्यार्थी आणि अभियंता असलेले अविनाश कुलकर्णी यांच्या नगर तालुक्यातील आणि चास - निमगाव वाघा रोडवर असलेल्या मधुबन या फार्महाऊसवर मोठ्या उत्साहात पार पडले. नगर महाविद्यालयात १९८९ ते १९९० या वर्षी जिल्ह्यात पहिल्यांदाच पत्रकारिता अभ्यासक्रम निर्माण करण्यात आला. त्या दृष्टीने ही बँच ऐतिहासिक ठरली.

शेतातील, फळबागेतील रान मेव्याचा आणि कुलकर्णी यांनी मोठ्या प्रेमाने केलेल्या जेवणाचा आस्वाद घेत हे सारे सवंगडी गप्पागोष्टीत रमून गेले. सर्वजण सुना- नातवंडात रममाण झाल्याचे जाणवले. कार्यक्रमाच्या सुरवातीला प्रत्येकाने परिचय करुन दिला. याच बँचचे एक विद्यार्थी आणि आता जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे महा व्यवस्थापकपदी निवड झालेले सुरेश पाटील यांचा स्मृतीचिन्ह, शाल, श्रीफळ देऊन विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी बंडेलु यांनी पत्रकारिता अभ्यासक्रम सुरू करण्यामागील कारणमीमांसा स्पष्ट केली. माजी समाजकल्याण अधिकारी रफीक मुंशी यांनी अभ्यासक्रमातील गमतीजमती सांगितल्या. सुषमा जाधव यांनी नोकरीतील अनुभव कथन केले. श्रीमती मुनोत यांनीही विचार व्यक्त केले. यावेळी प्रत्येकाने आपले मनोगत व्यक्त केले. निजाम जहागिरदार यांच्या शेरशायरीचा कार्यक्रम रंगत गेला. आभार अविनाश कुलकर्णी यांनी मानले. कार्यक्रमास जिल्हा सहकारी बँकेचे माजी अधिकारी सुनील भांड, जेष्ठ पत्रकार कैलास ढोले, गोदावरी अकादमीचे संचालक बाजीराव खांदवे, ठेकेदार विनय काळे, प्रकाशजीत अमर, ज्येष्ठ पत्रकार शिल्पा रसाळ, शकूर शेख, मनपाचे माजी कर्मचारी दिगंबर कोंडा, व्यावसायिक सुश्मिता अय्यंगार, अजिता एडके आदी उपस्थित होते.

### प्रत्येकाच्या अनुभवामुळे वातावरण भारावले

मोठ्या अपघातानंतर अनेक अडचणींवर मात करून यशस्वी झालेल्या नगर आकाशवाणीच्या निवेदिका सुषमा जाधव- अमर यांचा या वेळी सत्कार करण्यात आला. मर्चंट बँकेच्या संचालिका मीनाताई मुनोत यांचाही वाढदिवसानिमित्त सत्कार करण्यात आला. यावेळी पत्रकार अभ्यासक्रमाच्या माजी शिक्षिका निलिमा बंडेलु यांच्या ''अगापे'' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. शहरातील पुस्तके विक्रेते दत्ताभाऊ परभणे यांनी उपस्थित सर्वांना पुस्तके भेट दिली. तसेच कवयत्री अमृता खाकुर्डीकर यांनी स्वतः लिहलेल्या कळ्या - पाकळ्या या काव्यसंग्रहाचे वाटप करण्यात आले. त्या पुण्याहून या कार्यक्रमास उपस्थित राहिल्या. यावेळी बोलताना पाटील म्हणाले, पत्रकारिता अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर सुरवातीस काही काळ मी ज्येष्ठ नेते बाळासाहेब विखे पाटील व यशवंतराव गडाख यांच्याकडे खासगी सहायक म्हणूनही काम केले. मात्र गडाखांनी दिलेल्या 'मोठा अधिकारी हो' या प्रोत्साहनामुळे मी वेगवेगळ्या नोकऱ्या करीत नंतर जिल्हा बँकेत क्लार्क म्हणून सुरवात केली. नंतर एक एक पदांवर आरुढ होत आता बँकेच्या महाव्यवस्थापक पदी काम करीत आहे. आपल्या सर्वांच्या सदिच्छा आणि पत्रकारिता अभ्यासक्रम यासाठी मला उपयोगी पडला, असे शेवटी पाटील यांनी नमूद केले.

# अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करणारा नराधम बाप जेरबंद

## गंगापूर पोलिसांची धडक कारवाई



**नाशिक ।** समाजाला हादरवून टाकणाऱ्या अतिसंवेदनशील गुन्ह्यात गंगापूर पोलिसांनी नराधम बापास अटक करून धडक कारवाई केली आहे. गंगापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार अल्पवयीन मुलीच्या तब्येतीत बिघाड झाल्याने आईने तिला शासकीय रुग्णालयात दाखल केले. तेथे वैद्यकीय तपासणीत पीडिता सात आठवड्यांची गर्भवती असल्याचे उघड झाले. त्यावरून गंगापूर पोलिसांकडे तक्रार दाखल झाली. सुरुवातीला पीडिता व तिची आई चौकशीस टाळाटाळ करत होत्या, मात्र सखोल तपासात संशयाची सुई मुलीच्या वडिलांवर गेली. तपास अधिकारी सपोनि पुनम पाटील यांनी पीडिता व गर्भाचे तसेच वडिलांचे डि.एन.ए सॅम्पल घेऊन प्रयोगशाळेकडे पाठवले. न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळेच्या अहवालानुसार पिडीतेच्या वडिलांनीच स्वतःच्या मुलीवर लैंगिक अत्याचार करून ती गर्भवती असल्याचे स्पष्ट झाले. हा अहवाल आल्यानंतर पोलिसांनी आरोपीचा शोध घेतला. आरोपी आठ दिवसांपासून घरातून फरार होता. त्याचा मोबाइल घरीच आढळून आला. तो नवीन सिमकार्ड वापरत असल्याचे लक्षात आल्यानंतर गुन्हे शोध पथकाने तांत्रिक विश्लेषण करून आरोपीचा माग काढला. अखेर पोउनि मोतीलाल पाटील व पथकाने आरोपीस शिवाजीनगर, नाशिक येथून सापळा रचून अटक केली. चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली. या धाडसी कामगिरीत पोलीस आयुक्त संदीप कर्णीक, परिमंडळ-1च्या पोलीस उपायुक्त मोनिका राऊत, सहा. पोलीस आयुक्त नितीन जाधव, गंगापूर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जग्वेंद्रसिंग राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि पुनम पाटील, सपोनि निखील पवार, पोउनि मोतीलाल पाटील, परि.मपोउनि प्रियंका कवाद, पोहवा रविंद्र मोहीते, पोअं मुकेश गांगुर्डे, पोअं घनश्याम भोये, पोअं मच्छिंद्र वाकचौरे, पोअं राकेश राउत, पोअं विजय नवले, पोअं तुषार मंडले व मपोहवा रिना आहेर यांनी सहभाग नोंदविला. पुढील तपास म.सपोनि पुनम पाटील करीत आहेत.

# कोट्यवधींचा गोरखधंदा

## विंचूर-लासलगाव परिसरात रेशन माफियांचे साम्राज्य

**नाशिक ।** निफाड तालुक्यातील विंचूर परिसरात रेशन धान्याच्या काळाबाजाराचे मोठे रॅकेट कार्यरत असून, यामध्ये कोट्यवधी रुपयांची उलाढाल केली जात असल्याचे धक्कादायक वास्तव उघडकीस आले आहे. विष्णुनगर येथील देवकी लॉन्सजवळील मोठ्या गोडाऊनमधून रेशनचा तांदूळ व गहू बाहेर काढून काळ्या बाजारात विक्रीचा प्रकार उघडकीस येत आहे.

स्थानिक सूत्रांच्या माहितीनुसार, कोपरगाव, सायखेडा, चांदोरी, नगर, लासलगाव आदी भागांतून मोठ्या प्रमाणावर तांदूळ विंचूरमध्ये जमा केला जातो. त्यानंतर हा साठा चांदवडमार्गे उमराणा येथे पोहोचवला जातो. उमराणा परिसरातील तांदूळ माफिया हा माल थेट गुजरातमध्ये पाठवतात. तेथील राईस मिलमध्ये पॉलिश करून तोच तांदूळ दुप्पट भावाने बाजारात विकला जातो. अशा प्रकारे गरीबांना मिळणारे रेशन धान्य माफियांच्या खिशात जात असून दरमहा कोट्यवधींची उलाढाल होते, असे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे. यामध्ये विंचूर आणि लासलगाव येथील काही मोठ्या व्यापाऱ्यांचा सहभाग असल्याची जोरदार चर्चा सुरू आहे. त्यामुळे या अड्ड्याला राजकीय व प्रशासकीय वरदहस्त आहे का असा सवाल उपस्थित केला जात आहे.इतक्या मोठ्या प्रमाणात रेशन धान्याची अफरातफर होत असताना पुरवठा विभाग याबाबत अनभिज्ञ असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. पुरवठा विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आशीर्वादानेच हा काळाबाजार फोफावतोय, अशी नागरीकांमध्ये चर्चा आहे. गरीबांच्या तोंडचा घास हिरावणाऱ्या या टोळीवर तात्काळ कारवाई व्हावी, गोडाऊन सील करून जबाबदारांना अटक करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. अन्यथा हा मुद्दा आणखी चिघळण्याची शक्यता वर्तविली जात आहे. उमराणा मार्गे धान्याची अवैध वाहतूक होत असल्याचा तपास स्थानिक पोलिसांनी सुरू केल्याची माहिती मिळते आहे.



**वर्षांपूर्वी विंचूर परिसरात लहान प्रमाणात धान्य गोळा करून पोटापाण्याचा व्यवसाय करणारे काही लोक आज मोठे डीलर बनले आहेत. सुरुवातीला किरकोळ प्रमाणात सुरु झालेला हा गोरखधंदा आज कोट्यवधी रुपयांचा काळाबाजार ठरला आहे.**

- **विष्णुनगर (देवकी लॉन्सजवळ) असलेले गोडाऊन या धंद्याचे मुख्य केंद्र.येथे गुप्तपणे रेशनचा तांदूळ व गहू जमा होतो.**
- **कोपरगाव, सायखेडा, चांदोरी, नगर, लासलगाव आदी भागातून धान्य गोळा करून विंचूरमध्ये साठवण.**
- **अवैध वाहतूक व गुजरात कनेक्शन**
- **चांदवडमार्गे उमराणा येथे धान्य पाठवले जाते.**
- **उमराणा येथून थेट गुजरातमधील राईस मिलकडे धान्य रवाना.**
- **पॉलिशिंग करून त्याच धान्याची बाजारात दुप्पट भावाने विक्री.**
- **विंचूर व लासलगाव येथील व्यापाऱ्यांचा थेट सहभाग.**
- **महिन्याकाठी कोट्यवधींचा व्यवहार.**

# मविप्र विद्यापीठाचा विषय होणार वलयांकित

## मविप्र संस्थेची १४ सप्टेंबरला वार्षिक सर्वसाधारण सभा




**नाशिक ।** "बहुजन हिताय, बहुजन सुखाय" हे ब्रीद ध्यानी घेऊन लोकाश्रयाच्या गोमट्या बळावर स्थान झालेल्या मराठा विद्या प्रसारक संस्थेचा अतिविशाल वटवृक्ष फोफावला आहे. अनेक कर्मवीरांनी घालून दिलेल्या नीतिमूल्ये, आदर्शांचा वारसा पुढे नेटाने चालविला जात असून, संस्थेने शिक्षण क्षेत्रात लक्षणीय प्रगती साधली आहे. सभासद, विद्यार्थी, पालकहित डोळ्यासमोर ठेऊन संस्थेचे पारदर्शक कार्य सुरू असल्याचे प्रतिपादन संस्थेचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे यांनी केले.

मविप्र संस्थेची दि. १४ सप्टेंबर रोजी वार्षिक सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली आहे. त्या पार्श्वभूमीवर मविप्रच्या कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी ठाकरे यांनी संस्थेच्या कार्याचा लेखाजोखा सादर केला. लोकाश्रयाच्या बळावर संस्थेने आतापर्यंत ५१० ज्ञानशाखांचा विस्तार केल्याचे त्यांनी सांगितले. अठरापगड जातीतील लाखो विद्यार्थ्यांची संस्थेने जीवांबग फुलविली आहे. संस्थेने शिस्त, गुणवत्ता आणि पारदर्शकता ही त्रिसूत्री जोपासली आहे. संस्थेने सर्वच क्षेत्रात चांगली प्रगती केल्याचे ठाकरे यांनी सांगितले. सूत्रे हाती घेतल्यापासून कार्यकारिणी मंडळाने मागील कर्ज फेडले असून, नव्याने कोणतेही कर्ज घेतले नसल्याचे त्यांनी सांगितले. संस्थेची आर्थिक स्थिती भक्कम असून, नवीन बांधकाम सुरू असल्याचेही ठाकरे म्हणाले. संस्थेचे कामकाज चांगल्या प्रकारे सुरू असून, सभासदांमध्ये समाधानाचे वातावरण असल्याचे त्यांनी सांगितले. दि. १४ रोजी होऊ घातलेल्या संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मविप्र विद्यापीठाचा विषय मांडण्यात येणार आहे. गेल्या काही दिवसांपासून विद्यापीठाचा विषय वलयांकित झाला आहे. संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले यांनीच संस्थेच्या स्वतंत्र विद्यापीठ स्थापनेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केल्याने मविप्र संस्थेत सध्या अध्यक्ष विरुद्ध कार्यकारिणी असे शीतयुद्ध रंगले आहे. ढिकले यांनीच हा विषय सभासदांच्या माहितीसाठी वार्षिक सर्वसाधारण सभेवर ठेवण्याची सूचना केली असल्याने हा विषय अधिकच अधोरेखित झाला. संस्थेकडे जागा उपलब्ध आहे. त्यासाठी वेगळा निधी उभारण्याची गरज नाही. नवीन शैक्षणिक धोरणानुसार कधीना कधी संस्थेला विद्यापीठ स्थापन करावे लागणार आहे किंवा दुसऱ्या संस्थेच्या विद्यापीठाशी संलग्न व्हावे लागेल. मग संस्थेने स्वतःचे विद्यापीठ स्थापन करायचे नाही का, असा प्रतिप्रश्न सरचिटणीस ठाकरे यांनी उपस्थित केला. विद्यापीठ हे संस्थेच्याच अधिपत्याखाली राहणार आहे. त्यामुळे विद्यापीठाला कुठलीही अडचण नाही. असे असताना उगाचच साप साप म्हणून भुई बडविली जात असल्याचे ठाकरे म्हणाले. संस्थेच्या शिष्टमंडळाने इतर संस्थांच्या विद्यापीठांना भेट दिली. या शिष्टमंडळात अध्यक्ष ढिकले हेही होते, असेही ठाकरे म्हणाले.

या वर्षी होऊ घातलेली वार्षिक सर्वसाधारण सभा लक्ष्यवेधी होणार असून, या सभेत घडणाऱ्या घडामोडींकडे सभासदांचे लक्ष वेधले आहे. पत्रकार परिषदेला संस्थेचे उपाध्यक्ष मोगल, सभापती बाळासाहेब क्षीरसागर, संचालक संदीप गुळवे यांच्यासह अन्य पदाधिकारी आणि संचालक उपस्थित होते.

# 'लायन्स'कडून २२ गणेश मंडळांचा गौरव



**सिन्नर ।** लायन्स क्लब ऑफ सिन्नर सिटी व सिन्नर पोलिस ठाण्यातर्फे गणेश मंडळांचा गौरव करण्यात आला. २२ मंडळांचे अध्यक्ष, उपाध्यक्षांना फेटे बांधून सन्मानीत केले.

लायन्स क्लब ऑफ सिन्नर सिटीचे अध्यक्ष बबनराव वाजे, सचिव जयवंत काळे, प्रशांत शिंदे, मनीष गुजराथी, उदय देवनपल्ली, श्यामराव देशमुख, तृप्ती काळे, पोलिस निरीक्षक हेमंतकुमार भामरे, उपनिरीक्षक रमेश पाटील, हवालदार आप्पासाहेब काकड यांच्यासह छत्रपती शिवाजी महाराज चौक मंडळाचे सदस्य उपस्थित होते. मंडळांनी अपघाताविना काढलेली मिरवणूक, मिरवणुकीत राखलेली शांतता, सामाजिक संदेश देणारे देखावे यामुळे मंडळांना प्रोत्साहन मिळावे यासाठी गौरव सोहळा पार पडला. गंगावेस पासून छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौकात प्रत्येक मंडळाच्या अध्यक्ष व उपाध्यक्षांना मानाचा फेटा बांधण्यात आला. मंडळांनी सामाजिक संदेश देणारे देखावे, सामाजिक ऐक्य राखत चांगले प्रदर्शन केले. मिरवणुकीतही सिन्नरच्या चांगल्या मिरवणुकीचा लौकिक कायम ठेवला त्यामुळे त्यांचा गौरव करण्यात आल्याचे अध्यक्ष बबनराव वाजे यांनी सांगितले. पोलिस निरीक्षक हेमंतकुमार भामरे यांनी मंडळांनी कायदा, सुव्यवस्था पाळत पोलिसांना सहकार्य केल्याबद्दल मंडळांचे आभार मानले.

# शिलापूर येथे इलेक्ट्रिक टेस्टिंग लॅबचे आज उद्‌घाटन

## केंद्रीय ऊर्जामंत्री खट्टर, मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती

**नाशिक ।** राज्याचे पुरवठामंत्री छगन भुजबळ व माजी खासदार समीर भुजबळ यांच्या विशेष प्रयत्नांतून शिलापूर येथे सीपीआरआय अर्थात नाशिक इलेक्ट्रिक टेस्टिंग लॅब साकारण्यात आली आहे. या लॅबचे आज (दि.१०) दुपारी २ वाजता केंद्रीय ऊर्जा मंत्री मनोहरलाल खट्टर, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हस्ते आणि ना. भुजबळ, जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांच्या विशेष उपस्थितीत होणार आहे.

या प्रकल्पामुळे नाशिकसह महाराष्ट्रातील औद्योगिक व इलेक्ट्रिकल क्षेत्राला कलाटणी मिळणार आहे. नाशिकच्या औद्योगिक वसाहतीत इलेक्ट्रिकलचे सुमारे साडेचारशेहून अधिक लघु आणि माध्यम उद्योग आहेत. त्यांना इलेक्ट्रिकल पॅनल्स आणि इतर वीज उपकरणांच्या निर्मितीनंतर टेस्टिंग करण्यासाठी सद्या भोपाळ व बॅ बँगलोरला जावे लागते. त्यामुळे नाशिकमध्ये इलेक्ट्रिकल टेस्टिंग लॅब स्थापन करण्याची नाशिकच्या उद्योजकांची मागणी होती. याबाबत तत्कालीन पालकमंत्री छगन भुजबळ यांनी नाशिकच्या उद्योजकांना सदर लॅब स्थापन करण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार भुजबळ आणि माजी खासदार समीर भुजबळ यांच्या प्रयत्नांमुळे नाशिकमध्ये इलेक्ट्रिक टेस्टिंग लॅब मंजूर करण्यात आली. शिलापूर येथे शंभर एकर जमिनीमध्ये हा प्रकल्प साकारण्यात आलेला आहे. शिलापूर येथील इलेक्ट्रीक टेस्टिंग लॅब हा प्रकल्प नाशिकमधील विद्युत अभियांत्रिकी क्षेत्राला कलाटणी देणारा असा प्रकल्प आहे. केंद्रीय विद्युत अनुसंधान संस्थान म्हणजेच सेन्ट्रल पॉवर इंस्टीट्युट या केंद्र सरकारच्या अखत्यारीतील खात्याने पश्चिम भारतात हा इलेक्ट्रीक टेस्टिंग प्रकल्प सुरु करण्याचा निर्णय घेतला. फेब्रुवारी २०१३ मध्ये नाशिकसाठी हा प्रकल्प मंजुर झाला. जिल्हाधिकारी कार्यालयात सी.पी.आर.आय चे महानिदेशक आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेतली. शिलापूर येथील १०० एकर जागा नाममात्र दराने देण्याची तयारी दर्शवून तत्कालीन जिल्हाधिकारी विलास पाटील आणि सी.पी.आर.आय चे महानिदेशक यांच्यामध्ये सामंजस्य करार घडवून आणला. त्यानंतर जिल्हा प्रशासनाच्या मदतीने दि.१५ ऑगस्ट २०१३ रोजी शिलापूर ग्रामपंचायतीकडून ग.नं. २२० ही जागा या प्रकल्पाला देण्यासाठी ठराव करून घेतला. ३१ जानेवारी २०१९ रोजी या प्रकल्पाचे भूमिपूजन करून कामास प्रारंभ करण्यात आला. सुमारे २१६ कोटी रुपये खर्च करून या प्रकल्पाचे काम पूर्ण करण्यात आले आहे. सीपीआरआय ही केवळ एक प्रयोगशाळा नाही, तर ती विद्युत सुरक्षेची, संशोधनाची आणि उद्योगविश्वाला दिशा देणारी एक महत्वाची संस्था आहे.



## महत्त्वाचे

### संदीप फाऊंडेशनच्या प्रांगणात राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात

**नाशिक ।** संदीप फाऊंडेशन व संदीप विद्यापीठाच्या प्रांगणात मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिवस हा राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरा करण्यात आला. या प्रसंगी आयोजित करण्यात आलेल्या विविध खेळ स्पर्धा प्रकारात विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला. कबड्डी, व्होलीबॉल, बास्केटबॉल, चेस आदी स्पर्धांचे चे आयोजन करण्यात आले. मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन संस्थेचे चेअरमन डॉ. संदीप कुमार झा, यांच्या हस्ते करण्यात आले. संदीप विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ.परेश रेगे यांनी मेजर ध्यानचंद यांच्या विषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली. प्राचार्य डॉ. दिपक पाटील, प्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बोरसे, प्राचार्य डॉ. अमोल पोटगंतवार, प्राचार्य पंकज धर्माधिकारी यांनी खेळाडूंना राष्ट्रीय खेळ दिवसाच्या शुभेच्छा दिल्या. मेंटर प्रा. प्रमोद करोले, श्री. विवेक निकम, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजेंद्र सिन्हा, कुलसचिव प्रा. प्रवीण भारती आदींनी शुभेच्छा दिल्या. यशस्वीतेसाठी डॉ.संदीप पाटील, प्रा.स्वप्निल करपे, प्रा.प्रशांत जोशी, प्रा.विजय कुटे यांनी परिश्रम घेतले.



# खड्डेयुक्त रस्त्यांच्या निषेधार्थ 'खड्डासन' रील स्पर्धा

## प्रहार जनशक्ती पक्षाचा उपक्रम




**नाशिक ।** गेल्या अनेक महिन्यांपासून शहर-जिल्ह्यात सुरू असलेले रस्त्यांवरील खड्ड्यांचे कवित्व अद्यापही संपलेले नाही. राजकीय पक्ष, संघटना, सेवाभावी संस्था-मंडळे आणि नागरिकांनी नाना प्रकारे आंदोलने करून, निषेध मोर्चे काढूनही ढिम्म प्रशासनाने रस्ते दुरुस्ती-डागडुजी तथा खड्डे दुरुस्तीची कामे समाधानकारक केलीच नाही. त्याच्या निषेधार्थ प्रहार जनशक्ती पक्षातर्फे "खड्डासन" रील स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

शहर-जिल्ह्यातील सर्वच रस्त्यांची अवस्था शोचनीय झालेली असून, रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात खड्डे पडलेले आहेत. त्याच्या विरुद्ध अनेक विविध प्रकारे आंदोलने झाली. निषेध मोर्चे काढण्यात आले. तरीही समस्या जैसे थेच आहे. खड्ड्यांच्या जाचामुळे त्रस्त झालेल्या नागरिकांनी खड्ड्यात बसून आंदोलने केली. खड्ड्यात झाडे लावली. खड्ड्यांवर कविता केल्या. खड्ड्यांची पूजा केली-आरती केली. नाना प्रकारे निषेध नोंदविला. अनेक निवेदने दिली तरीही हा जाच मिटलाच नाही. नाही म्हणायला त्या त्या विभागाच्यावतीने काडीने मलम लावावा त्याप्रमाणे अतितत्परतेने डागडुजीची कामे केली गेली. खड्डे बुजविल्याची जोरदार बोंब ठोकली गेली; परंतु ही अतितत्परतेची कार्यवाही तात्पुरती मलमपट्टी ठरली आणि हाल जैसे थेच राहिले. याचा तीव्र निषेध करीत प्रहार जनशक्ती पक्षाने आगळे वेगळे आंदोलन करीत निषेध करण्याचे ठरविले आहे. त्यानुसार पक्षातर्फे "खड्डासन" रील स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

प्रहार पक्षाने नमूद केले आहे की, नाशिक शहराच्या वतीने डिसेंबर २०२४ मध्ये मनपा आयुक्तांची भेट घेऊन निवेदन दिले होते. दोन-तीन महिन्यांमध्ये पक्षाने शहरातील रस्त्यावरील खड्डे, पाणी या प्रश्नावर आंदोलन केलेले आहेत, निवेदन दिलेली आहेत. तरीही महापालिका प्रशासनाकडून या नागरी समस्या बाबत सतत दुर्लक्ष केले जाते. आयुक्तांनी १८ जुलै २०२५ रोजी विविध ठिकाणी भेटी देऊन खड्डे बुजवण्याचे बांधकाम विभागाला आदेशित केले होते. महापालिकेच्या फेसबुक पेजवर ही बातमी होती; परंतु त्या दिवशी त्या दोन-तीन खड्ड्यांच्या व्यतिरिक्त शहरातील खड्डे बुजवले गेलेच नाहीत. त्यापेक्षाही जास्त शहरात खड्डे पडलेले आहेत. नागरिकांना, वाहनधारकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. बाहेरगावावरून धार्मिक कामानिमित्त, शासकीय कामानिमित्त, शैक्षणिक, आरोग्य, विविध कामानिमित्त जे नागरिक येतात आणि ते जेव्हा नाशिक वरून परत जातात तेव्हा ते नाशिक शहराच्या या परिस्थिती विषयी वाईट चर्चा करतात. नाशिक शहराची बदनामी होत असते. नाशिकची प्रतिमा मलिन होत असते. सतत महापालिका प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याबद्दल महापालिका प्रशासनाचा निषेध म्हणून प्रहार जनशक्ती पक्ष नाशिक शहर-जिल्हा यांचे वतीने 'खड्डा आसन' REELS स्पर्धा घेत असल्याचे पक्षाने म्हटले आहे. नाशिक जिल्ह्यात ४ मंत्री, १ खासदार, शहरातील ३ आमदार, महसूल विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, स्वतः महापालिका आयुक्त यांच्या या बाबीवर दुर्लक्ष का? हा शोधाचा आणि चिंतेचा विषय आहे.

# प्रभाग रचनेवरील हरकतींवर सुनावणी संपन्न; लवकरच निर्णय

**नाशिक ।** नाशिक महापालिका सार्वत्रिक निवडणूक प्रारुप प्रभाग रचनेवरील आलेल्या हरकतींवर मंगळवारी (दि. ९) सुनावणी घेण्यात आली.

नाशिक महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक प्रारुप प्रभाग रचनेवर विहित मुदतीत नागरिकांकडून प्राप्त झालेल्या हरकती व सुचनांवर सुनावणी घेण्यात आली. मंगळवारी सकाळी ११ वाजता महापालिका मुख्यालय राजीव गांधी भवनातील स्थायी समितीच्या सभागृहात सुनावणी पार पडली. नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांच्यावतीने प्राधिकृत अधिकारी तथा पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे यांच्या प्रमुख उपस्थितीत ही सुनावणी झाली. यावेळी मनपा आयुक्त मनिषा खत्री आणि अधिकारी उपस्थित होते. यावेळी नागरिकांच्या हरकती व सुचना ऐकून घेण्यात आल्या. नियोजित मुदतीत ६ विभागीय कार्यालये तसेच मनपा मुख्यालय येथे प्राप्त झालेल्या एकूण ९१ हरकती/सुचना यावर सदर सुनावणी घेण्यात आली. ज्या नागरिकांनी विहित मुदतीत लेखी हरकती/सूचना नोंदविलेल्या होत्या त्यांना नेमून दिलेल्या वेळेत प्रत्यक्ष उपस्थित राहून आपल्या हरकती व सूचना विस्तृतपणे मांडल्या यावर सखोल अभ्यास करून लवकरच योग्य निर्णय घेण्यात येईल, असे प्राधिकृत अधिकारी संजय खंदारे यांनी सांगितले. सुनावणी करिता उपयुक्त लक्ष्मीकांत साताळकर, उपायुक्त, शहर अभियंता संजय अग्रवाल, नगर नियोजन उपसंचालक दीपक वराडे, कार्यकारी अभियंता सचिन जाधव, नितीन पाटील, रवींद्र बागुल, रवी पाटील, नवनीत भामरे कार्यकारी अभियंता तसेच निलेश साळी, समीर रकटे, दत्तात्रय कोल्हे आदी उपस्थित होते.

महाराष्ट्रच नव्हे तर संपूर्ण देशातील राजकीय पक्षांचा कार्यकर्ता होणे आता मराठी तरूणांनी बंद केले पाहिजे. आई-वडिलांनी देखील आपल्या मुलांना राजकीय नेत्यांच्या मागे फिरणे बंद करा, असं सल्ला दिला पाहिजे. नेत्यांसाठी किंवा त्यांच्या पक्षासाठी तुरुंगाची वारी करणाऱ्या मुलांना आयुष्यभर अपयश येत असते. सध्या महाराष्ट्रात तर पक्ष कोणताही असो राजकीय पक्षांनी फक्त कार्यकर्ते वापरले, त्यांची सायंकाळची 'सोय' केली, पण आयुष्यभर सतरंज्या झटकायची जबाबदारी त्यांच्यावरच दिली. हाताच्या बोटावर मोजता येतील इतके कार्यकर्ते कदाचित उभे केले असतील. पण ते आयुष्यभर लाचारच बनले गेले आहेत. नवी पिढी त्या बाबतीत हुशार असली तरी नोकरीच्या व्यतिरिक्त त्यांची झेप पुढे जात नाही. अति हुशार तरुणांनी तर आपल्या बुद्धिमत्तेच्या बळावर अन्य प्रदेशात जाणे पसंत केले. त्यामुळे कुटुंबातील अन्य घटकांची प्रगती मात्र घटतच गेली. जी कोणी मराठी तरूणाई शिवसेना आणि मनसेचे समर्थन करणारी असतील, त्यांनी सध्या महाराष्ट्रातील परिस्थितीचे अवलोकन सखोल केले पाहिजे. परंतु शिवसेना आणि मनसेच्या विरोधातील तरुणांनी देखील ज्यांच्या मागे आपण उभे आहोत त्यांचाही अभ्यास केला पाहिजे. 'मराठी-मराठी' करून काहींनी अनेक पिढ्या बसुन खाता येतील, एवढी माया गोळा केलीय ही वस्तुस्थिती आहे. पण समोर काही वेगळे अन-समाधानकारक चित्र नाही. तरूणाई अजुनही त्यांच्या नेत्यांचे संदेश फॉरवर्ड करतेय, झेंडे मिरवतेय. मराठी मुद्दा, मराठी माणुस, मराठी अस्मिता यासाठी चाललेला लढा महाराष्ट्र पाहतोय. पण पोटापाण्याच्या प्रश्नावर मराठी माणसं रस्त्यावर का येत नाही? शिवसेनेची स्थापना १९६६ मध्ये झाली. हाच 'मराठी'चा मुद्दा घेऊन, मराठी माणसाच्या न्याय हक्कासाठी पहिल्याच दसरा मेळाव्यात बाळासाहेबांनी 'मद्रासी' विरोधात घोषणा दिली होती 'बजाव पुंगी हटाव लुंगी'. बाळासाहेब ठाकरे त्यांच्या जागेवर योग्य होते. कारण मराठी तरुणांनी व्यवसायात उतरावे व आपापल्या जागा नक्की कराव्या. पण तसे काही झाले का? त्यावेळी मेळाव्याहुन परतताना, शिवसैनिकांनी उडप्यांच्या हॉटेल्सवर हल्ले केले व ताकद दाखवून दिली. पण त्याचा परिणाम पुढे काय झाला, हे महाराष्ट्र व मराठी माणसं आज बघत आहे. आज २०२६ मध्ये म्हणजे तब्बल ६० वर्षांनी या मुंबई-महाराष्ट्रात, ह्याच शिवसेनेच्या नाकावर टिच्चुन याच मद्रास्यांचे लाखाच्या वर बार आणि रेस्टॉरंट आहेत. ही वस्तुस्थिती आपण नाकारणार का? मराठी माणसाला त्यावेळी हा व्यवसाय करण्याची संधी होती. कारण बाळासाहेब ठाकरे किंवा त्यांच्या संघटनेचे बळ मराठी माणसाच्या पाठीमागे ठाम उभे होते. आज मुंबई मराठी माणसाची असताना सर्वच व्यवसायावर बिगर मराठी माणसांचे वर्चस्व आहे. त्याला जबाबदार कोण ? याचे संशोधन कोण करणार ? मराठी जपलीच पाहिजे, मराठी माणूस जोपासलाच पाहिजे, पण त्यासाठी लढा देण्यासाठी मराठी माणसांमध्येच फूट पडलेली आहे, याकडे कोण लक्ष देणार?

# मराठी' तरूणांनी आता 'कार्यकर्ता' होऊ नये!







जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

महाराष्ट्रातील राजकीय पक्ष विविध जाती व धर्मामध्ये विभागले गेले आहेत. मराठी माणूस मध्य मुंबईच्या बाहेर फेकला गेला ही वस्तुस्थिती आहे. बाहेरून आलेल्या परप्रांतीयांनी अफाट मेहनत करून मुंबईत प्रॉपर्टी घेतल्या व व्यवसायात बस्थान बसविले. त्यांचे ग्राहक कोण आहे, तर ते सर्व मराठी माणस आहेत.

बारकाईने लक्ष दिले तर सर्व मोठ्या व्यापारावर आज गुजराती समाजाचं वर्चस्व आहे आणि मराठी माणुस त्यांच्याकडे नोकर म्हणुन राबतोय ही वस्तुस्थिती अमान्य करून चालणार नाही. संपूर्ण भारत देश ही आपलीच भूमी आहे. नोकरी व व्यापार करण्यासाठी कोणी कुठेही जाऊ शकतो.

आपण युपी, बिहार मधल्या भैयां विरोधात एक बिहारी लाख बिमारी आंदोलन करून पाहिले. परंतु मुंबईत आज व्यवसाय असो किंवा रस्त्यावरचा, फुटपाथवरचा व्यापार करणारा युवक असो, तो एक तर बिहारी किंवा यूपीचाच दिसतो. रेल्वेमध्ये तर संपूर्ण नेटवर्क त्यांचेच दिसते. राजकीय पक्षांच्या नेत्यांचे कार्यकर्ते मात्र आहे तिथेच राहिले.

मुंबई महाराष्ट्रा पासुन वेगळी होणार असा प्रचार दीर्घ काळापासून सुरू आहे. परंतु आता मुंबई मराठी माणसांची राहिली तरी किती? मुंबईत गिरण्या असताना मराठी माणूस त्या गिरण्यांमध्ये नोकरी करून आपल्या मुलाबाळांना मुंबईत स्थिरस्थावर करीत होता. दत्ता सामंतांचा गिरणी कामगारांचा संप मराठी माणसांच्या मुळावर आला. त्यात 'गिरणी कामगार' पूर्णपणे देशोधडीला लागला.

मराठी माणुस मुंबई सोडुन विरार, नालासोपारा, बदलापुरला पळाला. दुसरीकडे पर-प्रांतीय मात्र ह्याच मुंबईत नुसता स्थिरावलाच नाही तर मजबुत झाला. एकेकाळी शिवसेना, काँग्रेस, जनसंघ, कम्युनिस्ट, समाजवादी पक्ष या सर्वांनीच महाराष्ट्रात मराठी माणसांसाठी भूमिका घेतली. पण त्यांच्या काळातही हाती काहीच लागले नाही.

तोच 'मराठीचा मुद्दा' घेऊन, राज ठाकरेंनी २००६ मधे 'मनसे' ची स्थापना केली. आता त्यालाही वीस वर्ष झाली. मराठीची परिस्थिती तीच राहीली असे नव्हे; तर उलट अजुन बिकटच झाली.

शिवसेना, महाराष्ट्र निर्माण सेनाच नव्हे तर कोणत्या राजकीय पक्षांनी मराठी तरुणांना व्यवसायात उतरण्यासाठी नीट मार्गदर्शन केलं?

मराठी मुलांना वेगवेगळ्या पक्षांचे नेते गुंडगिरी करायला लावतात. त्यामुळे त्यांचे सरकारी असो अथवा खाजगी असो नोकरीचे दरवाजे बंद होतात. कारण पोलीस दप्तरी त्यांची नोंद 'गुन्हेगार' म्हणून झालेली असते. त्यामुळे असे म्हणावेसे वाटते की, 'मराठी तरुण मार्गाला लागणं' हे या कोणत्याही राजकीय पक्षांना परवडणारं नाही, हेच या मागील कटू सत्य आहे.

मराठी मुद्दा निकालात निघाला तर, काही राजकीय पक्षांकडे कोणताच मुद्दा शिल्लक राहिलेला नसणार, हेही एक सत्यच आहे. आज मुंबई मधली एकही बाजारपेठ अशी नाही, की जिथे मराठी माणसांचं वर्चस्व आहे. बांधकाम व्यवसायातील मुंबईतील प्रसिद्ध बिल्डर्स कोण आहे याकडे नजर फिरविली तर लोढापासून सुरुवात केली तर रुणवालपर्यंत ती जाऊन थांबते. त्यांना या व्यवसायात मदत करणारे सर्वच राजकीय पक्षातील मराठी नेतेच असतात.

मराठीसाठी गळा काढणारे अनेक नेते एकही मराठी शाळा वाचवु शकले नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. मुंबई मध्ये सध्या हिंदी व मराठी भाषावादच्या नावाखाली गोंधळच सुरू आहे. भविष्यात त्याचे काय गंभीर परिणाम उमटणार आहे, हे आज तरी सांगणे कठीण आहे. मुंबईतील अनेक फेरीवाले बहुधा गरीब, अनौपचारिक क्षेत्रात काम करणारे आणि स्थानिक राजकीय पाठबळाशिवाय असतात. त्यामुळे, जेव्हा त्यांच्यावर दहशत निर्माण केली जाते, तेव्हा ते त्या भागातून पळ काढतात. नाईलाज असतो त्यांचा. त्यामुळे अनेक व्यवसायांमध्ये व त्यातही रेल्वे स्थानक, बाजारपेठा, फुटपाथ अशा महत्वाच्या ठिकाणी एक व्हॅक्यूम निर्माण होते.

जेव्हा एखादी जागा मोकळी होते, तेव्हा एखादा 'भाई' लगेचच 'आपल्या लोकांना' त्या जागेत बसवतो. फेरीवाल्यांवर दादागिरी करणाऱ्या स्थानिक लोकांना आणि भ्रष्ट अधिकाऱ्यांना परप्रांतिय हफ्ता देतात आणि आपली जागा सुरक्षित करतात. मुंबईत गेल्या पंचवीस वर्षात फेरीविक्रीच्या व्यवसायात मोठा बदल झालेला दिसतो.

आधी या ठिकाणी मुंबईतील मराठी, महाराष्ट्रातील इतर भागातील मराठी माणूस होता. आता तेथे उत्तर प्रदेश, बिहार, मध्यप्रदेश, छत्तीसगढ, झारखंड, पश्चिम बंगाल येथील व्यापाऱ्यांचे वर्चस्व निर्माण झाले. आपण दिवसभर 'मराठी माणूस', 'मराठी माणूस' करत राहतो. मुंबईत नोकरी, धंदा, व्यवसाय यासाठी मदत करून 'सेटल' केलेले महाराष्ट्रातील कोणत्याही भागातील मराठी भाषिक सुतार, कुंभार, लोहार, चांभार, तेली, न्हावी, धोबी, माळी, गवळी, शिंपी, प्लम्बर, टॅक्सी-चालक, रिक्षा-चालक दाखवावे.

हे सगळे धंदे नीट बघा. सारेच परप्रांतिय गोळा झाले आहे. कोकण, मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र सगळीकडे गरीब 'मराठी माणूस'च आहे. राजकीय नेत्यांनी त्या गरिबांसाठी कधी काय प्रयत्न केले ? म्हणूनच नवतरुणांनी कोणत्याही का होईना राजकीय पक्षांचा कार्यकर्ता होणे बंद करावे, हेच त्यांच्या व समाजाच्या हिताचे राहील!

### आजचा मराठी तरुण नक्की करतोय काय?

एकेकाळी मुंबईत रस्त्यावर केळी विकणारे कृपाशंकर सिंह काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून कुठल्या कुठे पोहोचले. कालांतराने ते भाजपमध्ये नेते झाले. तेथे गेल्यानंतर त्यांच्या मागे चौकशांचा लागलेला ससेमिरा थांबला. तर दुसरीकडे दुकानांवरच्या पाट्या मराठीत लावाव्यात म्हणुन आंदोलन करणाऱ्या नेत्यांच्या मुलांच्या साखरपुड्याच्या आमंत्रण पत्रिका इंग्रजीत छापलेल्या आपण पाहतोय. विविध राजकीय नेत्यांच्या मुलांचे कार्यक्रम ज्या भव्य दिव्य हॉटेलमध्ये होतात ती हॉटेल कोणाची असतात? आज नागरिकांना लागणाऱ्या गरजेच्या वस्तुंचा पुरवठा करणारे ९५% परप्रांतिय आहे. केवळ त्यांच्यामुळेच आज मराठी माणसं आपले सण आनंदाने साजरे करतायत. आपल्या पोटासाठी लागणारं अन्न-धान्य आपण त्यांच्याकडूनच खरेदी करतोय. कारण ह्या सर्वप्रकारच्या वस्तुंचा पुरवठा करण्यास मराठी माणुस पुर्णपणे असमर्थ ठरला आहे. एक वर्ग जो हुषार आहे, उच्च-शिक्षित आहे, तो उठतो आणि बुध्दीमतेच्या बळावर परदेशात जातो. दुसरा वर्ग जो मध्यम शिकलेला आहे, तो ह्याच पर-प्रांतीयांकडे नोकरी करतोय. बाकी फार मोठा वर्ग विविध राजकीय पक्षांच्या कार्यालयांत आपला अमुल्य वेळ वाया घालवतोय, तर अनेक तरुण दारु पिण्यात व्यस्त आहेत. मग नक्की चुकतंय कोण? परप्रांतीय की मराठी तरुण? बेरोजगार मराठी मुलांचा वापर करुन राजकीय नेते आपलं दुकान मात्र मस्त चालवत आहेत!

# पितृपक्षातील हाडपक्या (मस्कऱ्या) गणपती उत्सव



रमेश कृष्णराव लांजेवार
स्वतंत्र पत्रकार, नागपूर.
९९२१६९०७७९

पितृपक्षामध्ये धार्मिक कार्यक्रमासह पारिवारिक कार्यक्रम किंवा शुभकार्य करणे टाळले जाते. परंतु पितृपक्षाच्या काळातही प्रामुख्याने विदर्भात २७० वर्षांपासून हाडपक्या (मस्क ?या) गणपती उत्सव साजरा करण्यात येतो. यामागे सुध्दा ऐतिहासिक परंपरा व संस्कृती आहे. नागपूरातील प्राचीन परंपरेतील ऐतिहासिक उत्सव म्हणजे 'हाडपक्या गणपती'.

हा उत्सव गणेशेत्सव संपल्यानंतर सुरू होतो. नागपूरसह विदभार्तील अनेक जिल्ह्यांत हाडपक्या गणपती उत्सव मोठ्या थाटात साजरा केला जातो. हा गणपती उत्सव घरघुती स्वरूपाचा नसुन सार्वजनिक स्वरूपाचा असतो. पूर्वी मोठ्या प्रमाणात सार्वजानिकरित्या हा उत्सव साजरा होत असे. परंतु कालांतराने आता काही मोजक्याच ठिकाणी हा उत्सव साजरा केला जातो. विदर्भात पितृपक्षाला हाडपक असेही म्हणतात. म्हणून हाडपकात बसविलेल्या गणपतीला 'हाडपक्या गणपती' असेही संबोधले जाते.

राजे भोसले यांचे नागपूरात आगमन झाल्यानंतर अनेक प्रथा व परंपरांची सुरुवात झाली. भाद्रपद शुद्ध चतुर्थीला घरगुती गणेशोत्सवाला सुरुवात होते व याला मोठे सार्वजनिक स्वरूप दिले जाते, हा उत्सव दहा दिवस चालतो. घरगुती गणेश विसर्जन झाल्यानंतर जी पितृपक्षातील चतुर्थी येते त्या कृष्णपक्ष संकष्ट चतुर्थीला हाडपक्या गणपतीची स्थापना केली जाते.

इ. स. १७५५ मध्ये नागपूरातील भोसले घराण्यातील तत्कालीन राजे श्रीमंत खंडोजी महाराज भोसले उर्फ चिमनाबापू हे बंगालच्या स्वारीवर होते. बंगालवर ऐतिहासिक विजय मिळवून परत येत असताना कुळाचारी गणपतीचे विसर्जन झाले होते. त्यामुळे श्रीमंत खंडोजी महाराज भोसले गणपतीउत्सव साजरा करू शकले नाही.

त्यावेळी राजपुरोहित व अन्य विद्वानांसोबत चर्चा करून पितृपक्षातील भाद्रपद कृष्ण चतुर्थी (भाद्रपद संकष्टी चतुर्थी) ला गणपतीउत्सव साजरा करण्याचे ठरविले आणि त्यासोबत बंगालवर ऐतिहासिक विजय मिळविण्याच्या आनंदोत्सव सुद्धा सार्वजनिक स्वरूपात साजरा करण्याचे ठरविले.तेव्हा पासून हाडपक्या गणपतीला सुरूवात झाली आहे.

त्यामुळे याला विजयत्सोव सुध्दा म्हणता येईल. याकाळात लावण्या, नकला, भारूड, खडीगंमत इत्यादी मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात येत असे. यावेळी अनेक गंमतीजमतीचे कार्यक्रम होत असत त्यात थट्टा,मस्करी, नाटक खडी गंमत इत्यादींचा भडीमार होत असत म्हणजेच कार्यक्रमाच्या माध्यमातून मस्करी व्हायची यातुनच मस्कऱ्या हे स्थानीय बोलीभाषेतील नाव प्रचलित झाले आणि पितृपक्षातील गणपतीला मस्कऱ्या गणपती' नावाने प्रसिद्धी मिळाल्याचे सांगितले जाते.

असे म्हणतात की लोकमान्य टिळकांनी ह्याच गणपती उत्सवाची प्रेरणा घेऊन भाद्रपद शुद्ध गणेश चतुर्थीला गणपती उत्सव सार्वजानिक स्वरूपात साजरा करण्याचे ठरविले. हाडपक्या गणपती उत्सवाचा मुख्य सोहळा नागपूरातील भोसले राजवाडा, महाल येथे आयोजित करण्यात येते. या उत्सवाला आज २७० वर्षे पूर्ण होत आहेत, ही ऐतिहासिक परंपरा आहे.

श्रीमंत राजे खंडोजी महाराज भोसले यांच्या काळात हाडपक्या गणपतीची स्थापन केली जात होती. तीच परंपरा आजही आपल्याला पहायला मिळते. त्याच प्रकारची मूर्ती स्थापन करण्यात येते. त्याकाळी लावण्या, भारूड, पोवाडे, खडी गंमत इत्यादी मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित केले जायचे. परंतु आता कालांतराने वेगवेगळे मनोरंजनात्म कार्यक्रम आले. यात आर्केस्ट्रा, सुगम संगीत, नाटक, नवीन पिढीला आनंद देणाऱ्या कार्यक्रमाचे आयोजित करण्यात येते.

हा उत्सव सलग दहा दिवस साजरा करण्यात येतो. या दरम्यान महाप्रसादचा कार्यक्रम आयोजित करण्यात येतो व भाद्रपद कृष्ण द्वादशीला गणपती उत्सवाची सांगता होते आणि हाडपक्या गणपतीचे विसर्जन करण्यात येते.

यामुळे लक्षात येते की भारतीय संस्कृतीतील प्रत्येक सणाला व उत्सवाला अत्यंत महत्व असते. मग तो कोणत्याही धर्माचा उत्सव असो. यातूनच आपली जडणघडण व विविधता दिसून येते, आपण परीपक्व होतो व आपल्या परिवाराला संस्कृतीतून चांगली चालना मिळते. यामुळेच आज संपूर्ण जग भारतीय संस्कृतीकडे आकर्षित झाल्याचे दिसून येते. ही भारतासाठी गौरवास्पद बाब आहे. गणपती बाप्पा मोरया!




# हा फोन दिवसातून फक्त २ तास चालू शकेल

अलीकडेच जपानमधील टोयोके शहरात एक प्रस्ताव सादर करण्यात आला आहे, ज्याअंतर्गत दररोज फक्त २ तास फोन वापरण्याचा नियम असेल.

त्याचा उद्देश जास्त स्क्रीन वेळेचे शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर होणारे दुष्परिणाम कमी करणे आहे.



प्रस्तावित मार्गदर्शक तत्वांमध्ये असे म्हटले आहे की ६ ते १२ वर्षे वयोगटातील मुलांनी रात्री ९ नंतर स्क्रीन वापरू नये. दुसरीकडे, प्रौढांनी रात्री १० वाजेपर्यंत त्यांचे फोन बंद करावेत.



लोकांवर कोणतीही सक्ती केली जाणार नाही.

या नियमामुळे नागरिकांना स्मार्टफोन कधी आणि किती काळ वापरायचा याचा विचार करण्याची संधी मिळेल.

सद्धया एक समिती या विधेयकाचा आढावा घेत आहे. यानंतर नगरपालिका सभेत त्यावर मतदान होईल.

# भुके नाही अन्न.. मेल्यावरी पिंडदान

*भुके नाही अन्न'*
*मेल्यावरी पिंडदान''*
*हे तो चाळवाचाळवी'*
*केले आपणचि जेवी'*
*नैवद्याचा आळ'*
*वेचे ठाकणी सकळ'*
*तुका म्हणे जड'*
*मज न रखावे दगड'*



शशिकांत मधुकर तोटे
दारव्हा, जि. यवतमाळ
९१३०८३५४५८

प्रस्तुत अभंग भक्तिमार्गासोबतच समाजाला नीतीमार्गाची सुलभ वाट दाखविणाऱ्या संत तुकारामांचा आहे. या अभंगाचा सरळ सरळ भावार्थ लक्षात घेतला तर जिवंतपणे भुकेला असताना खायला अन्न पाणी देत नाही,परंतु मेल्यावर त्याच्या नावाने पिंडदान करतात. ही तर शुद्ध फसवणूक आहे. शिजवलेल्या अन्नापैकी मृत व्यक्तीच्या नावाने थोडासा नैवेद्य ठेवतात आणि उरलेले सर्व आपणच गिळंकृत करतो. तुकाराम महाराज भगवंताला म्हणतात मला असा निर्बुद्ध दगड बनू नको!

संत तुकाराम महाराज संसारिक होते. त्याकाळी समाजात आढळणाऱ्या रूढी परंपरेवर चिंतन करून ते भाष्य करीत आणि अनीतीच्या मार्गावर चालणाऱ्यांना खडे बोल सुनावत; असे त्यांच्या वाङ्मयातून अनेकदा स्पष्ट होते.

मातृदेवो भवः पितृदेवो भवः सांगणाऱ्या आपल्या संस्कृतीत आजही जिवंतपणी भुकेल्या आई-वडील अथवा आप्तस्वकीयांना वेळेवर अन्न-पाणी दिल्या जात नाही. परंतु त्यांच्या मृत्यूनंतर मोठ्या दशक्रिया विधी, तेरावा विधी, शुद्ध पंगती श्राद्धविधी करून मृत व्यक्तीच्या नावाने सर्व समाजासाठी मिष्टांन्नाचे भोजन दिले जाते. मात्र त्यांच्या हयातीत उपेक्षा होते.

काही सन्माननीय अपवाद वगळता चौफेर विपरित चित्र आज समाजात दृष्टीस पडते. जिवंतपणी आई-वडिलांना उपाशी ठेवणारे ते मृत्यू पावल्यानंतर त्यांच्या नावाने पिंडदाना प्रसंगी, खोट्या प्रतिष्ठेपायी मोठा खर्च करतात. भोजनाच्या पंगती बसवितात आणि स्वतःच बनवलेल्या भोजनाचा मनमुराद हसतपणे आस्वाद घेतात.

हे लोक नैवेद्य म्हणून देवाला आवडणारे नानाविध पदार्थ करून स्वतःच पोट भरत असतात. या कृतीतून स्वतःची काही न मागणाऱ्या देवाची देखील फसवणूक होते.कर्तव्य धमार्ला विसरणारे जडबुद्धीचे लोक माझ्याकडून रक्षिले जाणारच नाहीत. मी वेळोवेळी या फसणूक करणाऱ्या लोकांना त्यांच्या कर्तव्य धर्माची आठवण करून देईल! असे संत तुकाराम महाराज म्हणतात. ही परिस्थिती जशी आज अवतीभवती दिसते. तशी त्याकाळी ही असावी म्हणून संतांनी अनीतीच्या खोट्या परंपरेवर भाष्य केलेले आहे. ते आजच्या समाजालाही लागू पडते.

दुभत्या गाई म्हशींना वेळेवर चारा टाकता. हौसेसाठी कुत्री, मांजरी पोसता. त्यांच्या भुकेचा विचार करून पौष्टिक आहार पुरविणारे, आई बापाच्या भुकेचा विचार कधी करतील? आज तीर्थक्षेत्री भीक मागणारी वयोवृद्ध मंडळी, कुंभमेळ्यात सोडलेली, विधवेला दुर्लक्षित केलेली, गावाच्या पारावर थकलेली हिरमुसलेली म्हातारी चेहरे, वृद्धाश्रमा सोबतचं त्यात कितपत पडलेली दुर्लक्षित जेष्ठ मंडळींची संख्या का वाढताहेत! याचाही विचार समाजमन करेल?

ज्यांनी जन्माच्या आधीपासून तुमच्या भवितव्याचा विचार केला. एक कुटुंबप्रमुख म्हणून कुटुंबाचे संरक्षण केले.स्वतःच्या इच्छा आकांक्षा आवडीनिवडींचा विचार केला नाही, ती व्यक्ती आपले जन्मदाते असो वा पालक. जेव्हा ती वृद्धापकाळाने थकते, अंगी त्राण राहत नाही. अशा प्रसंगी खरा मानसिक आधार त्यांना हवा असतो.

अपेक्षित असे घडत नाही या उलट त्यांची परवड होत असते. त्यांना उपेक्षित ठेवून पापांचे आपण कळत नकळत धनकरी होतो. उलटपक्षी त्यांच्या मृत्यू पश्चात पिंडदान, तेरवी, श्राद्धविधी करून पुण्य पदरात पाडून घेण्याचे सोंग कशाला करायचे.

ही कृतघ्नता, निर्दयीपणाची, निर्बुद्धीची होत. मेलेल्याच्या नावाने कावळ्याला व गाईला नैवेद्य खाऊ घालण्यापेक्षा जिवंतपणीच त्यांची काळजी घेणे गरजेचे आहे. मेल्यानंतर तुमची पितरें कावळ्याच्या रूपाने येईल अशी निर्बुद्धी ठेवण्यासारखे दुसरे मूर्खत्व नाही.

म्हणून संत तुकारामांनी एकनाथांनी, कबीरदासांनी अशा कमार्चा धिक्कार केला आहे. खरे पुण्य कर्म जिवंतपणीच आहे, हा संत विचार मानवजीवनी अंगीकारला तर अनेक सामाजिक प्रश्न सुटायला मार्ग मोकळा होईल.

■ ■ ■

## समाज प्रबोधनाचं एक माध्यम चित्रपट

**वाचक लिहितात**

चित्रपट हे असं माध्यम आहे जे मनोरंजनाबरोबरच संस्कृती, परंपरा, इतिहास दाखवून लोकांचे प्रबोधन करू शकतो त्यामुळे मनोरंजनाशिवाय इतर विषयांवर चित्रपट निर्माण करणे ही काळाची गरज आहे ज्यात खरे आणि वास्तव इतिहास, परंपरा दाखवणे गरजेचे आहे. गेल्या काही वर्षात वेगळ्या विषयाचे काही चित्रपट निर्माण केले जात आहे पण दुर्दैवाची गोष्ट अशी आहे की अशा चित्रपटातून दाखविला जाणारा इतिहास, परंपरा, रूढी यांच्याविरुद्ध साम्यवादी आणि पुरोगामी विचाराचे लोक विरोध करतात.

निर्मात्यांना सरसे तन जुदा करण्याची धमकी दिली जाते. अशा चित्रपटांच्या निर्मात्यांना मारहाण केली जाते. असे चित्रपट प्रदर्शित न होण्यासाठी प्रयत्न केले जातात किंवा त्याच्यावर बंदी आणली जाते. याचे ताजे उदाहरण म्हणजे नुकताच प्रदर्शित झालेला बंगाल फाईल हा चित्रपट. या चित्रपटात स्वातंत्र्यापूर्वी मुस्लिम लीगने कलकत्त्यात जो भयानक रक्तसंग्राम घडवला त्याचे सत्यचित्रण करण्याचा प्रयत्न केला आहे.

आतापर्यंतच्या इतिहासाच्या पुस्तकात १६ ऑगस्ट १९४६ या दिवशी घडलेल्या या घटनेचा उल्लेख केवळ दंगल एवढ्याच एवढाच करण्यात आला होता या दंगलीतील मृतांच्या संख्येमुळे ही घटना कलकत्ता किलिंग या नावाने ओळखली जाते परंतु प्रत्यक्षात ते हिंदूंचे हत्याकांड होते.

त्यावेळी तेथील पोलीस ठाण्यामध्ये बहुतांशी पोलीस निरीक्षक मुसलमान होते त्यामुळे हिंसा वाढली. या हत्याकांडातील मृतांची औपचारिक आकडेवारी ४००० तर अनौपचारीक आकडेवारी आठ ते दहा हजार इतकी होती. अशा घटना राजकीय हेतूमुळे लपवल्या गेल्या आणि आताही बऱ्याच घटना लपवल्या जात आहे.

असाच एक चित्रपट डायरी ऑफ वेस्ट बेंगाल या चित्रपटावर बंदी घालण्याची मागणी करण्यात आली होती. या चित्रपटात बांगलादेशातून भारतात होणारी घुसखोरी, रोहिंग्या निर्वासितांचे संकट, लव जिहाद आणि समाजातील आंतर धर्मीय संबंध याविषयीच्या सत्या घटनांवर आधारित गोष्टी दाखवण्यात आल्या होत्या.

सत्य घटनांवर आधारित अशा चित्रपटातून काही अंशी तरी इतिहास दाखवला जात आहे त्यामुळे या चित्रपटांच्या माध्यमातून आतापर्यंत समोर न आलेला घटना जाणून घेण्याचा प्रयत्न निश्चितच केला पाहिजे. मोगल आणि इंग्रज यांचे शासन तीन साडेतीनशे वर्षाचे होते पण त्याआधीचा इतिहास हा गौरवपूर्ण होता पण तो इतिहास पूर्णपणे पुसून टाकून फक्त नंतरच्या तीन साडेतीनशे वर्षातील इतिहास हा सांगितला आणि दाखवला गेला त्यामुळे खरा गौरवशाली इतिहास हे आजच्या पिढीला माहीत नाही. या इतिहासाचे स्मारक किंवा प्रतिके असलेल्या गोष्टी, वस्तू, गड किल्ले, मंदिरे गोपुरे आदी नष्ट करून त्यावर अन्यधमीयांनी आपली प्रार्थना स्थळे बांधली आहे. राजकीय नेत्यांच्या इच्छेनुसार व संगनमताने हे सगळे घडत आहे त्याला वेळीच आवर घातला नाही तर परिस्थिती बिकट होऊ शकते.

आपला जाज्वल्य इतिहास पुनर्जीवित करण्यासाठी चित्रपट निमार्ता ह्यांनी पुढे येऊन असे चित्रपट निर्माण करणे हे गरजेचे आहे. फक्त चित्रपट निर्माण करून काही साध्य होणार नाही त्याला लोकांनी प्रतिसाद दिला पाहिजे. विरोध करणाऱ्यांचे षडयंत्र हाणून पाडले पाहिजे व घुसखोरांना हकलण्याच्या सरकारी मोहिमेला नागरिकांनी पाठिंबा दिला पाहिजे.

■ लीना मकरंद गाडगीळ
पनवेल.




## रोज सकाळी प्या शेवग्याच्या पानांचे पाणी

शेवग्याची शेंग आपल्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. त्यात असे अनेक पोषक घटक असतात जे चांगले आरोग्य राखण्यास मदत करतात. म्हणून शेवग्याची शेंग सुपरफूड मानली जाते. तर शेवग्याच्या शेंगप्रमाणेच या वनस्पतीची पाने देखील आपल्या आरोग्यासाठी खूप आरोग्यवर्धक आहे. तुम्ही दररोज सकाळी रिकाम्या पोटी शेवग्याच्या पानांचे पाणी प्यायल्यास तुमच्यासाठी फायदेशीर ठरू शकते.

त्यात व्हिटॅमिन-ए, सी, कॅल्शियम, पोटॅशियम आणि लोह यांसारखे आवश्यक जीवनसत्त्वे आणि खनिजे मुबलक प्रमाणात आढळतात. ते प्रथिने आणि अँटी-ऑक्सिडंट्सचा देखील एक उत्कृष्ट स्त्रोत आहे.

**शेवग्याच्या पानांचे पाणी पिण्याचे फायदे**

शरीरात ऊर्जेची पातळी वाढवते- शेवग्याच्या पानांपासून तयार केलेल्या पाण्यात लोह आणि जीवनसत्त्वे शरीरातील रक्ताची कमतरता दूर करण्यास मदत करतात. ज्यामुळे थकवा कमी होतो आणि उजेर्ची पातळी वाढते. सकाळी हे पाणी प्यायल्याने दिवसभर ऊर्जावान राहता.

**पचनसंस्था मजबूत करते** : यात असलेले अँटी-बॅक्टेरियल गुणधर्म पोटातील हानिकारक बॅक्टेरिया नष्ट करतात, तर त्यातील फायबर बद्धकोष्ठतेच्या समस्येपासून मुक्त होऊन पोट स्वच्छ ठेवते.

**वजन कमी करण्यास उपयुक्त** : कमी कॅलरीज आणि उच्च पोषण असलेले हे पेय वजन कमी करण्यास खूप प्रभावी ठरू शकते. याच्या सेवनाने चयापचय वाढवते, शरीरातील अतिरिक्त फॅट कमी करण्यास मदत होते.

**रोगप्रतिकारक शक्ती मजबूत** : शेवग्याच्या पानांमध्ये व्हिटॅमिन सी आणि इतर अँटी-ऑक्सिडंट्स भरपूर असतात, जे रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यास मदत करतात. शेवग्याच्या पानांचे पाणी नियमितपणे प्यायल्याने सर्दी आणि खोकला सारख्या संसर्गाचा धोका कमी होतो.

**रक्तातील साखर आणि कोलेस्टेरॉल नियंत्रित** : शेवगा रक्तातील साखरेची पातळी कमी करण्यास प्रभावी ठरू शकते. कोलेस्टेरॉलची पातळी देखील नियंत्रित ठेवते, त्याचबरोबर हृदय निरोगी राहते.

**त्वचा आणि केसांसाठी वरदान** : शेवग्याच्या पानांमध्ये असलेले अँटीऑक्सिडंट आणि अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म त्वचेची चमक वाढवतात, मुरुमांपासून बचाव करतात आणि वृद्धत्वाची लक्षणे कमी करतात. तसेच यामध्ये असलेले पोषक घटक केसांना मजबूत करतात आणि केस गळण्याची समस्या कमी करतात.

**शरीरातील जळजळ कमी करते** : शेवग्याच्या पानांमध्ये दाहक-विरोधी गुणधर्म असतात. त्यामुळे या पानांचे पाणी प्यायल्यास संधिवातासारख्या दाहक आजारांमध्ये वेदना आणि सूज कमी करण्यास उपयुक्त ठरू शकते.

■ ■ ■

## अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

### ! हुरहूर !

सुटी आहे वृत्तपत्राला
याचा पडतो विसर
गेटवर जाऊन बघतो
अजुन का बरं
आला नसेल महासागर?

जिल्हयातील घडामोडींची
सविस्तर वृत्त देते पेपर
टीव्ही वरील बातम्यात
हेच तर आहे अंतर ..!

बाजारभाव आज कुठे काय?
घरबसल्या समजते
म्हणूनच तर पेपरशी
मैत्रीचे नाते घट्ट होते ..!

## केंद्र सरकाराच्या इंटेलिजन्स ब्युरोला आसुडगाव - पनवेल येथील जमीन

मुंबई, दि. ९ : प्रतिनिधी

केंद्र सरकारच्या सब्सिडरी इंटेलिजन्स ब्युरोला रायगड जिल्ह्यातील आसुडगाव (ता. पनवेल) येथील शासकीय गायरानातील ४ हेक्टर जमीन देण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.




या जमिनीवर केंद्र सरकारच्या गृह मंत्रालयाच्या सब्सिडरी इंटेलिजन्स ब्युरोच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी सेवा-निवासस्थाने बांधण्यात येणार आहेत. त्यासाठी आसुडगाव येथील सर्व्हे नंबर ३३ पैकी ४ हेक्टर जमीन रेडीरेकनर दरानुसार येणाऱ्या किंमतीच्या ५० टक्के आकारुन देण्याचा निर्णय घेण्यात आला. ही जमीन उपसंचालक, सब्सिडरी इंटेलिजन्स ब्युरो, भारत सरकार, मुंबई विभाग यांना भोगवटादार वर्ग-२ या धारणाधिकाराने आणि कब्जाहक्काने देण्यात येणार आहे. यासाठी काही अटी व शर्तीही घालण्यात आल्या आहेत.

## 'नमो शेतकरी योजने'चा सातवा हप्ता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते वितरित
## राज्यातील ९१ लाख ६५ हजार १५६ शेतकऱ्यांच्या बँक खात्यात

मुंबई, दि. ९ : प्रतिनिधी

"शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थैर्यासाठी सुरू करण्यात आलेल्या 'नमो शेतकरी महासन्मान किसान योजने'चा सातवा हप्ता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते वितरित करण्यात आला. राज्यातील ९१ लाख ६५ हजार १५६ शेतकऱ्यांच्या बँक खात्यात एकूण १८९२.६१ कोटी रुपये निधी शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग होईल.

मंत्रालय येथे 'नमो शेतकरी महासन्मान निधी योजने'च्या अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना सातव्या हप्त्याचा निधी वितरित करण्यासाठी कृषी विभागातर्फे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच कृषी मंत्री दत्तात्रय भरणे मंत्रीमंडळातील सदस्य, मुख्य सचिव राजेशकुमार उपस्थित होते.



केंद्र शासनाने सुरु केलेल्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या धर्तीवर राज्य शासनाने ही योजना सुरू केली. यामध्ये पात्र शेतकऱ्यांना थेट आर्थिक सहाय्य देऊन शेती खर्चाला हातभार लावण्याचा या योजनेचा उद्देश आहे. या सातव्या हप्त्यामध्ये एप्रिल २०२५ ते जुलै २०२५ या कालावधीचे अनुदान लाभार्थ्यांना देण्यात आले. ज्या शेतकरी लाभार्थ्यांचा प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेत समावेश आहे. त्या सर्वांना राज्याच्या नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचा लाभ मिळाला आहे. अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर हे अनुदान शेतक-यांसाठी महत्वाचे ठरणार आहे.

केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना प्रतिवर्षी सहा हजार रुपये अनुदान देण्यात येते. केंद्र शासनाच्या या अनुदानामध्ये राज्य शासनातर्फे प्रति वर्षी आणखी सहा हजार रुपये अनुदान देण्यासाठी नमो शेतकरी महासन्मान निधी योजना राबविली जाते. या दोन्ही योजनेच्या माध्यमातून लाभार्थी शेतक-यांना प्रति वर्षी बारा हजार रुपये अनुदान मिळत असते. राज्याच्या नमो शेतकरी महासन्मान योजनेअंतर्गत शेतकरी लाभार्थ्यांना आतापर्यंत एकूण सहा हप्ते देण्यात आले आहेत. आतापर्यंत सहा हप्त्यामध्ये ९३ लाख ९ हजार शेतकऱ्यांना ११ हजार १३० कोटी रूपयांचे वाटप करण्यात आले आहे.

कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, राज्यातील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढावे, त्यांना उत्पादन खर्च भागवता यावा आणि शेती टिकाऊ व्हावी यासाठी ही योजना महत्त्वाची ठरत असून या योजनेद्वारे शेतकऱ्यांना प्रतिवर्षी आर्थिक मदत देण्यात येते. आतापर्यंतच्या सहा हप्त्यांमधून राज्यातील लाखो शेतकऱ्यांच्या खात्यात थेट मदत रक्कम जमा झाली आहे. सातवा हप्ता वितरित झाल्यानंतर या लाभार्थ्यांची संख्या आणखी वाढणार आहे. या योजनेमुळे ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था बळकट होत असल्याचेही श्री. भरणे यांनी सांगितले.

## पुणे म्हाडाच्या रखडलेल्या पुनर्विकास प्रकल्पांना गती द्यावी -उपमुख्यमंत्री अजित पवार

मुंबई, दि. ९ : प्रतिनिधी

पुणे, पिंपरी चिंचवडसह राज्यातील सर्व स्थानिक नियोजन प्राधिकरणांनी सुसज्ज रस्ते, सोयी - सुविधा असणारे म्हाडाचे लेआउट मंजूर करून त्यानुसार प्रकरणपरत्वे एकल किंवा समूह पुनर्विकास करावा,असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील त्यांच्या समिती कक्षात पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या विविध विषयांबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती.

पुणे म्हाडाच्या रखडलेल्या पुनर्विकास प्रकल्पांच्या कामांचा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंत्रालयात सविस्तर आढावा घेतला. प्रधानमंत्री आवास योजना २.० ही पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्र शासनाची महत्त्वाकांक्षी योजना आहे. त्याची प्रभावी



अंमलबजावणी करावी.परवडणाऱ्या दरात सर्वसामान्यांना घरे उपलब्ध करून द्यावीत. मुंबईतील बी.डी.डी. चाळींच्या धर्तीवर बांधकामाचा दर्जा उत्तम ठेवून प्रकल्प वेळेत पूर्ण करावेत,असे निर्देश उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

**नेरे, रोहकल, शिरूर बाबत जिल्हाधिकाऱ्यांनी बैठक घ्यावी**

पुणे जिल्ह्यातील मुळशी तालुक्यातील नेरे, खेड तालुक्यातील रोहकल येथे प्रधानमंत्री आवास योजनेची अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी तसेच शिरूर तालुक्यात म्हाडाच्या जागेमध्ये उभारण्यात येणाऱ्या प्रकल्पातील अडथळे दूर करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी बैठक घ्यावी, असे निर्देशही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.

खराडी, पुणे येथील म्हाडा अभिन्यासातील पोस्ट ऑफिस आरक्षण रद्द करणे,लोणावळा नगरपरिषद हद्दीतील म्हाडाच्या मालकीच्या जागांवर पुनर्विकास व नवीन बांधकाम इत्यादी विषयांवरही या बैठकीत चर्चा करण्यात आली.दापोडी येथील अशोक गृहनिर्माण संस्थेमधील पात्र सदस्यांना तेथील म्हाडाच्या २० टक्के आरक्षणानुसार सोडत न काढता योजनेत समाविष्ट करून घ्यावे, असे निर्देशही यावेळी देण्यात आले.

या बैठकीस पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचे सभापती शिवाजीराव आढळराव पाटील, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, नगरविकास (१) व गृहनिर्माण विभागाचे अपर मुख्य सचिव असीमकुमार गुप्ता,नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ.राजेश देशमुख, म्हाडाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी अनिल वानखेडे,म्हाडा पुणे चे मुख्याधिकारी राहुल साकोरे उपस्थित होते तर पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पुणे महानगरपालिकेचे आयुक्त नवलकिशोर राम हे दूरदृश्य संवाद प्रणाली द्वारे उपस्थित होते.

## ... आणि आरक्षणावर सरकारचे ठोस उत्तर
## ओबीसी विद्यार्थ्यांना नवी शिष्यवृत्ती, वसतिगृहे

मुंबई, दि. ९ : प्रतिनिधी

मराठा आरक्षणाच्या निर्णयानंतर ओबीसी समाजामध्ये अस्वस्थता निर्माण झाली. "आपल्या हक्कांवर गदा येणार का?" असा सवाल सातत्याने उपस्थित केला जात आहे. राज्यभरातून विविध मागण्यांचा पाढा वाचला जात आहे.

याच पार्श्वभूमीवर आज सह्याद्री अतिथीगृहात महत्त्वाची बैठक पार पडली. मंत्री, आमदार, वरिष्ठ अधिकारी आणि ओबीसी महासंघाचे प्रतिनिधी एका टेबलावर आले. आगामी उपसमिती बैठकीसाठी पायाभूत मुद्द्यांवर चर्चा झाली.

बैठकीत शैक्षणिक संधी, परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, 'महाज्योती' संस्थेची मजबुती, नव्या वसतिगृहांची उभारणी, तसेच विद्यार्थ्यांना सुविधा वाढवण्यावर भर देण्यात आला. राज्यभरातील १५ मागण्यांचा आढावा घेऊन काही मुद्दे थेट मंत्रिमंडळात मांडले जाणार आहेत, उर्वरित एक महिन्यात निकाली काढण्याची तयारी दर्शवण्यात आली.

**मात्र, सर्वात मोठा प्रश्न – ओबीसी आरक्षण धोक्यात आहे का?**

यावर इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी स्पष्ट ग्वाही दिली. "मराठा आरक्षणाचा शासन निर्णय हा सरसकट नसून फक्त कुणबी असल्याचे पुरावे असणाऱ्यांनाच त्याचा लाभ मिळेल. त्यामुळे ओबीसी आरक्षणाला कुठलाही धक्का लागणार नाही. शासन ओबीसी समाजाच्या हितासाठी पूर्णपणे कटिबद्ध आहे," असे त्यांनी ठामपणे सांगितले.

## परदेशी कंपन्यांना 'नो एंट्री'!
## आता संधी फक्त स्वदेशींसाठी

मुंबई, दि. ९ : प्रतिनिधी

देशात 'मेक इन इंडिया' नंतर स्वदेशी उद्योगांनी अनेक क्षेत्रात झेप घेतली. स्टार्टअप्स, संशोधन, कन्सलटंसी कंपन्यांचा प्रभाव वाढला. तरीदेखील शासकीय पातळीवर संशोधनासाठी विदेशी कंपन्यांनाच जास्ती प्राधान्य मिळत असल्याची चर्चा होती.

कौशल्य विभागाच्या कार्यशाळा, अभ्यासक्रम, धोरणरचना यामध्ये वर्षानुवर्षे विदेशी कन्सलटंसी कंपन्यांचीच मक्तेदारी दिसत होती. यावर अनेकदा स्थानिक तज्ज्ञांनी आक्षेप घेतला होता. "आपल्या भारतीय कंपन्या सक्षम असूनही संधी का दिली जात नाही?" हा प्रश्न कायम चर्चेत राहिला.

राज्यातील व्यवसाय शिक्षण, प्रशिक्षण आणि कौशल्य विकास क्षेत्रात अत्याधुनिक बदल सुरू आहेत. नव्या युगातील तंत्रज्ञान, रोजगार निर्मिती, कारागिर घडविणे यासाठी राज्य शासन मोठी गुंतवणूक करीत आहे. पण या बदलांमध्ये भारतीय विचारांना स्थान मिळणार का, हा प्रश्न अधोरेखित झाला होता.

कौशल्य, उद्योजकता, रोजगार व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी जाहीर केले की, कौशल्य विभागाच्या सर्व संस्थांमध्ये संशोधनात्मक काम आणि सल्लागाराची भूमिका केवळ स्वदेशी कन्सलटंसी कंपन्यांच करणार आहेत.

हा निर्णय रतन टाटा महाराष्ट्र कौशल्य विद्यापीठ, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी, रोजगार सेवायोजन कार्यालये यांना लागू होणार आहे. यामुळे भारतीय कन्सलटंसी कंपन्यांना सुवर्णसंधी मिळणार असून, २०४७ पर्यंत भारताला आर्थिक महासत्ता बनविण्याच्या पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या संकल्पात महाराष्ट्राचा वाटा ठळकपणे नोंदवला जाईल, असा विश्वास लोढा यांनी व्यक्त केला.

## भुजबळांचे गैरसमज, पण निर्णय मागे नाही - उपसमितीचा ठाम पवित्रा

मुंबई, दि. ९ : प्रतिनिधी

मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर पुन्हा एकदा राज्यात वातावरण तापले आहे. एका बाजूला आंदोलकांचा दबाव, तर दुसऱ्या बाजूला सत्तेतलेच काही मंत्री थेट प्रश्न उपस्थित करत आहेत. या पार्श्वभूमीवर उपसमितीची मंगळवारी महत्त्वाची बैठक पार पडली.



सह्याद्री अतिथीगृहात झालेल्या या बैठकीला अनेक वरिष्ठ मंत्री व अधिकारी उपस्थित होते. मराठवाडा आणि सातारा गॅझेटीयरवरील निर्णयांची अंमलबजावणी, दाखले वाटपाची प्रक्रिया, आंदोलकांवरील गुन्हे मागे घेणे, मृतांच्या कुटुंबीयांना मदत व नोकऱ्या देणे, तसेच आंदोलकांच्या वाहनांवरील दंडात्मक कारवाईबाबत तपास अशा अनेक मुद्द्यांवर सविस्तर चर्चा झाली.

यावेळी आंदोलनात प्राण गमावलेल्या ९६ जणांच्या कुटुंबीयांना मदतीचे धनादेश जिल्हाधिकाऱ्यांकडे वर्ग करण्यात आल्याचे जाहीर करण्यात आले. तसेच शासनाच्या विविध विभागांत वारसांना नोकरी देण्याची प्रक्रिया सुरू असल्याचेही स्पष्ट करण्यात आले. आंदोलकांवरील गुन्ह्यांची मागे घेण्याची प्रक्रिया महिनाअखेरपर्यंत पूर्ण केली जाईल, असेही सांगण्यात आले.

**मात्र, सर्वाधिक चर्चेत राहिलेला मुद्दा म्हणजे – आरक्षणाचा जीआर मागे घेतला जाणार का?**

या प्रश्नावर जलसंपदा मंत्री व उपसमिती अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी थेट भूमिका मांडली. "मराठा आरक्षणाबाबत केलेले निर्णय हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या सखोल विचारमंथनातूनच झाले आहेत. त्यामुळे दिलेला जीआर मागे घेण्याचा कोणताही प्रश्नच नाही. छगन भुजबळ यांना गैरसमज असल्यास ते प्रत्यक्ष भेटून दूर करू. समितीची दारे चर्चेसाठी खुली आहेत, पण निर्णय मागे नाही!" असे ठाम विधान त्यांनी केले.

## मुंबईत प्रवेश आता सोपा?
## दहिसर टोलबाबत मोठा निर्णय

मुंबई, दि. ९ : प्रतिनिधी

दररोज लाखो वाहनचालकांना नाहक थांबावे लागते, इंधनाचा अपव्यय होतो, प्रदूषण वाढते... आणि कारण एकच – दहिसर टोल नाका. या टोलमुळे मीरा-भाईंदर ते मुंबई प्रवास नागरिकांसाठी अक्षरशः डोकेदुखी ठरला आहे. दररोज अर्धा-एक तास वाढणारा प्रवास, लांबच लांब वाहनांच्या रांगा, वाढलेले प्रदूषण या सर्वांचा त्रास गेल्या अनेक वर्षांपासून स्थानिकांना सहन करावा लागत होता. या संदर्भात स्थानिक आमदार, लोकप्रतिनिधी व नागरिक सातत्याने आवाज उठवत होते. अखेर शासन पातळीवर उच्चस्तरीय बैठक घेण्यात आली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्तक्षेपाने हा प्रश्न मार्गी लागला. बैठकीला दहिसरचे आमदार प्रकाश सुर्वे, पोलीस आयुक्त निकेत कौशिक, MSRDC व NHAI चे अधिकारी, IRB चे प्रतिनिधी अशा मान्यवरांची उपस्थिती होती.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले की, दहिसर टोल नाका तेथून २ किलोमीटर पुढे, वर्सोवा पुलासमोरील नर्सरीजवळ स्थलांतरित होणार आहे. दिवाळीपूर्वी ही प्रक्रिया पूर्ण होईल.

यामुळे मीरा-भाईंदरकरांना व मुंबईकडे जाणाऱ्या लाखो प्रवाशांना वाहतूककोंडी व टोलचा त्रास कमी होईल. शिवसेनेच्यावतीने नागरिकांना दिलासा म्हणून हा दिवाळीचा 'टोलमुक्त प्रवास' भेट मिळणार असल्याचा विश्वास सरनाईक यांनी व्यक्त केला.


### आज का अंदाज

बुधवार १० सप्टेंबर २०२५

पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४ | ५ | ८ | ४ | ७ | ८ | ९ |
| ३८० | २२० | ७८० | १२५ | २३९ | १२४ | ५६७ | ५६८ |
| ४८९ | ६८० | ६८० | २७९ | ७८९ | ४६७ | ४६८ | ३८८ |
| ५६० | ५९० | ५०० | ३७८ | ३४७ | २६९ | ११६ | ११९ |
| १० | ४० | ५३ | ८३ | ४० | ७० | ८६ | ९६ |
| १२ | ४२ | ५७ | ८७ | ४१ | ७१ | ८५ | ९५ |
| १९ | ४९ | ५६ | ८६ | ४२ | ७२ | ८३ | ९३ |

१० सप्टेंबर : सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| ३८ | ६८ | ९२ | ०२ |
| ३१ | ६१ | ९७ | ०७ |
| ३४ | ६४ | ९५ | ०५ |
| १२० | ६०० | १३५ | २३५ |
| ३०० | ५५६ | ३६० | ३७० |
| ७७९ | १५० | ५६८ | ५७८ |

सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज

० ८ ९ ७ ६

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


## सोनी सब घेऊन येत आहे, गणेश कार्तिकेय या ब्रह्मांडातील दिव्य परिवाराची महान गाथा

**मुंबई, ९ सप्टेंबर :** सोनी सब लवकरच घेऊन येत आहे एक भव्य मालिका गाथा शिव परिवार की गणेश कार्तिकेय. या ब्रह्मांडातील सर्वात शक्तिशाली आणि दिव्य देवांच्या परिवाराची महान गाथा ही मालिका सादर करेल. ही मालिका प्रामुख्याने भगवान शिव, देवी पार्वती आणि त्यांची मुले गणेश आणि कार्तिकेय यांच्या माहीत नसलेल्या कथा सादर करेल. जीवनातील कसोट्यांना आणि आव्हानांना तोंड देऊन समस्त मानवतेला मार्गदर्शन आणि सामर्थ्य देणाऱ्या कुटुंबाची ही कहाणी आहे. दिव्य कथा मांडणारी ही मालिका भारतीय टेलिव्हिजनवरील एक भव्य मालिका असेल. या मालिकेत शिवाच्या भूमिकेत मोहित मलिक, पार्वतीच्या रूपात श्रेनू पारेख तर गणेश आणि कार्तिकेय यांच्या भूमिकेत अनुक्रमे आयुध भानुशाली आणि सुभान खान दिसणार आहेत.

प्रस्तुत मालिकेविषयी बोलताना मोहित मलिक म्हणतो, गणेश कार्तिकेय ही मूलतः शिव-पार्वती, आणि त्यांची मुले गणेश व कार्तिकेय या कुटुंबाची कहाणी आहे. शंकर आणि पार्वतीच्या त्यांच्या मुलांशी असलेल्या नात्यामधून ही मालिका प्रत्येक माता-पित्याच्या अनुभवाचा शोध घेते, मग परिस्थिती कशीही असो- प्रेमाचा वर्षाव असो, संघर्षाची वेदना असो किंवा कुटुंबाला एकत्र ठेवण्याची आशा असो. केवळ भक्ती नाही तर नात्यांमधील सौंदर्य आणि एकत्रित असल्याची ताकद दर्शविणाऱ्या या मालिकेचा भाग असल्याचा मला आनंद वाटतो.

### राशीभविष्य

**मेष :** आजचा दिवस तुमच्यासाठी अनुकूल असेल. आज तुम्ही कठोर परिश्रम आणि समर्पणाने काही काम करण्यात यशस्वी व्हाल, ज्यामुळे तुमच्या पालकांनाही अभिमान वाटेल.

**वृषभ :** आज नशीब तुम्हाला पूर्णपणे साथ देईल आणि तुमच्या योजना यशस्वी होतील. आज तुम्हाला कामाच्या ठिकाणी थोडे अधिक परिश्रम करावे लागतील. तुम्हाला सहकाजयाकडून मदत मिळू शकते.

**मिथुन :** आज तुमची सामाजिक कार्यात रस वाढेल, तुम्हाला एखाद्या संस्थेत सामील होण्याची संधी मिळेल. आजचा दिवस तुमच्यासाठी चांगला जाणार आहे. आज तुमचे लक्ष नवीन गोष्टींकडे आकर्षित होईल.

**कर्क :** आज तुम्हाला जवळच्या व्यक्तीकडून चांगली बातमी मिळेल, तुमच्या घरातील वातावरणही आनंददायी राहील. आज तुमची आर्थिक स्थिती पूर्वीपेक्षा मजबूत होईल.

**सिंह :** तुम्हाला परदेशी कंपनीकडून नोकरीची ऑफर मिळू शकते. त्यात सामील होणे तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल. आज प्रत्येकजण तुमच्या कामाने खूप प्रभावित होईल आणि तुमच्याकडून प्रेरितही होईल.

**कन्या :** आजचा दिवस तुमच्यासाठी मिश्र असेल. दीर्घकाळापासून प्रलंबित असलेले काम पूर्ण होणार असल्याने आज तुम्ही आनंदी असाल. नवीन व्यवसाय आजच सुरू करू शकता.

**तुळ :** विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस शुभ असेल. आज तुम्हाला तुमच्या शिक्षकांकडून प्रशंसा मिळेल. कोणतीही योजना आखताना तुमच्या जोडीदाराकडून पूर्ण सहकार्य मिळेल. भावंडांशी सहकायार्चे वर्तन राहील.

**वृश्चिक :** आज कामाच्या बाबतीत घाईघाईने कोणताही मोठा निर्णय घेऊ नका. नवीन योजना इत्यादींवर खर्च होण्याची शक्यता आहे. तुम्हाला काहीतरी मोठे करण्याची प्रेरणा मिळेल.


**धनु :** आजचा दिवस तुमच्यासाठी अनुकूल असेल. तुमची एखाद्या वरिष्ठ व्यक्तीशी भेट होईल. आज तुम्ही तुमच्या जोडीदारासाठी भेटवस्तू खरेदी कराल. घरगुती उपकरणे देखील खरेदी करू शकता.

**मकर :** आजचा दिवस तुमच्यासाठी चांगला असेल. आज तुम्हाला ट्रान्सफरशी संबंधित माहिती मिळू शकते, ज्यामुळे तुमचे काम सोपे होईल. या राशीच्या लोकांना आज त्यांच्या जोडीदाराकडून खूप प्रेम मिळेल.

**कुंभ :** आज तुम्ही व्यवसायातील बदलांबद्दल चर्चा करू शकता आणि ऑफिसमध्ये तुमची सर्जनशीलता पूर्वीपेक्षा चांगली असेल. या राशीच्या प्रेमींसाठी हा एक उत्तम दिवस आहे.

**मीन :** आज तुमचे मन सर्जनशील कामात गुंतलेले असेल, तुम्ही चित्रकला देखील करू शकता. आज तुम्हाला तुमच्या कठोर परिश्रम आणि चांगल्या वर्तनामुळे जे काही पात्र आहे ते मिळेल.

### शब्दकोडे क्रमांक २२१३




**आडवे शब्द :-**
१) अतिशय श्रीमंत मनुष्य
६) झाडाभोवतीचा कट्टा
८) पडदा
१०) फळातील खाद्यभाग
११) पंख
१२) वेळ घालविणे
१३) एक सुगंधी वनस्पती
१४) नोंदण्यासारखा गुन्हा
१७) आयुष्य
१९) बाई
२१) बोजा, भार
२४) देखावा, सजावट
२६) मत्स्य
२७) जास्तीतजास्त व कमीत कमी
२९) योग्यवेळी
३०) घबराटीमुळे होणारी धावपळ
३२) ईर्षा, बळ शक्ती, जोर
३३) फूल, पुष्प
३५) रात्री सुगंध पसरविणारी वनस्पती
३७) सापाने सोडलेली त्वचा
३८) गळ्यामागचा अवयव
३९) शेवट
४०) फोक, छडी
४१) लहान
४२) हात
४४) दक्षतेचा इशारा
४५) पक्ष, बाजू, काठ
४६) आरडाओरड, गोंधळ
४८) अलमारी
४९) पतिपत्नी
५१) केर
५३) हिन्दुस्थान
५५) गोष्ट विचारात घेणे (वा.प्र.)
५७) हत्तीचा शिक्षक
५८) उंच सखल नसलेले
६०) लाखाचा आकडा
६२) रतिचा पती
६३) लष्करी सिक्षण
६५) एक पालेभाजी
६६) सन्मानाची अल्प रक्कम
६७) उपयोग
६८) श्रीयुत, श्रीमान

**उभे शब्द :-**
१) दरिद्री माणूस
२) वरपांगी
३) गाडीचे छत
४) कळलाव्या मुनी
५) जावळा
६) भिंतीवर सरपटणारा प्राणी
७) गूढ
८) आजीची आई
९) छोटा
१२) पुण्याजवळचा एक घाट
१५) व्यय
१६) पर्जन्यकाळ
१८) नवरदेवाची आई
२०) विश्रांती
२२) चुकून, अजाणता
२३) कोकणी भाषेतील एक पोटभाषा
२४) आजूबाजूचा प्रदेश
२५) पुरापुरा अंदाज
२६) माप घेणे, मोजणे
२८) खून करणे (वा.प्र.), मारून रक्त पिणे
३१) तसराळे
३४) अंतःकरण
३६) कमळासारखे सुंदर डोळे
३७) कर्णेंद्रिय
४०) सोने
४१) चीजवस्तू
४२) ज्वारीची वाळलेली ताटे, जनावरांचे खाद्य
४३) स्वतःला
४५) युक्ती
४६) एक सुगंधी उष्ण पेय
४७) शस्त्र
५०) यमाचे घर
५२) सुकुमार व सुंदर
५३) स्तुती करणारा
५४) समशेर
५६) मंदिर
५९) पर्ण
६१) ऱ्हास, उतरती कळा नाश
६२) पुष्परस
६३) बशीचा जोडीदार
६४) अंधार
६५) बंधन, फास, फासा

(उत्तर उद्याच्या अंकात)

मागील शब्दकोड्याचे उत्तर



# दोन दिवसांपासून दुर्घटनाग्रस्त पोकलेन राहुड घाटात महामार्गावर पडून



## दुर्घटनाग्रस्त पोकलेनमुळे गॅस टँकरचा भीषण अपघात, गॅस गळती, ड्रायव्हर मृत्युमुखी

**रेडगांव खुर्द ।** मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक तीनवर चांदवड तालुक्यातील राहुड घाटात दुर्घटनाग्रस्त पोकलेन मशीनमुळे भारत कंपनीच्या कॅप्सूल गॅस टँकरचा काल दि. ८ रोजी संध्याकाळी सात ते आठ वाजेच्या दरम्यान भीषण अपघात झाला. या अपघातात टोमॅटोने भरलेला ट्रक आणि पोकलेन मशीनच्या मधोमध टँकर घुसल्याने हा भीषण अपघात होऊन टँकर मधील गॅस गळती सुरू झाली. या अपघातात टँकर चालकाचा जागीच मृत्यू झाला असावा असा सर्वांचा अंदाज आहे. हा टँकर मालेगावच्या दिशेने जात असताना हा अपघात झाला. महामार्ग प्राधिकरण आणि मंगरूळ येथील सोमा टोल कंपनीने हाकेच्या अंतरावर असलेले दोन दिवसांपासून दुर्घटनाग्रस्त झालेले पोकलेन मशीन न हटविल्यामुळेच हा दुर्दैवी अपघात झाला. असे बोलले जात आहे.

चांदवड पासून अवघ्या पाच ते सहा किमी अंतरावर मुंबई आग्रा महामार्गावर राहुड घाट आहे. हा घाट अरुंद तसेच धोकादायक वळणे आणि महामार्ग प्राधिकरणाने ठेवलेले तांत्रिक दोष यामुळे अपघातांचा स्पॉट ठरला आहे. येथे सतत छोटे-मोठे अपघात घडत असतात. दोन दिवसांपूर्वी याच अपघातग्रस्त ठिकाणी पोकलेन मशीन वाहून नेत असताना दुर्घटना घडली होती. तेव्हापासून हे पोकलेन मशीन महामार्गावर त्या धोकादायक वळणावर तसेच पडून होते. काल संध्याकाळी याच पोकलेन मशीन मुळे हा अपघात घडला. टोमॅटोने भरलेला ट्रक आणि गॅस टँकर दोन्ही पट्ट्यांवर चालत असताना धोकादायक वळणावर अचानक पोकलेन मशीन गॅस टँकर चालकाला दिसले. ते टाळण्याच्या गडबडीत हा अपघात झाला. अपघाताची तीव्रता जास्त असल्याने चालकाचा जागीच मृत्यू झाला. तसेच गॅस गळतीही सुरू झाली. परिसरात गॅस पसरत असल्याने दुसऱ्या टँकर मध्ये दुसऱ्या दिवशी गॅस भरण्यात येत होते. गॅस गळती होत असल्याने ड्रायव्हरचा मृत्यू होऊन रात्र उलटली, दुसऱ्या दिवशीही उशिरापर्यंत त्याचा मृतदेह काढण्यात आला नव्हता. गॅस गळतीच्या स्फोटाच्या भीतीने गॅस टँकर जवळ तसेच टँकरच्या केबिन जवळ कोणालाही जाता येत नसल्याने टँकर चालकाचे नाव गाव तसेच टँकरचा नंबर याची कोणतीही अधिकृत माहिती मिळू शकली नाही. अपघात ठिकाणी अग्निशमन बंब रुग्णवाहिका तसेच गॅस भरण्यासाठी बोलावलेले दुसरे टँकर यामुळे प्रारंभी महामार्गावर लांबच लांब रांगा लागल्या होत्या. सुरक्षितता म्हणून पोलिसांनी मुंबईकडे जाणारी वाहने मालेगाव मनमाड चांदवड अशी वळविली. तर धुळ्याकडे जाणारी वाहने चांदवड मनमाड मालेगाव अशी वळविण्यात आली होती. चांदवडचे पोलीस निरीक्षक कैलास वाघ यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

### महामार्ग प्राधिकरण आणि सोमा टोल नाका पैसे घेण्यात व्यस्त

राहुड घाटात दोन दिवसांपासून दुर्घटनाग्रस्त पोकलेन मशीन पडून होते. मात्र ते या यंत्रणांनी हटविले नाही. याचाच अर्थ महामार्गावर महामार्ग प्राधिकरण आणि सोमाटोल यांचे कर्मचारी पेट्रोलिंग करत नसल्यानेच हा अपघात झाला. त्यांनी तात्काळ मशीन हटविले असते तर हा अपघात झाला नसता. महामार्ग प्राधिकरण आणि टोल नाका फक्त पैशांची वसुली करत असतात. मात्र महामार्गावर वाहनधारकांना आपत्कालीन परिस्थितीत कोणत्याही सेवा देत नाही. हेच यानिमित्तातून दिसून आले आहे. या यंत्रांना सेवा देत नसतील तर त्या हव्यात कशाला? असा प्रश्न वाहनधारकांनी तसेच जनतेने केला आहे.

# इंदूर-पुणे महामार्गावरील वाहतूक कोंडीमुळे नागरिक त्रस्त

## रिपाइं आठवले गटाचे निवेदन



**मनमाड ।** मनमाड शहरातून जाणाऱ्या इंदौर-पुणे महामार्गावर मोठ्या प्रमाणात अवजड वाहनांची वर्दळ असते. त्यामुळे नेहमीच वाहतूक कोंडी होते. त्यामुळे सदर रस्ता बायपास कौळाणे-निमगावमार्गे नांदगाव, येवला, कोपरगाव शिर्डी अशी करण्यात यावी, अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाने (आठवले गट) केली आहे.

येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयावर रिपाइंने धडक मोर्चा नेऊन अधिकाऱ्यांना घेराव घालत उपअभियंता विलास आव्हाड यांना निवेदन दिले. दरम्यान याबाबत तातडीने निर्णय न घेतल्यास तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्याचा इशारा रिपाइंच्यावतीने जिल्हा सरचिटणीस गंगाधर त्रिभुवन यांनी दिला. निवेदनात म्हटले आहे की, गेल्या अनेक महिन्यांपासून मनमाड शहरातून जाणाऱ्या इंदौर-पुणे महामार्गावर मोठ्या प्रमाणात अवजड वहानांची वर्दळ वाढली असल्यामुळे या रस्त्यावर दोन मिनीटे वाहने उभी राहिली तरी लांबच लांब रांगा लागतात. त्यामुळे मोठी वाहतूक कोंडी होते. परिणामी शहरातील लोकांना रस्त्यावरून रहदारी करतांना मोठ्या प्रमाणात मानसिक त्रासाला सामोरे जावे लागते. या महामार्गावरून वाहतुकीच्या प्रश्नावरून शेकडो निष्पाप लोकांचे बळी गेले तर अनेकांना अपंगत्व आले आहे. रेल्वे ओव्हर ब्रीजवरून येवल्याकडून मालेगावकडे अवजड वाहानांना वाहतुकीची मर्यादा नसल्याने सदर वाहने भरधाव वेगाने जातात. अशा प्रसंगी नागरिकांना या ठिकाणाहून रस्ता ओलांडतांना जिव मुठीत धरून मार्गक्रमण करावा लागतो. रेल्वे ओव्हर ब्रिजच्या पुढे गतिरोधक व सिग्नलची नितांत आवश्यकता आहे. महामार्गावरून शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थी, कामगार वर्ग आदींना शहरात येण्यासाठी ओव्हरब्रिजच्या कोपऱ्यावरील ठिकाणाहून रस्ता ओलांडावा लागतो. तेव्हा या भागातील नागरिकांना सरळ पोस्ट ऑफिस कडून ओव्हर ब्रीजच्या खालील रस्ता चांगला करून दिवाबत्तीची सोय करून दिल्यास लोकांना मार्गक्रम सहज सोपे होईल. तसेच शहरातून बाहेर निघतांना तुफान चौक रेल्वे ओव्हर ब्रिज पश्चिमेकडील रस्त्याचा वापर करून सरळ रस्ता क्रॉस न करता बाहेर जाता येईल. यामुळे नागरिकांना सरळ मार्गक्रम करता येईल. पोस्टाकडील व ब्रीज खालील रहदारीचा चांगला रस्ता करणे खूप गरजेचे व आवश्यक आहे. तसेच पोस्टाजवळ पथदीप लावावा. जेणे करून रात्रीची रहदारी सुरक्षीत राहील. मनमाड शहरातून जाणाऱ्या इंदौर-पुणे महामार्गावर मोठ्या प्रमाणात अवजड वाहानांच्या रहदारीने रोज वाहतूक कोंडीमुळे सदर रस्ता बायपास कौळाणे-निमगाव मार्गे नांदगाव येवला व कोपरगाव शिर्डी अशी करावी. याबाबत रिपाइंने अनेक वेळा निवेदन देऊन तोंडी सुध्दा सांगीतले आहे; परंतु काही कार्यवाही झालेली नाही. यापुढे तातडीने कार्यवाही न झाल्यास रिपाइं (आठवले गट) तीव्र आदोलन हाती घेईल, असा इशारा यावेळी देण्यात आला. यावेळी रिपाइंच3 ग्रामीण जिल्हाध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष राजेंद्र आहिरे, जिल्हा सचिव गंगाधर त्रिभुवन, युवा जिल्हाध्यक्ष रुपेश आहिरे, सुरेश शिंदे,हरिभजन चावरिया,सुरेंद्र आहिरे, सुशील खरे, सुरेश जगताप, रवींद्र खैरनार, बाळासाहेब मोरे, दीपंकर त्रिभवन, शेखर अहिरे, गौतम वाघ, प्रदीप घुसळे, दिनकर कांबळे, दीपक आहिरे, विलास आहिरे, मनोज भोसले, महिला आघाडीच्या रुख्मिणी आहिरे, कमल खरात कार्यकर्ते उपस्थित होते.

# दुर्गम आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाचा प्रकाश

## नमस्ते नाशिकचा उपक्रम!



**नाशिक ।** “जिथे कमी, तिथे आम्ही” या ब्रीदवाक्यानुसार नमस्ते नाशिक फाउंडेशनतर्फे सप्रे वाडी, शिरसाटे, ता. इगतपुरी, जि. नाशिक येथील जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, जीवनावश्यक वस्तू आणि भेटवस्तूंचे वाटप करून गणेश चतुर्थी साजरी करण्यात आली.

फाउंडेशनच्या अध्यक्षा स्नेहल देव यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या या उपक्रमात शालेय दप्तर, पेन्सिल, खोडरबर, रंगीत पेन्सिल, पाटी, शार्पनर, हायलाईटर आदी साहित्य देण्यात आले. यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार थंड पाण्याच्या बाटल्या देऊन करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विजय टाटिया होते. यावेळी वनपाल राजेंद्र आहेर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी अध्यक्ष विजय टाटिया यांनी शाळेतील विद्यार्थ्यांचे कौतुक केले. त्यांनीं नमस्ते नाशिक फाउंडेशन यांच्या कार्याचे कौतुक केले आणि संस्थेस पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. संस्थेला अश्या स्तुत्य उपक्रमासाठी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. शाळेच्या वतीने आभार - शाळेचे सहाय्यक शिक्षक एल. एम. लोहारे, सोनाली ठाकरे प्रशिक्षणार्थी,तसेच मुख्याध्यापक आर. जी. शिंदे यांनी या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना केलेल्या सहकार्याबद्दल नम्र आभार मानले. कार्यक्रमास फुलचंद सप्रे शाळा व्यवस्थापन समिती, सरपंच सुनीता दत्तू सदगीर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. स्नेहल देव यांनी सांगितले की, “हा उपक्रम केवळ वस्तूंचे वाटप नाही, तर विद्यार्थ्यांच्या जीवनात आशेचा किरण पेरणारा आहे.” "एक पाऊल शिक्षणासाठी...एक पाऊल उज्वल भविष्यासाठी "! असे काम करून जो आनंद मिळतो तो सर्वात महत्त्वाचा आहे असे त्यांनी सांगितले.

## ➤ महत्त्वाचे

### बुधवारी सदाबहार गीतांची धुमधडाका सुरेल मैफल

**नाशिक ।** एमपी स्टार ग्रुपचे संचालक मोहन पवार व स्मिता पवार यांनी ‘धुमधडाका’ या सदाबहार सुरेल गीतांच्या मैफलीचे आयोजन केले आहे. उद्या बुधवारी सायंकाळी ६ वाजता ही विनामूल्य मैफल इंदिरानगर येथील बापू बंगल्याजवळ स्वर्णिमा सभागृहात होईल. यावेळी १४ गायिका व २१ गायक कलाकार रसिकांच्या पसंतीची सुमधूर गाणी सादर करतील. या मैफलीसाठी हरिभाई ठक्कर, प्रकाश गोसावी, अनिल पोटे यांचे मार्गदर्शन लाभले आहे. रसिक श्रोत्यांनी उपस्थित राहून कलाकारांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन केले आहे.

### के.बी.एच.विद्यालयात बेसबॉल प्रशिक्षण संपन्न

**नाशिक ।** महात्मा गांधी विद्यामंदिर पंचवटी संचलित, पवननगर येथील के. बी. एच. विद्यालयात मुख्याध्यापक रवींद्र बाचकर यांच्या मार्गदर्शनाखाली बेसबॉल प्रशिक्षण संपन्न झाले. यावेळी ओंकार



परसपाटकी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आपण जिल्हा, महाराष्ट्र, देश पातळीवर कसे खेळू शकतो याबाबत सूचना केल्या. मुख्याध्यापक बाचकर, संजय अहिरे, पर्यवेक्षक निकम, क्रीडाशिक्षक रवींद्र साळुंखे, क्रीडाशिक्षक सोनवणे आदींसह विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार नरोडे यांनी केले.

### प्रा. ऋषिकेश वरे यांचे महाराष्ट्र सेट परीक्षेत यश

**नाशिक ।** मराठा विद्या प्रसारक समाजाचे कला,



वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय मखमलाबाद येथील भौतिकशास्त्र विभाग प्रमुख प्रा. ऋषिकेश दत्तात्रय वरे यांनी नुकत्याच झालेल्या सेट परीक्षेत भौतिकशास्त्र या विषयात अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने आणि सूक्ष्म अभ्यास करून भौतिकशास्त्र या कठीण विषयात सेट परीक्षा उत्तीर्ण झाले आहे. महाविद्यालयीन सर्व कामकाज सांभाळून त्यांनी हे यश मिळवले आहे. या यशासाठी त्यांना मराठा विद्या प्रसारक संस्थेचे सरचिटणीस ॲड.नितीन भाऊ ठाकरे, अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले, बाळासाहेब क्षीरसागर, विश्वास मोरे, रमेश पिंगळे, येवला तालुका संचालक नंदकुमार बनकर, शिक्षणाधिकारी प्रा.डॉ. नितीन जाधव, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. मनीषा आहेर, दत्तात्रेय वरे, वंदना वरे, किशोर वरे महाविद्यालयातील सर्व सहकारी प्राध्यापक, प्राध्यापिका, सेवक आदींनी अभिनंदन केले आहे.

# शिक्षकांनी साजरा केला शिक्षकांसाठी शिक्षक दिन

**नाशिक ।** अंधारातून प्रकाशाकडे घेऊन जाणारा व `अ` पासून `अज्ञान` ते ज्ञान पासुन `ज्ञान` देणारा व समाजामध्ये एक जबाबदार नागरिक घडवणारा असतो तो शिक्षक. शिक्षक हा एक पवित्र पेशा आहे. आजही समाजाचा शिक्षकांकडे बघण्याचा दृष्टिकोन आदर्शवत असतो. शिक्षक ही काळाची गरज आहे. शिक्षक विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करीत असतो. म्हणून शिक्षकाचे स्थान नेहमी उच्च असते.




५ सप्टेंबर हा दिवस संपूर्ण भारतात माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस शिक्षक दिन म्हणून साजरा होत असतो. यंदा ५ सप्टेंबर रोजी ईद ए मिलाद निमित्त सुट्टी असल्याने हा कार्यक्रम दिनांक ७ सप्टेंबर २०२५ रोजी पुणे विद्यार्थी गृहाच्या शिक्षणशास्त्र व संशोधन महाविद्यालयात साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाच्या विद्यार्थी शिक्षकांनी विविध स्पर्धेचे आयोजन केले होते. त्यामध्ये विद्यार्थी शिक्षक अजय गायकवाड, मेगा गौरी घोडके व वैभव जाधव यांनी `शिक्षण क्षेत्रातील सद्यपरिस्थिती व शिक्षकांचे महत्त्व` या विषयावर विनोदात्मक नाटिका सादर केली. तसेच अजय गायकवाड या विद्यार्थी शिक्षकाने आजच्या शिक्षकाने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून विद्यार्थ्यांना शिकवले पाहिजे, आजच्या जनरेशनच्या गरजा लक्षात घेऊन त्यांच्या भावनिक व बौद्धिक क्षमता ओळखून त्यांना शिकवले पाहिजे. या विषयावर आपले विचार मंथन केले. तर विद्यार्थी शिक्षक वैभव जाधव याने शिक्षकांमुळे त्यांच्या जीवनात काय बदल झाला व शिक्षक होण्यासाठी त्याला मिळालेली प्रेरणा व त्यासाठी लाभलेले शिक्षकांचे मार्गदर्शन यावर त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच विद्यार्थी शिक्षक अजय अलबाड याने शिक्षकांवर आपली स्वरचित कविता सादर केली. महाविद्यालयाच्या प्राध्यापकांसाठी विद्यार्थी शिक्षकांनी विविध गेम्सचे आयोजन केले होते. तसेच प्रथम वर्षापासून ते आजतागायत त्यांनी शिक्षकांसोबत घालवलेल्या क्षणांची चित्रफीत सादर करून सर्वांना भावूक केले. शिक्षक दिनानिमित्त विद्यार्थी शिक्षकांनी सर्व प्राध्यापकांना `आसू आणि हसू`या उत्साह पूर्ण वातावरणात कार्यक्रम रांगोळी काढून गीत गायन करुन साजरा केला.यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश पाटील सर यांनी सर्व विद्यार्थी शिक्षकांचे कौतुक करत असताना `शिक्षकांनी नेहमी शिकत रहावे, नवीन बदलांचा स्वीकार करावा व चांगल्या व्यक्तीच्या सहवासात राहून त्यांचे आचार विचार अंगीकारत समाजामध्ये स्वतःची एक आदर्श ओळख निर्माण करावी. तसेच भविष्यात शिक्षक होण्यासाठी तयार असणाऱ्या विद्यार्थ्यांना प्राचार्य डॉ. पाटील सरांनी मार्गदर्शन व प्रेरणादायी विचार आपल्या अनुभवात्मक उदाहरणातून सांगितले. शिक्षकांकडे प्रचंड ज्ञान, इच्छाशक्ती, सहनशीलता नैतिक गुण आवश्यक आहे. असे सांगत त्यांनी सर्व विद्यार्थी शिक्षकांना भावी शिक्षक होण्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी पीव्हीजी शिक्षण शास्त्र व संशोधन महाविद्यालयाचे प्रा. डॉ. अरविंद जिंजर, प्रा. डॉ. रबाब भगत सेट परीक्षा पास झाल्याबद्दल त्यांचे विद्यार्थी शिक्षक व महाविद्यालयाच्या वतीने अभिनंदन करण्यात आला.

महाविद्यालयाचे सहकारी प्राध्यापक प्रा. प्रीती पाटील, प्रा. रोहिणी भालेराव, प्रा.अनिता बोडके उपस्थित होत्या. सूत्रसंचालन विद्यार्थी शिक्षिका मेघा गौरी घोडके हिने केले. आभार प्रदर्शन सेजल गुजरातीने केले. कार्यक्रमासाठी राणी मगर व योगिनी सोनवणे या विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

# माध्यम प्रतिनिधींच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्नशील राहणार : यदू जोशी

## नाशिकला माध्यम प्रतिनिधींसाठी कार्यशाळा संपन्न



**नाशिक ।** राज्यातील माध्यम प्रतिनिधींचे प्रश्न, समस्यांची आपल्याला जाणीव आहे. त्या सोडविण्यासाठी राज्य शासनाकडे पाठपुरावा करण्यात येईल, अशी ग्वाही महाराष्ट्र राज्य अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष यदु जोशी यांनी येथे दिली.

नाशिक विभागीय अधिस्वीकृती समिती, माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालय अधिनस्थ जिल्हा माहिती कार्यालय, नाशिक आणि एचपीटी कला व आरवायके विज्ञान महाविद्यालय, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने एचपीटी महाविद्यालयाच्या कुसुमाग्रज सभागृहात आयोजित विकास पत्रकारिता कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे संचालक हेमराज बागूल, राज्य अधिस्वीकृती समितीचे सदस्य प्रकाश कुलथे, नाशिक विभागीय अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष सुधीर लंके, नाशिक विभागाचे उपसंचालक डॉ. किरण मोघे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयप्रसाद अवस्थी, उपप्राचार्य डॉ. प्रणव रत्नपारखी, डॉ. प्रशांत देशपांडे, विभागीय अधिस्वीकृती समितीचे सदस्य विजयसिंह होलम, चंदन पुजाधिकारी, अभिजित कुलकर्णी, किरण लोखंडे, जिल्हा माहिती अधिकारी विलास बोडके आदी उपस्थित होते. जोशी म्हणाले, वृत्तपत्रे आणि वृत्तवाहिन्यांच्या माध्यमातून समाजाचे विविध प्रश्न माध्यम प्रतिनिधी मांडत असतात. मात्र, माध्यम प्रतिनिधी यांच्याही समस्या असतात. त्या आपण जवळून अनुभवत आहोत. त्या सोडविण्यासाठी राज्य अधिस्वीकृती समितीच्या माध्यमातून प्रयत्नशील आहे. नाशिक शहराने पत्रकारितेचे संस्कार केले असून, या शहराचे माझ्यावर ऋण आहेत. नाशिक शहरात पत्रकारांसाठी गृह योजनेचा प्रस्ताव आहे. तो पूर्णत्वासाठी राज्य शासनाकडे पाठपुरावा करण्यात येईल, त्यासाठी स्वयंसेवक म्हणून काम करू. मंत्रालय विधिमंडळ वार्ताहर संघाच्या सदस्यांसाठी असलेल्या विमा योजनेच्या धर्तीवर नाशिकच्या माध्यम प्रतिनिधिंसाठी योजना लागू करण्यासाठी पाठपुरावा करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

### लोकशिक्षणाचे माध्यम पत्रकारिता : हेमराज बागूल

संचालक बागूल म्हणाले, मराठी पत्रकारितेला समृद्ध वारसा लाभला आहे. विविध भाषांचे अभ्यासक, संशोधक, बहुआयामी व्यक्तिमत्व असलेल्या आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी मराठी पत्रकारितेचा पाया रचला. त्यांच्यापासून ते टिळकांपर्यंत अनेकांनी यात आपले योगदान दिले आहे. शिळा मुद्रण ते अत्याधुनिक एआय तंत्रज्ञानापर्यंत पत्रकारितेची वाटचाल झाली आहे. स्वातंत्र्यानंतर विकास पत्रकारितेला चालना मिळाली. विकासाच्या संकल्पनेला व्यापक आयाम आहे. त्याच दृष्टिकोनातून विकास पत्रकारिता कार्यशाळेकडे पाहता येईल. लोकशिक्षणाचे माध्यम पत्रकारिता आहे. स्वातंत्र्योत्तर काळात लोककल्याणकारी राज्यासाठी राज्य शासनाला पत्रकारिता अधिक समृद्ध पाहिजे. त्याच दृष्टिकोनातून विकास पत्रकारिता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे, असेही त्यांनी सांगितले. प्राचार्य डॉ. अवस्थी म्हणाले, समाजाच्या विकासात पत्रकारांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. महाविद्यालयाच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्यात येतात. अशा प्रकारच्या कार्यशाळा पत्रकार आणि विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

उपसंचालक डॉ. मोघे म्हणाले, सामाजिक भान, सामाजिक जाणीव, विश्लेषणात्मक अनुभव समृद्ध विकास पत्रकारितेला चालना देण्याची भूमिका आहे. त्यासाठी स्व. शंकरराव चव्हाण पत्रकार कल्याण निधी, बाळशास्त्री जांभेकर पत्रकार कल्याण निधी, विकास पत्रकारिता पुरस्कार आदी विविध योजना आहेत. माध्यम प्रतिनिधिंनी जिल्हा माहिती कार्यालयाच्या माध्यमातून या योजनांची माहिती घेऊन त्यांचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. लंके म्हणाले, अधिस्वीकृती पत्रिका म्हणजे एक प्रकारची राज्य शासनाची मान्यता आहे, त्यामुळे आपण अधिक जबाबदारीने काम करण्याची आवश्यकता आहे. पूर्ण वेळ काम करणाऱ्या पत्रकाराला अधिस्वीकृती मिळण्यासाठी समितीचे प्रयत्न राहतील, असे सांगत त्यांनी अधिस्वीकृती पत्रिका, राज्य शासनाची आचार्य बाळशास्त्री जांभेकर सन्मान योजनेची माहिती दिली. विभागीय अधिस्वीकृती समितीचे सदस्य अभिजित कुलकर्णी यांनीही मनोगत व्यक्त केले. जिल्हा माहिती अधिकारी बोडके यांनी प्रास्ताविक केले. प्रा. अनुजा मराठे यांनी सूत्रसंचालन केले. उपप्राचार्य डॉ. रत्नपारखी यांनी आभार मानले. यावेळी जिल्हा माहिती अधिकारी रणजितसिंह राजपूत, रवींद्र ठाकूर, गोपाळ साळुंखे, अमोल महाजन, विभागाचे सहाय्यक संचालक दीपक चव्हाण यांच्यासह माध्यम प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# कुरकुरीत ब्रेड भजी

झटपट रेसिपी

मित्रांनो, संध्याकाळी चहासोबत तुम्ही छानपैकी ब्रेडची भजी खाऊ शकता. ही कुरकुरीत भजी संध्याकाळच्या वेळी पोटभरीची ठरतील.

**सामग्री:** चार ब्रेड स्लाईस, अर्धा कप दही, पाउण कप बेसन, वाटलेली हिरवी मिरची एक चमचा, थोडी कोथबिर, चवीनुसार मीठ, तेल

**कृती:** ब्रेड स्लाईसच्या कडा कापून घ्या. उरलेल्या ब्रेडचे छोटे तुकडे करून घ्या. आता एका भांड्यात बेसन, मिरची, दही आणि मीठ घालून घट्टसर पीठ बनवून घ्या. त्यात ब्रेडचे तुकडे घाला. आता कढईत तेल गरम करायला ठेवा. आता चमच्याने हे मिश्रण हलकेच कढईत सोडा. सोनेरी रंगावर तळून घ्या. कुरकुरीत आणि खमंग ब्रेड भजी चहासोबत खा.




# शेतकऱ्याची साबणनिर्मिती

अचिव्हर



असे म्हटले जाते की आवड असेल तर शेती फक्त धान्यांपुरती मर्यादित नाही, नवीन प्रयोग करून शेतकरी स्वतःसाठी रोजगार आणि ओळख दोन्ही निर्माण करू शकतात. मध्य प्रदेशातील बुरहानपूर जिल्ह्यातील एकझिरा गावातील शेतकरी सूपडू चौहान यांनी असाच एक पराक्रम केला आहे. गेल्या चार वर्षांपासून केळीची नैसर्गिक शेती करणाऱ्या सूपडू चौहान यांनी आता शेतीसोबतच नवनवीन प्रयोग करून कडुनिंब आणि कोरफडीपासून हर्बल साबण बनवण्यास सुरुवात केली आहे.

टाळेबंदीदरम्यान सर्व काही बंद होते, तेव्हा सूपडू यांनी मोबाईलवर एक व्हिडीओ पाहिला. त्यात कडुनिंब आणि कोरफडीपासून साबण बनवण्याची पद्धत समजावून सांगितली होती. सुरुवातीला त्याने लहान प्रमाणात प्रयोग केले आणि यशस्वी झाल्यानंतर मोठ्या प्रमाणात उत्पादन सुरू केले.

**साबण कसा बनवला जातो?**

सूपडू सांगतात, मी कडुलबाची पाने, कोरफडीचे जेल आणि ग्लिसरीन मिसळून साबण तयार करतो. यात कोणत्याही प्रकारचे रसायन नसल्यामुळे ते पूर्णपणे हर्बल आणि त्वचेला अनुकूल आहे. मुरुम आणि मुरुमांच्या समस्येत ते खूप प्रभावी ठरते. एकदा प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी सुमारे १५ दिवस लागतात. एका बॅचमध्ये २०० ते ३०० नग साबण तयार केले जातात. बाजारात त्यांची कमत प्रति नग २० रुपये आहे.

**किती कमाई?**

शेतकरी सूपडू चौहान दरमहा ६०० ते ७०० साबण विकतात. ते घरोघरी आणि दुकानांमध्ये साबण पुरवतात आणि दरमहा चांगले उत्पन्न मिळवतात. ते म्हणतात, की शेतीतून जितका आनंद आणि समाधान मिळते तितकाच आनंद लोक मझा साबण वापरतात आणि म्हणतात, की त्याचा त्यांना फायदा झाला तेव्हा मिळतो. माझ्यासाठी ही सर्वात मोठी कमाई आहे.

**नैसर्गिक शेतीतून दुहेरी फायदा**

केळ्याच्या शेतीमध्ये सूपडू फक्त सेंद्रिय खते आणि नैसर्गिक पद्धती वापरतात. यामुळे पिकाची गुणवत्ता चांगली राहते आणि आता त्याच्या हर्बल साबण व्यवसायाने त्याची ओळख आणि उत्पन्न दोन्ही दुप्पट केले आहे.

## शेर की जुबानी


जिंदगी गुजर जाए पर दोस्ती कम न हो,
याद हमें रखना चाहे पास हम न हो।

तारों में अकेला चांद जगम गाता है,मुश्कीलों में अकेला इन्सान डगमगाता है,
कांटो से मत घबराना मेरे दोस्त,
क्योंकी काटों में भी गुलाब मुस्कुराता है।

कभी रात में तारे गिनके देख लेना,
जितना तुम गिन पाए उतना तुम हमें यात करते हो,
और जितने तारे बच जाए उतना हम तुमको याद करते हैं।

# 'रेझ्युमे' अधिक चांगला कसा कराल?

'डिजिटलायझेशन'च्या युगात नोकरी शोधण्याची प्रक्रिया झपाट्याने बदलत आहे. कंपन्यांकडे आज वेळेची कमतरता असून प्रत्येक उमेदवाराचा सीव्ही सखोलपणे वाचला जात नाही. त्यामुळेच आता जुन्या पद्धतीचे रेझ्युमे चालत नाहीत. त्याऐवजी कमी पण योग्य आणि प्रभावी माहिती असलेला सीव्ही महत्त्वाचा ठरत आहे.




सल्ला मोलाचा

आजही अनेकजण आपल्या 'सीव्ही'मध्ये वैयक्तिक माहिती, जसे की वैवाहिक स्थिती, धर्म, जन्मतारीख, आई-वडिलांची नावे अशा बाबी नमूद करतात; परंतु या माहितीचा नोकरीशी थेट काही संबंध नसतो. यामुळे सीव्ही लांबतो आणि मुख्य गोष्टींचे महत्त्व कमी होते. या जागेचा वापर आपण LinkedIn प्रोफाईल, पोर्टफोलिओ लक्स, ऋळींकील प्रोफाईल (IT क्षेत्रासाठी) यासाठी करू शकता. मोबाइल क्रमांक आणि ई-मेल मात्र अनिवार्य असावेत. कारण हेच तुमच्याशी संपर्क ठेवण्यासाठी मुख्य साधन ठरतात.

**'ऑब्जेक्टिव्ह' ठरवा**

एक मोठी चूक अनेक उमेदवार करतात, ती म्हणजे एकच 'Career Objebtive' अनेक ठिकाणी वापरणे; मात्र प्रत्येक कंपनीची गरज, कार्यपद्धती आणि संस्कृती वेगळी असते. त्यामुळे ज्या संस्थेसाठी अर्ज करत आहात, त्यानुसार ऑब्जेक्टिव्ह ठरवणे गरजेचे आहे. यामुळे 'एचआर' ला उमेदवाराच्या गंभीरतेचा आणि नोकरीसाठीच्या तत्परतेचा अंदाज येतो. केवळ नोकरीसाठी सुसंगत अनुभवच नमूद करा.

आपल्याकडे अनेक नोकरी कवा इंटर्नशिपचा अनुभव असतो; पण त्या सर्व नोंदवणे ही चूक ठरू शकते. कारण प्रत्येक अनुभव आवश्यकच असेल असे नाही. त्याऐवजी, संबंधित जॉबच्या भूमिकेशी जुळणारेच अनुभव समाविष्ट करा. यामुळे 'एचआर'चे वाचन सुकर होते आणि 'सीव्ही' अधिक लक्षवेधी ठरतो.

**स्पर्धा आणि उपक्रम गरजेपुरतेच लिहा**

शाळेतील लहान वयातील स्पर्धा, निबंध, चित्रकला अशा गोष्टी जर नोकरीशी संबंधित नसतील, तर त्यांचा उल्लेख टाळा. त्याऐवजी, शैक्षणिक प्रगती, मिळवलेली स्कॉलरशिप, संबंधित कोर्सेसचे उल्लेख फायदेशीर ठरू शकतात.

# राजस्थानात ही ठिकाणे अवश्य पाहा...



स्टाईल स्टेटमेंट

भारतातील सर्वात रंगीबेरंगी आणि ऐतिहासिक राज्य म्हणजे राजस्थान. ते खासमखास राजवाड्यांसाठी, किल्ल्यांसाठी, वाळवंटांसाठी, तलावांसाठी आणि चैतन्यशील संस्कृतीसाठी ओळखले जाते. राजस्थानची राजधानी असलेले गुलाबी शहर जयपूर, त्याच्या ऐतिहासिक वारसा आणि शाही वैभवासाठी ओळखले जाते. येथे आमर महल, सिटी पॅलेस आणि हवा महलला भेट देणे आवश्यक आहे. जयपूरच्या रंगीबेरंगी बाजारपेठांमध्ये दागिने, बूट आणि हस्तकला खरेदी करणेदेखील आनंददायी आहे.

**※ उदयपूर लेक सिटी**

रोमँटिक ठिकाणांची आवड असेल, तर उदयपूर परिपूर्ण आहे. येथे सिटी पॅलेस, लेक पिचोला आणि सहेलियों की बारीसारखी सुंदर ठिकाणे आहेत. रात्री पिचोला लेकवर बोटग करणे हा एक संस्मरणीय अनुभव ठरतो. उदयपूर हे केवळ भारतीय पर्यटकांमध्येच नाही, तर परदेशी पर्यटकांमध्येही खूप प्रसिद्ध आहे. दरवर्षी मोठ्या संख्येने परदेशी पर्यटक येथे भेट देण्यासाठी येतात.

**※ सोनेरी वाळूचे शहर जैसलमेर**

जैसलमेर सोनेरी वाळू आणि वाळवंट संस्कृतीसाठी प्रसिद्ध आहे. सोनार किल्ला आणि गडीसर तलाव हे येथील मुख्य आकर्षण आहेत. जैसलमेरच्या वाळवंटात सँड सर्फिंग आणि कॅम्पफायरचा आनंद घेण्यास विसरू नका.

**※ जोधपूर ब्लू सिटी**


जोधपूरचा मेहरानगड किल्ला आणि उम्मेद भवन पॅलेस पाहण्यासारखे आहेत. जोधपूरच्या रस्त्यांवर फिरताना निळ्या घरांचे सौंदर्य तुम्हाला मंत्रमुग्ध करेल. येथील स्ट्रीट फूडचादेखील आवर्जून आस्वाद घ्यायला हवा.

**※ रणथंभोर आणि सवाई माधोपूर**

निसर्गप्रेमी असाल, तर रणथंभोर राष्ट्रीय उद्यानात वाघ सफारी नक्की करा. येथे तुम्हाला वाघ, बिबटे आणि इतर वन्य प्राणी पाहायला मिळतील. प्रत्येक कोपरा तुम्हाला एक नवीन कहाणी सांगतो. कधी राजांच्या अभिमानाची आणि वैभवाची, कधी वाळवंटातील सोनेरी वाळूची आणि साहसी अनुभवाची.

राजस्थानमध्ये प्रवास करणे हे केवळ पर्यटन नाही, तर तो एक अनुभव आहे. येथील रस्त्यांवर चालताना तुम्हाला इतिहास, कला आणि लोकसंस्कृतीचे थेट प्रदर्शन पहायला मिळेल. रंगीबेरंगी बाजारपेठा, स्वादिष्ट स्ट्रीट फूड, पारंपारिक राजस्थानी पोशाख आणि संगीत इथे भुरळ घालते.

## स्मार्ट टिप्स



**'व्हॉट्स ॲप' वर नवीन वैशिष्ट्ये**

'व्हॉट्स प'मध्ये ही तीन नवीन वैशिष्ट्ये आली आहेत.

**※ शेड्यूल्ड कॉल**

आता वापरकर्ते 'व्हॉटस प' मध्ये ग्रुप कॉल शेड्यूल करू शकतात. याचा अर्थ असा, की वापरकर्ता त्याच्या कोणत्याही संपर्कांना कवा संपूर्ण गटाला व्हिडीओ कॉलसाठी आगाऊ सूचना पाठवू शकतो.

**※ इन-कॉल इंटरॅक्शन टूल्स**

दुसरे नवीन वैशिष्ट्य इन-कॉल इंटरॅक्शनबद्दल आहे. याचा अर्थ असा, की आता 'व्हॉटस प' वापरकर्ते व्हिडीओ कॉल दरम्यान प्रतिक्रिया देऊ शकतील. उदाहरणार्थ, एखाद्या वापरकर्त्याला बोलायचे असेल तर तो व्हिडीओ कॉल दरम्यान हात वर करू शकतो. त्याचप्रमाणे, तो संभाषणात व्यत्यय न आणता कॉल दरम्यान प्रतिक्रिया देऊ शकतो.

**※ नवीन कॉल व्यवस्थापन**

कंपनीने कॉल टॅबदेखील अपडेट केला आहे. आता त्यात येणाऱ्या कॉलमध्ये सहभागी होणाऱ्या लोकांची यादी आणि शेअर करण्यायोग्य कॉल लक्सचे स्पष्ट दृश्य असेल. यासोबतच, जेव्हा कोणी शेअर केलेल्या लकवरून कॉल अटेंड करेल, तेव्हा कॉलरला त्याची सूचना मिळेल. ही 'व्हॉटस प'ची तयारी आहे. 'व्हॉटस प'ने वैयक्तिक आणि व्हिडीओ कॉलशी संबंधित ही महत्त्वाची वैशिष्ट्ये आणून तयारी केली आहे.

## टेक्नो टॉक


**'व्हॉट्स ॲप'ला इन्स्ट्राग्राम अकाऊंट जोडणारे फीचर**




**हे फीचर कसे काम करते?**

'मेटा'च्या अकाउंट सेंटरद्वारे इंस्टाग्राम अकाउंट लक करता येते. या फीचरमुळे वापरकर्त्यांना 'मेटा'च्या अकाउंट सेंटरद्वारे त्यांचे इंस्टाग्राम अकाउंट व्हॉट्स प्रोफाइलशी लक करण्याचा पर्याय मिळेल. 'व्हेरिफिकेशन'नंतर हे अकाउंट लक केले जाईल. एकदा पडताळणी झाल्यानंतर प्रोफाइलवर 'सोशल आयकॉन' दिसेल. यामुळे 'व्हॉट्स अप' वापरकर्त्याच्या संपर्काला हे अकाउंट खरे आहे हे कळेल. हा पर्याय आधीही होता; परंतु आधी त्यात व्हेरिफिकेशन जोडले गेले नव्हते. 'व्हॉट्स अप' वापरकर्ते त्यांच्या प्रोफाइलवर कोणतेही इंस्टाग्राम अकाउंट दाखवू शकत होते. अशा परिस्थितीत काही वापरकर्ते गोंधळले होते, की 'व्हॉट्स अप' प्रोफाइलवर दिसणारे अकाउंट खरे आहे की दुसऱ्याचे इंस्टाग्राम अकाउंट आहे. हे फीचर सर्व वापरकर्त्यांसाठी आणलेले नाही. सध्या कंपनी फक्त बीटा वापरकर्त्यांसाठी याची चाचणी घेत आहे. नंतर अभिप्रायाच्या आधारे टप्प्याटप्प्याने सर्व वापरकर्त्यांसाठी आणले जाईल. 'व्हॉट्स अप'च्या या नवीनतम वैशिष्ट्याचा लाभ घेण्यासाठी, प नियमितपणे अपडेट करत राहणे महत्त्वाचे आहे.

## टिप्स अँड ट्रिक्स



**इच्छेप्रमाणे फोटो एडिटींग करता येणार**

'गूगल'ने आपल्या गूगल फोटोज पसाठी एकदम मस्त अपडेट आणले आहे. हे फीचर फोटो प्रेमींसाठी वरदान ठरणार आहे. त्यामुळे फोटो एडिटग आता सोपे आणि मजेदार होणार आहे. या नव्या फीचरमुळे वापरकर्ते फक्त आपली इच्छा बोलून सांगून फोटो एडिट करू शकतील.

सर्वात अगोदर हे फीचर अमेरिकेतील पिक्सेल १० डिव्हाइसेसवर उपलब्ध होईल. त्यानंतर येत्या काही आठवड्यांमध्ये इतर अँड्रॉइड आणि 'आयओएस डिव्हाइसेस'वरही ते विस्तारित होईल. 'गूगल'च्या जेमिनी मॉडेल्सवर आधारित हे नवे फीचर 'गूगल फोटोज'च्या एडिटरचा भाग आहे. आता फोटो एडिट करण्यासाठी अवघड साधने शोधण्याची कवा स्लायडर्स ड करण्याची गरज नाही. हे वापरणारी व्यक्ती हवे असलेले बदल बोलून सांगू शकतात. उदाहरणार्थ 'बॅकग्राउंडच्या गाड्या काढा', 'हा जुना फोटो नवीन बनवा' कवा अगदी 'हा फोटो जरा चांगला कराफ अशा सूचना देता येतील. गूगल फोटोज त्या सूचनांचे पालन करून एडिट करेल. या फीचर्समुळे फोटो एडिटग केवळ जलदच होणार नाही, तर सर्वसामान्य वापरकर्त्यांसाठीही आणखी सोपे होईल.

# करीअर निवडीसाठी काय कराल?




करीअरवेध

करीअरच्या प्रवासाला सुरुवात करणे हा एखाद्याच्या आयुष्यातील एक महत्त्वाचा क्षण असतो. आज तुम्ही घेतलेले निर्णय तुमचे भविष्य घडवतील, तुमच्या आनंदावर, आर्थिक स्थिरतेवर आणि एकूण समाधानावर परिणाम करतील. उपलब्ध असंख्य शक्यता आणि मार्गांमुळे योग्य करिअर मार्ग निवडणे कठीण वाटू शकते. तथापि, एक संरचित दृष्टिकोन अवलंबून आणि विविध घटकांचा विचार करून तुम्ही आपल्या कौशल्यांना, आवडींना आणि आकांक्षांना अनुकूल असा निर्णय घेऊ शकता.

**१. स्व-मूल्यांकन:** योग्य करिअर मार्ग निवडण्याचे पहिले पाऊल म्हणजे स्वतःला समजून घेणे. तुमची ताकद, कौशल्ये, आवडी आणि मूल्यांचे मूल्यांकन करण्यासाठी वेळ काढा. तुम्ही नैसर्गिकरित्या कशात चांगले आहात, कोणत्या बाबी तुम्हाला ऊर्जा देतात याचा अंदाज घ्या. तुमचे छंद, शैक्षणिक यश आणि मित्र आणि मार्गदर्शकांकडून मिळालेल्या अभिप्रायाचा विचार करा. तुमच्यासाठी योग्य असलेले करिअर पर्याय ओळखण्यासाठी आत्म-जागरूकता ही गुरुकिल्ली आहे.

**२. संशोधन:** विविध करिअर पर्यायांचा शोध घ्या. जगात करिअरचे अनेक पर्याय उपलब्ध आहेत, त्यापैकी बरेच तुम्हाला कदाचित माहितीही नसतील. विविध उद्योग, नोकरीच्या भूमिका आणि व्यवसायांचा शोध घ्या. त्यांच्या जबाबदाऱ्या, आवश्यक पात्रता आणि संभाव्य वाढीच्या शक्यतांबद्दल जाणून घ्या. या क्षेत्रात आधीच असलेल्या व्यावसायिकांकडून अंतर्दृष्टी मिळविण्यासाठी नोकरी मेळे, सेमिनार आणि कार्यशाळांना उपस्थित रहा. येथेच रोजगार मेळा योजना कामाला येते.

**३. नोकरी मेळावे यांचा परिचय:** रोजगार मेळा हा एक मौल्यवान उपक्रम आहे, त्याचा उद्देश म्हणजे नोकरी शोधणाऱ्यांना नियोक्त्यांशी जोडणे. हे नोकरी मेळे व्यासपीठ म्हणून काम करतात, जिथे विविध कंपन्या आणि संस्था त्यांचे काम आणि उपलब्ध पदे प्रदर्शित करण्यासाठी बूथ स्थापित करतात. नोकरी मेळाव्यात सहभागी झाल्याने संभाव्य नियोक्त्यांशी थेट संपर्क साधता येतो. त्यामुळे संवाद साधण्याची, नोकरीच्या भूमिकांबद्दल चौकशी करण्याची आणि तुमचा सीव्ही सबमिट करण्याची संधी मिळते. ही योजना नोकरी शोधणाऱ्या आणि रोजगाराच्या संधींमधील अंतर कमी करण्यासाठी पूल म्हणून काम करते.

**४. कौशल्य विकास:** संभाव्य करिअर मार्ग ओळखल्यानंतर, तुम्हाला काही कौशल्यातील तफावत जाणवू शकते. स्वतःला अधिक आकर्षक उमेदवार बनवण्यासाठी या तफावती भरून काढणे आवश्यक आहे. आवश्यक कौशल्ये आत्मसात करण्यासाठी कार्यशाळा, अभ्यासक्रम कवा ऑनलाइन वर्गांमध्ये नावनोंदणी करण्याचा विचार करा. रोजगार मेळा योजना अनेकदा कौशल्य विकास सत्रेदेखील देतात. त्यामुळे क्षमता वाढते आणि इच्छित क्षेत्रात नोकरी मिळण्याची शक्यता वाढते.

**५. ध्येय निश्चिती:** अल्पकालीन आणि दीर्घकालीन सुस्पष्ट ध्येय तुमच्या करिअर प्रवासाला दिशा देऊ शकते. अल्पकालीन आणि दीर्घकालीन दोन्ही ध्येये निश्चित करा. पुढील काही वर्षांमध्ये तुम्ही काय साध्य करण्याचे ध्येय ठेवता? ते तुमच्या दीर्घकालीन आकांक्षांशी कसे जुळते हे बघून घ्या. स्पष्ट ध्येय असणे तुम्हाला लक्ष केंद्रित करण्यास आणि प्रेरित राहण्यास मदत करू शकते.

# तिला गमवायचं नाही...



मॅच मेकिंग

गेल्या सहा महिन्यांपासून मी एका मुलीच्या प्रेमात आहे. तिच्या आणि माझ्या आईवडिलांना आमच्या नात्याबद्दल कल्पना आहे. पण गेल्या काही दिवसांपासून माझी मैत्रीण खूपच विचित्र वागते आहे. तिच्या आईवडिलांना आमचं हे नातं पसंत नसल्याचं तिचं म्हणणं आहे. ती याचं कारणही सांगायला तयार नाही. मी तिच्या पालकांशी बोलायला तयार आहे. पण ती याबद्दल काहीच बोलत नाही. आता मी काय करू? मला तिला गमवायचं नाही.

**उत्तर :** मित्रा, सध्या तू विचित्र परिस्थितीत अडकला आहेस. खरं तर तुझ्या मैत्रिणीने तिच्या पालकांच्या मनातलं जाणून घ्यायला हवं. त्यांच्या मनात तुझ्याबद्दल नेमकं काय आहे, न भेटताच ते तुला का नाकारत आहेत हे तिला कळायला हवं. आधी तिच्या पालकांचं म्हणणं ऐकून घ्या. मग तुम्ही दोघं बोला आणि पुढे काय करायचं हे ठरवा. तुम्ही दोघांनीही शांत रहाणं गरजेचं आहे. अजिबात गोंधळून जाऊ नका. काहीतरी मार्ग नक्कीच निघेल.

# सांभाळा शरीराचा तोल



फिटनेस फंडा

दोस्तांनो, आपल्याला आपल्या शरीराचा तोल सांभाळता आला पाहिजे. तोल सांभाळण्याचा सराव तुम्ही करू शकता. शरीराचा तोल सांभाळण्याचे लाभ जाणून घेऊ.

※ तोल सांभाळण्याच्या सरावामुळे तुमचे सांधे, स्नायू बळकट होतात. गुडघे, पायाच्या घोट्यालगतच्या स्नायूंना याचा लाभ होतो.

※ शरीराचा तोल सांभाळण्याचं तंत्र गवसल्यामुळे दुखापतीची शक्यता कमी होते.

※ शरीराचा तोल सांभाळण्याचा सराव करण्याआधी शरीराची क्षमता तपासून घ्या. यासाठी एका पायावर उभे रहा. अशा स्थितीत किती वेळ उभं रहाता येतं हे बघा. साधारण मिनिटभर या स्थितीत उभं रहाता यायला हवं.

※ तोल सांभाळण्यासाठी स्क्वॅट्स करायला सुरूवात करा. यामुळे पाय, पोटऱ्या आणि मांड्यांचे स्नायू बळकट होतील आणि एका पायावर तोल सांभाळणं शक्य होईल.

※ एका पायावर शरीराचा तोल सांभाळायचा सराव करा. स्क्वॅट्सच्या तुलनेत हा व्यायामप्रकार थोडा कठीण आणि गुंतागुंतीचा आहे. मात्र यामुळे तुम्हाला तोल सांभाळण्याचं तंत्र गवसेल.

※ योगासनं करताना शरीराच्या स्थितीत सतत बदल होत असतात. यामुळे शरीराचा तोल साधणं शक्य होतं. अगदी साधी योगासनं करतानाही वेगवेगळ्या स्नायूंवर ताण येतो. या सगळ्याचे लाभ शरीराला होतात.

# कॉन्सेप्ट स्टोअर सुरू करायचंय?



वेगळ्या वाटा

सध्या ऑनलाईन शॉपिंगचा बराच बोलबाला आहे. विविध ऑनलाईन साईट्स ग्राहकांवर सवलतींची खैरात करतात. मोबाईल फोनसह विविध इलेक्ट्रॉनिक वस्तू अर्ध्या किमतीत मिळतात. अशा ऑनलाईन शॉपिंग साईट्समुळे दुकानदारांपुढे बरीच आव्हानं उभी राहिली. तरुण मंडळी ऑनलाईन खरेदी करत असली तरी अनेकांना वस्तू प्रत्यक्ष बघून, स्पर्श करून खरेदी करायला आवडतं. सध्याच्या तीव्र स्पर्धेत टिकून रहाण्यासाठी दुकानदारही वेगवेगळे फंडे लढवत असतात. त्यातूनच कॉन्सेप्ट स्टोअर ही संकल्पना उदयाला आली आहे. या कॉन्सेप्ट स्टोअरच्या माध्यमातून तुम्हीही उद्योजक बनू शकता. याबाबतचं मार्गदर्शन...

कॉन्सेप्ट स्टोअर विशिष्ट संकल्पनेवर आधारित असतं. म्हणजे या स्टोअर्समध्ये ठराविक उत्पादनं विक्रीसाठी ठेवली जातात. काही दुकांनांमध्ये फक्त सौंदर्यप्रसाधनं मिळतात तर काहींमध्ये गृहोपयोगी वस्तू असतात. पुस्तकं, सजावटीच्या वस्तू अशा विविध संकल्पनांवर आधारित असणारी ही स्टोअर्स आता लोकप्रिय ठरत आहेत. ठराविक ग्राहकवर्ग समोर ठेऊन हे स्टोअर सुरू केलं जातं.

कॉन्सेप्ट स्टोअर ही संकल्पना अजूनही नवी आहे. त्यामुळे हा प्रकार लोकप्रिय होईपर्यंत थोडं थांबावं लागेल. दुसरं म्हणजे कॉन्सेप्ट स्टोअर्स नेहमीच्या दुकानांपेक्षा पूर्णपणे वेगळी असतात. ही स्टोअर्स ग्राहकांना आपल्याशी जोडून घेण्याचा पयत्न करतात. त्यांच्याशी जोडलेली रहातात. त्यामुळे कॉन्सेप्ट स्टोअर सुरू करताना ही बाब नेहमी लक्षात ठेवा.

# कोणत्या व्यक्तिमत्त्वासाठी कोणती जिन्स उपयुक्त?



स्टाईल स्टेटमेंट

जीन्स हा एक असा पोशाख आहे, जो आजकाल सर्व वयोगटातील लोकांच्या जीवनाचा एक महत्त्वाचा भाग बनला आहे. ऑफिसपासून बाहेरगावी जाईपर्यंत आणि पार्ट्यांपर्यंत, पुरुष तसेच महिलांना जीन्स घालायला आवडते. ते खरेदी करणेदेखील सोपे आहे. फक्त तुमच्या आकारानुसार ऑफलाइन कवा ऑनलाइन जीन्स खरेदी करा.

जीन्सदेखील शरीराच्या प्रकारानुसार येतात. हे ऐकायला विचित्र वाटत असले, तरी हे वास्तव आहे. प्रत्यक्षात, प्रत्येकाचा शरीराचा आकार वेगळा असतो आणि त्यानुसार जीन्स निवडणे महत्त्वाचे आहे. योग्य जीन्स केवळ तुमचे व्यक्तिमत्वच वाढवत नाही, तर तुम्हाला आरामदायीदेखील बनवते.

**※ जीन्स खरेदी करण्याच्या टिप्स**

पीअर शेप बॉडीः ज्या लोकांचे शरीर नाशपातीच्या आकाराचे असते, त्यांचे नितंब जड असतात, कंबर आणि वरचे शरीर पातळ असते. अशा लोकांनी बहुतेकदा सरळ फिट जीन्स, हाय-वेस्ट जीन्स, बूटकट जीन्स घालाव्यात. अशा जीन्स नाशपातीच्या आकाराच्या लोकांवर चांगल्या दिसतात.

**※ ॲपल शेप बॉडीः** ज्या लोकांचे शरीर सफरचंदाच्या आकाराचे असते, पोट जड असते, कंबर पातळ असते अशा लोकांनी मिड-राईज जीन्स, फ्लेर्ड जीन्स, रिलॅक्स फिट जीन्स घ्याव्यात. त्या त्यांना नेहमीच चांगल्या दिसतात. म्हणून पल शेप बॉडी असलेल्या लोकांनी अशा जीन्स खरेदी कराव्यात.

**※ अवरग्लास शेपः** तुमचे शरीरही अवरग्लास शेपचे असेल, शरीर वक्र असेल, कंबर लहान असेल, कंबर आणि छाती संतुलित असेल तर स्किनी जीन्स, हाय-वेस्ट स्ट्रेच जीन्स चांगल्या दिसतात. अशा लोकांनी जीन्स हुशारीने खरेदी करावी, अन्यथा त्यांचा लूक खराब होऊ शकतो. ज्या लोकांचे शरीर आयताकृती असते, त्यांची कंबर आणि छातीचा आकार जवळजवळ समान असतो. अशा लोकांनी नेहमी लो-राईज जीन्स, डिस्ट्रेस्ड जीन्स, बॉयफ्रेंड जीन्स घालावी. या प्रकारच्या जीन्स त्यांचे सौंदर्य वाढवेल.

**※ इनव्हर्टेड ट्रँगलः** ज्या लोकांचे शरीर उलटे त्रिकोण असते, त्यांचे वरचे शरीर रुंद असते आणि कंबर सडपातळ असते. अशा लोकांनी नेहमी फ्लेर्ड जीन्स, रुंद पायांची जीन्स, हाय-व्हॉल्यूम जीन्स घालावीत. यामुळे त्यांचे शरीर आणखी सुंदर दिसेल.

# शेअर बाजारात आयटी सेक्टरच्या जोरावर तेजी

## सेन्सेक्स 314 तर निफ्टी 95 अंकांनी वाढला



मुंबई, दि. ८ प्रतिनिधी

मंगळवारी शेअर बाजारात तेजी कायम राहिली आणि आयटी सेक्टरमध्ये झालेल्या खरेदीच्या जोरावर बाजाराने वाढीसह क्लोजिंग दिली. ऑटो सेक्टरसोबतच काही फार्मा शेअर्समध्येही खरेदी पाहायला मिळाली. ओपनिंग बेलपासूनच बाजार मजबूत राहिला आणि प्रत्येक घसरणीवर खरेदी झाली.

क्लोजिंग बेलच्या वेळी सेन्सेक्स ३१४ अंकांची वाढ नोंदवत ८११०१ वर बंद झाला, तर निफ्टी ९५ अंकांच्या वाढीसह २४८६९ वर स्थिरावला.

आज बाजारात गॅपअप ओपनिंगनंतर कन्सोलिडेशन पाहायला मिळाले आणि बेंचमार्क इंडेक्स सेन्सेक्स व निफ्टीने मजबूत पातळीवर क्लोजिंग दिली. ऑटो शेअर्ससोबत आयटी शेअर्समध्येही तेजी दिसून आली. आयटी सेक्टरमधील तेजीला इन्फोसिसने लीड केले. बायबॅकच्या बातमीमुळे इन्फोसिसचे शेअर्स ५% पर्यंत वाढले. अन्य आयटी शेअर्समध्ये विप्रो, टेक महिंद्रा आणि एचसीएल टेक ३% पर्यंतच्या तेजीमध्ये राहिले. फार्मा सेक्टरमध्ये डॉक्टर रेडीज, सनफार्मा यांनी चांगली वाढ नोंदवली. इन्शुरन्स सेक्टरमध्येही तेजी राहिली आणि एसबीआय लाइफ, एचडीएफसी लाइफ सारख्या शेअर्सनी चांगली कामगिरी केली.

दुसरीकडे निफ्टी ५० इंडेक्समधून ट्रेंट, इटरनल, अल्ट्राटेक सिमेंट, जिओ फायनान्शियल सर्व्हिसेस, इंडसइंड बँक आणि टायटन कंपनीचे शेअर्स घसरणीत बंद झाले.

ऑटो सेक्टरमध्ये सलग तेजी आहे आणि त्यासोबत आज आयटी सेक्टरमध्येही खरेदी झाल्याने निफ्टीमध्ये वरच्या पातळीवर कन्सोलिडेशन झाले आणि त्याचे

**सेन्सेक्स 81,101**

**निफ्टी 24,869**

नेतृत्व कायम राहिले. इन्फोसिसचे शेअर प्राइस ५% वाढले आणि संपूर्ण आयटी सेक्टरने निफ्टीला वर ढकलले, ज्यामुळे तो २४९०० च्या जवळ पोहोचला.

ऑटो शेअर्समध्ये बाजाराच्या ओपनिंगच्या वेळी फारशी वाढ नव्हती, पण आयटी सेक्टरमध्ये खरेदी आल्याने ऑटो शेअर्सनाही वर खेचण्यात आले आणि उच्च पातळीवर असूनसुद्धा त्यात खरेदी झाली.

मंगळवारच्या व्यवहारात निफ्टीमध्ये कन्सोलिडेशन दिसले आणि त्याची क्लोजिंगही चांगल्या पातळीवर झाली. निफ्टीने २४८५० ची पातळी टिकवून ठेवली आहे, हे एक सकारात्मक संकेत मानले जात आहे. आता निफ्टी २५००० च्या दिशेने जाऊ शकतो. खालच्या पातळीवर २४८०० हा स्तर निफ्टीसाठी आधार (सपोर्ट) म्हणून काम करेल.

मंगळवारच्या ट्रेडिंग सेशनमध्ये निफ्टीने २४८५० ची पातळी पार करून क्लोजिंग दिल्यामुळे पुढेही तेजी सुरू राहण्याचे संकेत मिळत आहेत.

# ‘शेवट चांगला होणार नाही’

## ट्रम्प यांच्या सल्लागाराचा भारताला गंभीर इशारा

वॉशिंग्टन, दि. ९ वृत्तसंस्था

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे व्यापार सल्लागार पीटर नवारो यांनी सोमवारी भारताला गंभीर इशारा दिला आहे. भारताला व्यापारासंबंधी चर्चेसाठी फिरून अमेरिकेकडे यावेच लागले अन्यथा गंभीर परिणामांना सामोरे जावे लागेल असे नवारो म्हणाले आहेत. रिअल अमेरिकाज व्हॉइसमध्ये बोलताना, नवारो यांनी नवी दिल्लीवर ‘महाराजा ऑफ टॅरिफ’ या प्रतिमेच्या आड दडल्याचा आरोप केला आणि भारताचे रशियाबरोबर उर्जा क्षेत्रात वाढत असलेले संबंधांचा शेवट चांगला होणार नाही, असा इशारा देखील त्यांनी यावेळी दिला.

“जगातील कोणत्याही प्रमुख देशाच्या तुलनेत त्यांनी अमेरिकेविरोधात सर्वाधिक टॅरिफ लावले आहेत. आपल्याला त्याचा सामाना करावा लागेल,” असे



नवारो म्हणाले. तसेच युक्रेनवरील हल्ल्यापूर्वी भारताने खूप कमी प्रमाणात रशियाकडून तेल खरेदी केले, पण आता स्वस्त रशियन कच्च्या तेलातून फायदा मिळवत आहेत. “अमेरिकन करदात्यांना या संघर्षासाठी अधिक पैसा पाठवावा लागत आहे,” असा दावा देखील त्यांनी केला

नवारो यांनी भारताच्या स्थितीची अमेरिकेचे सहकारी देश जसे की युरोपियन यूनियन, जपान, दक्षिण कोरिया, फिलिपिन्स आणि इंडोनेशिया यांच्याशी केली. हे देश व्यापार कराराच्या माध्यमातून अमेरिकेच्या जवळ आले आहेत असे नवारो म्हणाले. “मला वाटते की भारताला कधीतरी जुळवून घ्यावेच लागेल. आणि जर त्यांनी घेतले नाही तर तो रशिया आणि चीनच्या बाजूने असेल आणि त्याचा शेवट भारतासाठी चांगला होणार नाही,” असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.

नवारो यांनी भारताकडून होणारी ऊर्जा आयतीचा मुद्दा जागतिक सुरक्षेशी जोडला. “भारताला रशियन ऑइल खरेदी करणे थांबवावे लागेल. शांततेकडे जाणारा मार्ग काही प्रमाणात नवी दिल्लीतून जातो,” असा दावा त्यांनी केला. अमेरिकेच्या आरोपांनंतर युरोपातून रशियन कच्च्या तेलाची खरेदी थांबवण्यात आली आहे. चीनबद्दल बोलताना नवारो म्हणाले की, अमेरिकेने चिनी मालाच्या आयातीवर ५० टक्क्यांपेक्षा जास्त टॅरिफ लादला आहे.

ते पुढे म्हणाले, “जेव्हा ते अमेरिकेला माल विकतात, तेव्हा त्यांची निर्यात, त्यांच्या अन्यायकारक व्यापार पद्धतींनी आमचे रक्त शोषून घेणाऱ्या पिशाच्यांसारखी (Vampires) असते.” या वरिष्ठ सल्लागाराने असाही आरोप केला की, BRICS सदस्य “ऐतिहासिकदृष्ट्या एकमेकांचा द्वेष करतात आणि एकमेकांना मारतात,” आणि अमेरिकेशी व्यापार नसल्यास हा गट टिकणार नाही, अशी भविष्यवाणीही त्यांनी केली. तसेच त्यांनी आरोप केला की, BRICS सदस्य ऐतिहासिकदृष्ट्या एकमेकांचा द्वेष करतात आणि एकमेकांची हत्या करतात. तसेच त्यांनी अमेरिकन व्यापाराशिवाय हा गट टीकणार नाही, असेही नवारो यावेळी म्हणाले.

# वेश्यागृहात जाणारे 'ग्राहक' नव्हे, हे तर शोषणाचे भागीदार

## हायकोर्टाचा याचिकाकर्त्यास दणका

तिरुवनंतपुरम, दि. ९ वृत्तसंस्था

"वेश्यागृहात सेवा घेणाऱ्या व्यक्तीला ग्राहक म्हणता येणार नाही. कारण ग्राहक होण्यासाठी एखाद्या व्यक्तीने काही वस्तू किंवा सेवा खरेदी केल्या पाहिजेत. सेक्स वर्करला उत्पादन म्हणून बदनाम करता येणार नाही. शारीरिक सुखाचा आनंद शोधणारा पैसे देत असला तरी या पैशाचा मोठा वाटा वेश्यागृह चालवणाऱ्याकडे जातो. म्हणून पैसे देणे हे केवळ सेक्स वर्करला मागणीनुसार वागण्यास भाग पाडण्यासाठीचे प्रलोभन समजले जाऊ शकते. वेश्यागृहात लैंगिक सेवा घेणाऱ्या व्यक्तींवर अनैतिक वाहतूक (प्रतिबंध) कायदा, १९५६ (ITP कायदा) अंतर्गत खटला चालवला जाऊ शकतो, कारण अशा सेवांसाठी दिले जाणारे पैसे वेश्याव्यवसायाला प्रवृत्त करतात," असा महत्त्वपूर्ण निकाल नुकताच केरळ उच्च न्यायालयाने दिला आहे.

केरळमधील पेरुरकाडा पोलिसांनी तिरुअनंतपुरममधील एका इमारतीवर छापा टाकला. यावेळी याचिकाकर्ता एका महिलेसोबत आक्षेपार्ह अवस्थेत आढळला. तर अन्य खोलीमध्ये एक महिला व पुरुषही होते. पोलिस तपासात स्पष्ट झाले की, कारवाई करण्यात आलेले दोघेजण वेश्यागृह चालवत होते. या दोघांनी तीन महिलांना इमारतीमध्ये ठेवले होते. या तीन महिला ग्राहकांकडून पैसे जमा करत होत्या आणि त्यातील काही भाग अन्य महिलांना देत असल्याचे पोलिस तपासात स्पष्ट झाले. पोलिसांनी अन्य आरोपींसह वेश्यागृहात गेलेल्यावर विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला होता.

पोलिसांनी वेश्यागृहात गेलेल्या व्यक्तीवर विविध कलमांखाली गुन्हा दाखल केला. आपण फक्त ग्राहक म्हणून गेलो होतो. सेक्स वर्कर्स क्लायंटसाठी प्रचार करत होते. ग्राहक म्हणून तो फक्त त्यांच्या सेवा घेत होता. त्यामुळे आपल्या विरोधातील कारवाई रद्द करण्यात यावी, अशी मागणी करणारी याचिका संबंधिताने केरळ उच्च न्यायालयात दाखल केली होती.

# Gen Z आंदोलकांचा नेता सुदान गुरुंग ज्याच्या एका हाकेवर सरकार हादरले

काठमांडू, दि. ९ वृत्तसंस्था

नेपाळ सरकारने फेसबूक, इन्स्टाग्राम, व्हॉट्सअॅप, यूट्युब व एक्ससह एकूण २६ सोशल मीडिया अॅप्सवर बंदी घातली होती. मात्र, सरकारच्या या निर्णयाविरोधात नेपाळमधील तरुण रस्त्यावर उतरले. जेन-झी (Gen Z) पिढीतले तरुण-तरुणी यात आघाडीवर होते. त्यामुळे त्यांच्या आंदोलनाला जेन-झी हे नाव देण्यात आलं आहे. या जेन-झींच्या आंदोलनानंतर अवघ्या काही तासांत नेपाळमधील सरकारची पिछेहाट झाली आणि त्यांनी समाजमाध्यमांवरील बंदीचा निर्णय मागे घेतला. मात्र, अनेक ठिकाणी तरुणांनी केलेल्या हिंसक आंदोलनात १९ जणांचा मृत्यू झाला असून ३०० हून अधिक लोक जखमी झाले आहेत.

तरुणांनी आंदोलनाद्वारे नेपाळ सरकारला समाजमाध्यमांवरील बंदी मागे घ्यायला लावली. तसेच पंतप्रधान के. पी. शर्मा ओली, गृहमंत्री रमेश लेख यांच्यासह चार मंत्र्यांना त्यांच्या पदाचा राजीनामा द्यावा लागला आहे. दरम्यान, हे आंदोलन नेमकं कोणी उभारलं? कोणी इतक्या मोठ्या प्रमाणात तरुणांना रस्त्यावर उतरवलं? त्यांना रसद कोण पुरवतंय? याबाद्दल सर्वांच्या मनात कुतुहूल निर्माण झालं आहे. आतापर्यंत मिळालेल्या माहितीनुसार ३६ वर्षीय सुदान गुरुंग हा या आँदोलनकर्त्यांचा नेता आहे.

सुदान गुरुंग (३६) हा ‘हामी नेपाल’ या संघटनेचा अध्यक्ष आहे. एका इन्स्टाग्राम पोस्टमध्ये त्याने म्हटलं होतं की “आमच्या संघटनेने अधिकृतपणे मोर्चा काढण्याची परवानगी मागितली होती. तसेच विद्यार्थ्यांना शाळेचा गणवेश परिधान करण्याचं व जवळ पुस्तकं ठेवण्याचं आवाहन केलं होतं. आम्हाला आमचा



मोर्चा शांततामय असल्याचं दर्शवायचं होतं. मुळात शांततेच्या मार्गानेच आम्हाला आंदोलन करायचं होतं. समाजमाध्यमांवरील बंदीच्या (ब्लॅकआऊट) आधी ‘हामी नेपाल’ संघटनेने निषेध मोर्चाचा मार्ग, सुरक्षेसंबंधीची मार्गदर्शक तत्वे शेअर करण्यासाठी समाजमाध्यमांचा वापर केला होता.

गुरुंग पूर्वी केवळ एक कार्यक्रम आयोजक होता. २०१५ मधील भूकंपात त्याने त्याचा मुलगा गमावला. त्यानंतर तो आपत्ती निवारणाच्या कामात हिरिरीने सहभाग घेऊ लागला. धारण येथील बी. पी. कोइराला आरोग्य विज्ञान संस्थेच्या कारभारातील पारदर्शकतेसाठी त्याने आंदोलनाची हाक दिली होती. त्याच्या नेतृत्वाखाली प्रसिद्ध ‘घोपा कॅम्प’ आंदोलन पार पडलं. त्या आंदोलनामुळे त्याला ओळख मिळाली.

नेपाळमधील तरुणाई सरकारविरोधात रस्त्यावर उतरली आहे. या जेन-झी आंदोलनाचं नेतृत्व देखील सुदान गुरुंग करत आहे. त्याने समाजमाध्यमांवरून या आंदोलनाची हाक दिली होती. त्याने तरुणांना संघटित केलं आणि काठमांडूत आंदोलन उभं केलं. हे आंदोलन आता देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचलं आहे.

# खाण्याचा नवा जागतिक विक्रम

जगात खाण्या-पिण्याऱ्या लोकांची कमी नाही. अनेक लोक असे आहेत जे त्यांच्या खान-पानामुळेच वर्ल्ड रेकॉर्ड कायम करतात. तुम्ही अनेक प्रकारचे रेकॉर्ड ऐकले असतील, जसे की सर्वात उंच इमारत बांधणे, मोठी रोटी बनवणे, एखाद्या मोठ्या भाज्याची शेती करणे, लांब नदी पार करणे किंवा सर्वात वेगाने धावणे. पण तुम्हाला कधी सर्वात जास्त रोटी खाण्याचा रेकॉर्ड बद्दल ऐकायला मिळाले आहे का, जो तुम्हाला आश्चर्यचकित करेल? होय, बिहारमधील कटिहार येथील राहणाऱ्या एका व्यक्तीबद्दल आहे ही गोष्ट. जर तुम्ही त्याच्या खाण्याच्या सवयींबद्दल ऐकले तर नक्कीच थक्क व्हाल. हा व्यक्ती इतकी रोटी खातो की त्याच्यामुळे दोन-तीन कुटुंबांचे भुके भागतील इतकी रोटी तो एकटाच खाण्याचा विक्रम साधतो. चला तर मग जाणून घेऊया तो व्यक्ती कोण आहे आणि तो एवढे अन्न कसे खातो.

बिहारमधील कटिहार जिल्ह्यातील मोहम्मद रफिक अदनान त्याच्या असाधारण आहारामुळे



**मुलखावेगळी माणसं**

चर्चेत आहे. रफिक फक्त ३० वर्षांचा आहे आणि तो दिवसाला ३ किलो भात, ४ लिटर दूध, ८० ते १०० रोट्या खातो, एवढेच नाही तर २ किलो मटण किंवा चिकन आणि १.५ ते २ किलो मासे खातो. इतक्या जास्त आहारामुळे त्याचे वजन समारे २०० किलो आहे. तुम्हाला सांगतो की त्याचे वजन त्याच्या खाण्याच्या विकारामुळे आहे. तो त्याच्या लठ्ठपणा आणि खाण्याच्या सवयीमुळे संपूर्ण कटिहारमध्ये प्रसिद्ध आहे.रफिकला बुलिमिया नर्वोसा नावाच्या खाण्याच्या विकाराने ग्रासले आहे. त्यामुळे तो जास्त खातो. यामुळे त्याला सामाजिक आणि शारीरिक समस्यांना तोंड द्यावे लागते जसे की लोक त्याला पार्टीला आमंत्रित करण्यास कचरतात आणि त्याच्या लठ्ठपणामुळे त्याच्यासाठी आरोग्य समस्या निर्माण होत आहेत. त्याच्या जास्त वजनामुळे, रफिकला जास्त चालता येत नाही. त्याच्या वजनामुळे, त्याने एक जड बुलेट खरेदी केली पण ती देखील त्याचे वजन सांभाळू शकत नाही. रफिकने त्याच्या आजाराबद्दल डॉक्टरांशी संपर्क साधला तरी, सर्व काही निष्फळ ठरले. रफिकचे वजन त्याच्यासाठी त्रासाचे कारण बनले आहे. रफिकचे दोनदा लग्न झाले आहे. कुटुंबाचे म्हणणे आहे की त्याची पहिली पत्नी त्याची भूक भागवू शकली नाही, म्हणून त्याने दुसरे लग्न केले. व्यवसायाने धान्य व्यापारी असलेल्या रफिकला या आजारामुळे मुले नाहीत. त्याच्या आजूबाजूचे लोक आणि नातेवाईकही त्याला घरी बोलावण्यास घाबरतात.एकूणच रफिक्सारखा खादाडभाऊ हा आपल्या याच खाण्याच्या सवयीमुळे आज जागतिक स्तरावरचा खादाडी म्हणून ओळखला जात आहे खरोखरच या मुलखां वेगळ्या रफिकची हि सवय दखलपत्रच ठरते नाही का?

**लोकमानस**

# सुदृढ हृदयासाठी लिडलेस पेसमेकर वरदान

मानवाला जगण्यासाठी अत्यंत आवश्यक असलेल्या शरीरातील महत्वपूर्ण अशा मेंदू,किडनी आणि हृदय या तीन अवयव पैकी हृदय हे मानवी जीवनाचां जणू आधारस्तंभ मानला गेला आहे.याच हृदयाचे ठोके कधी खूप जलद कधी खूप संथ किंवा अनियमित होता त ज्याला अनियमित हृयस्पंदन असे.म्हणतात. याकडे दुर्लक्ष झाल्यास रुग्णांना गंभीर गुंतागुंतीना सामोरे जावे लागते.कधी कधी तर जीवाला धोका निर्माण होतो.यातील.एक सामान्य.प्रकार म्हणजे ब्राडी कार्डिया यामध्ये आपले हृदय इतके संथ ठोके देते की शरीराच्या गरजा पूर्ण होत नाहीत.अस असल तरी आजचे वैद्यकशास्त्र हे अत्यंत प्रगत होत आहे. अगदी सूक्ष्म ब्याट्र्या अत्याधुनिक उपकरणांना ऊर्जा पुरवतात.आता कल्पना करा याहून अगदी सूक्ष्म उपकरण मानवी हृदयाला नियमित ठोके द्यायला शक्ती देते आहे.हीच अत्याधुनिक हृदयविषयक तंत्रज्ञान क्रांती म्हणजेच नव्याने आलेला लिडलेस पेसमेकर जो हृदयाच्या अनियमित ठोक्यांचे व्यवस्थापन करण्यासाठी तयार करण्यात आलेला आहे.

**दखल**

हे अत्याधुनिक.लिडलेस पेसमेकर हे विकार प्रभावी आणि कार्यक्षम पद्धतीने नियंत्रणात ठेवण्यास मदत करतात.हे पेसमेकर लहान आकाराचे असून अल्प.आक्रमक. पद्धतीने बसवून गरज.पडल्यास परत काढून घेता येतात.पेसमेकर हे एक वैद्यकीय उपकरण असून जे हृदयाचे ठोके नियमित ठेवायला मदत करतात.पारंपरिक पेसमेकर साधारणपणे हनुवटी जवळ छातीच्या त्वचेखाली.बसवले जातात. आणि तारा द्वारे हृदयाशी जोडलेले असतात.या तारमधून हृदयाला विद्युत संदेश पाठवले जातात. ज्यामुळे हृदयाचे ठोके योग्य गतीने चालतात. यामुळे.छातीत दुखणे , थकवा,धडधड, किंवा अस्वस्थता अशा त्रासापासून आराम मिळतो.

“लीडलेस पेसमेकर असे विकसित केले गेले आहेत की डॉक्टरांसाठी त्यांची बसवणी आणि काढणी शक्य तितकी सोपी होईल, तसेच विद्यमान तंत्रज्ञानाच्या तुलनेत लक्षणीय सुधारणा मिळतील,” असे भारत, आग्नेय आशिया, हाँगकाँग, तैवान आणि कोरिया येथील कार्डियाक रिदम मॅनेजमेंटचे जनरल मॅनेजर, ॲबॉट अजय सिंग चौहान यांनी सांगितले. “हे रुग्णांसाठी खरंच जीवन बदलून टाकणारे ठरत असून, हृदयाच्या ठोक्यांच्या समस्यांचे व्यवस्थापन करण्यासाठी नवी दालने उघडते आहे.”

तंत्रज्ञानामुळे पेसमेकर आता आधीपेक्षा अधिक छोटे आणि आकर्षक झाले आहेत. त्याचबरोबर पारंपरिक प्रणालीतील मोठ्या अडचणींवरही तोडगा निघाला आहे, जसे की छातीत पाउच तयार करणे किंवा तारा वापरणे, जिथे संसर्ग होणे, तारा हलणे किंवा तुटणे यासारख्या समस्या उद्भवू शकतात. या समस्यांमुळे गंभीर हृदयविकार निर्माण होऊ शकतात आणि अनेकदा शस्त्रक्रिया करावी लागते. पण नव्या प्रगतीमुळे या अडथळयांवर मात करता येते, कारण हृदयविषयक तंत्रज्ञानातील नवकल्पनांमुळे अत्याधुनिक लीडलेस पेसमेकर वास्तवात उतरले आहेत.

“दरवर्षी हजारो रुग्णांना पेसमेकर बसवण्याची गरज भासते. या शस्त्रक्रियेत काही संभाव्य गुंतागुंत किंवा दिसणारे व्रणही राहू शकतात,” असे डॉ. संजीवकुमार कलकेकर, एमडी (जनरल मेडिसिन), डीएनबी (कार्डिओलॉजी), इंटरव्हेन्शनल कार्डिओलॉजिस्ट, अपोलो हॉस्पिटल्स, सीबीडी बेलापूर, मुंबई यांनी सांगितले. “लीडलेस पेसमेकर हे हृदयविकार उपचारातील एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. हे अत्यल्प आक्रमक आहेत, बाहेरून दिसतच नाहीत आणि शस्त्रक्रियेनंतर होणाऱ्या गुंतागुंतींमध्ये लक्षणीय घट करतात.” पारंपरिक पेसमेकर बसवण्यासाठी छातीत चीर घ्यावी लागते, परंतु लीडलेस पेसमेकर कॅथेटर (नळी) द्वारे थेट हृदयात बसवला जातो. नव्या पिढीतील पेसमेकर असे डिझाइन केले आहेत की बसवण्यापूर्वीच ते विद्युत नकाशा तयार करतात, ज्यामुळे शल्यचिकित्सकांना रुग्णाच्या शरीररचनेची स्पष्ट कल्पना मिळते आणि उपकरण अचूकपणे बसवणे शक्य होते. कॅथेटर टाकताना पेसमेकरभोवती संरक्षक आवरण असते, ज्यामुळे रक्तवाहिन्यांमधून त्याचा प्रवास अधिक सहज होतो आणि इजा होण्याचा धोका कमी होतो.

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com




महासागर NASHIK
Printed by S R PUBLICATION, Published by Shrikrishna Tansukhdas Chandak on behalf of Shrikrishna Tansukhdas Chandak, printed at GODOWN NO. 8, 9, 10, Mohan Arjun Compound, Near Ghartan Pada, Vaishali Nagar, Last Bus Stop, Dahisar (East), Mumbai Suburban, Maharashtra - 400068 and published at Plot No. 5, Anandi Bungalow, Kotwal Park, Tilakwadi, Dhamankar Corner, Nashik, Maharashtra - 422002.
**Editor: Shrikrishna Tansukhdas Chandak. Resident Editor- Jayant Mahajan. PRGI Registration No.MHMAR/25/A0219**

महासागर नाशिक
मुद्रक एस. आर. पब्लिकेशन, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, यांच्या वतीने श्रीकृष्ण तनसुखदास चांडक द्वारे प्रकाशित. मुद्रण स्थळ – गोडाऊन क्र. ८, ९, १०, मोहन अर्जुन कंपाउंड, घर्तन पाडा जवळ, वैशाली नगर, शेवटचा बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई उपनगर, महाराष्ट्र – ४०००६८. प्रकाशन स्थळ – प्लॉट क्र. ५, आनंदी बंगलो, कोतवाल पार्क, टिळकवाडी, धमणकर कॉर्नर, नाशिक, महाराष्ट्र – ४२२००२. **संपादक: श्रीकृष्ण तनसुखदास चांडक. निवासी संपादक – जयंत महाजन.** **PRGI नोंदणी क्रमांक: MHMAR/25/A0219**